मे २०१६ / पाने ६० / किंमत ₹१०

# लोकराज्य




स्वच्छ | सुंदर | समृद्ध | सर्वसमावेशक | संवेदनशील

# अभिवादन महामानवास...



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५व्या जयंतीनिमित्त चैत्यभूमी येथे १४ एप्रिल २०१६ रोजी बाबासाहेबांना अभिवादन करताना राज्यपाल सी. विद्यासागर राव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिक्षण मंत्री विनोद तावडे, खासदार रावसाहेब दानवे, आमदार आशिष देशमुख, मुंबईच्या महापौर स्नेहल आंबेकर आदी मान्यवर.

वर्ष ६७ वे | अंक ११ | मे २०१६

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

## संपादन

- अतिथी संपादक — मनीषा पाटणकर-म्हैसकर
- मुख्य संपादक — चंद्रशेखर ओक
- प्रबंध संपादक — देवेंद्र भुजबळ
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — प्रवीण टाके
- उपसंपादक — राजाराम देवकर

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण — अश्विनी पुजारी
- साहाय्य — प्रज्ञा गायकवाड

## मांडणी

- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya2011@gmail.com

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
Email : lokrajyavitaran@gmail.com

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

# अंतरंग



### उमेद आणि प्रेरणा — ६

महाराष्ट्र दिन हा मराठी बांधवांसाठी अभिमानाचा दिवस. महाराष्ट्राची निर्मिती होऊन ५६ वर्षे झाली असली तरी प्रत्येक वर्षी येणारा महाराष्ट्र दिन हा साऱ्यांसाठी उमेद आणि प्रेरणा देणारा असतो. हा दिन महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी शहीद झालेल्या हुतात्मांचे कृतज्ञ स्मरण करणारा तर आहेच; मात्र त्यासोबतच महाराष्ट्राच्या आजवरच्या वाटचालीचे सिंहावलोकन करून भावी वाटचालीसाठी दिशा ठरवण्याचे एक निमित्तही आहे.



### लातूरकरांच्या अंगणी 'जलदूत' एक्सप्रेस — १४

लातूर येथील तीव्र पाणीटंचाई लक्षात घेता तेथे रेल्वेने पाणी पाठवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. लातूरकरांची गरज लक्षात घेवून रेल्वेने ५० टँकरने (वॅगन) पाणी पुरवठा करण्यात येत आहे. या निर्णयाची अंमलबजावणी १९ एप्रिलपासून सुरू झाली. २० एप्रिलला ५० टँकरची पहिली खेप लातुरमध्ये दाखल झाली. या रेल्वेला रेल्वे मंत्रालयाने जलद गाडीचा दर्जा दिला आहे.



### अविरत, अविश्रांत.. — २०

राज्याचे महसूल मंत्री एकनाथराव खडसे यांच्यासोबत एक दिवस.



### एक नागरिक, एक झाड — २२

राज्याचे पर्यावरण मंत्री रामदास कदम यांची विशेष मुलाखत.



### गतिमान झाली नागपूरची मेट्रो — २४

नागपूर मेट्रो प्रकल्पासाठी जर्मनीची केएफडब्ल्यू बँक आणि केंद्र सरकार यांच्यात १ एप्रिल रोजी ३ हजार ७५० कोटी रुपयांचा करार झाला.

### परिवर्तनाचे शिलेदार — २८

राज्याच्या विकासामध्ये आपल्या कर्तृत्वाने गती आणणाऱ्या विविध विभागातील अधिकाऱ्यांचा सामान्य प्रशासन विभागातर्फे नागरी सेवा दिनानिमित्त मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### भ्रमंती विशेष — ३५-५७


**महाराष्ट्र हा गडकिल्ले, वनसंपत्ती, धार्मिक स्थळे यांनी अतिशय समृद्ध असलेला प्रदेश. कायम देशविदेशातील पर्यटकांना आकर्षित करणारा. महाराष्ट्रात एकीकडे मन मोहवून टाकणारे सागरी किनारे, तर दुसरीकडे ताडोबा, पेंच, नवेगाव, नागझिरा, मेळघाट यांसारखी दाट वने आहेत. वाघापासून अस्वलापर्यंत तसेच विविध पक्षी यांचे वास्तव्य येथे आहे. उन्हाळ्याच्या सुटीत या पर्यटन स्थळांना भेटी देण्याचा आनंद काही औरच असतो. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागातील अशा काही पर्यटन स्थळांची माहिती या विशेषांकात देण्यात आली आहे. ती वाचल्यावर प्रत्येकालाच महाराष्ट्र अनलिमिटेड असल्याची खात्री पटेल.**



### उत्तम संपादन

लोकराज्य मासिक नाममात्र किमतीत आमच्या पर्यंत पोहोचत असल्याचा आनंद आहे. या मासिकातून महत्त्वपूर्ण माहिती मिळते. उत्तम संपादन व लेखनासाठी टीम लोकराज्यचे मनापासून अभिनंदन.

**प्रवीण कपाट, सोनोरा (ढोक), ता. देवळी, जि. वर्धा**




### आश्वासक अर्थसंकल्प

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीवर्षानिमित्त प्रकाशित केलेला एप्रिलचा विशेषांक म्हणजे बाबासाहेबांना भावपूर्ण आदरांजली आहे. या अंकातील लेख अतिशय वाचनीय असून यातील माहिती दुर्मीळ आणि ज्ञानात भर घालणारी आहे. त्यामुळे बाबासाहेबांची व्यापक ओळख झाली. त्यासोबतच ग्रामीण आणि नागरी भागाच्या समन्यायी विकासास चालना देणारा, कृषी विकासासाठी २५ हजार कोटी रुपयांची तरतूद असलेल्या अर्थसंकल्पाचा आढावा शेतकऱ्यांना आश्वस्त करणारा आहे. मा. मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाने दुष्काळग्रस्त मराठवाड्याच्या केलेल्या दौऱ्याचेही वृत्तांकनही आवडले. जलजागृती सप्ताहानिमित्त पाणी बचतीचा संदेशही या अंकातून मिळाला.

**शिवनाथ नागवे, खामखेडा (राजूर), जि. जालना**

### माहितीपूर्ण

लोकराज्य हे मासिक राज्याच्या विकासाचा सर्वांगीण आढावा जनतेपुढे मांडणारे, पुरेपूर माहिती पोहचविणारे मासिक आहे. शासनाची ओळख, निर्णय, विविध मुलाखती आदींच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण माहिती मिळते. ते सर्वांसाठी उपयुक्त आहे. प्रेरणा सदर प्रेरणादायी आहे.

**बी. डी. मखाळीकर, जि. नांदेड**

### ई-मेलद्वारे...

लोकराज्य मासिक स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्यांसाठी माहितीचा उत्तम आणि खात्रीशीर स्रोत आहे. यातील लेख मला खूप आवडतात.


**शुभम शेंडे**

मला लोकराज्यचे वाचन करायला खूप आवडते. अभ्यासपूर्ण लेख व महत्त्वपूर्ण माहिती ज्ञानात भर घालते.

**संजय तोरडमल**

अंतरंगातील सर्व लेख वाचनीय असतात. सरकारच्या पुढील आश्वासक वाटचालीस शुभेच्छा.


**गणेश गावडे**




### धाडस निर्माण केले

मार्च २०१६ चा लोकराज्यच्या अंकातील सर्वच लेख वाचनीय आहेत. मुख्यत: शासनाने शेतकऱ्यांना दिलासा मिळावा यासाठी दुष्काळग्रस्तांना तातडीची मदत, आकस्मिक निधीत मर्यादा वाढ, सूक्ष्म सिंचनाला प्राधान्य देऊन प्रतिकूलतेतून अनुकूलता निर्माण करण्याचे धाडस शेतकऱ्यांमध्ये जागृत केले.

**के. एन. राऊत, धारणी**




### तिसरा डोळा मार्गदर्शक

सुरक्षेचा तिसरा डोळा हा जानेवारी-२०१६ च्या लोकराज्य मधील लेख वाचून आमची मुंबई या तिसऱ्या डोळ्याने निश्चितच सुरक्षित होईल याची खात्री पटली. केवळ मुंबईच नव्हे तर महाराष्ट्रातील प्रत्येक शहर सीसीटीव्हीच्या नजरेखाली यावा ही इच्छा.

**सुनील समडोळीक, संभाजीनगर, कोल्हापूर**




### प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आम्हाला हव्या आहेत.

**पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२**

### वार्षिक वर्गणी

**वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वटणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. आपला संपूर्ण निवासी पत्ता सुवाच्य अक्षरात पीनकोडसह असावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)**

**लोकराज्यची वर्गणी ऑनलाइन भरण्यासाठी** http://dgipr.maharashtra.gov.in

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

अतिथी संपादकीय



# महाराष्ट्रः वारसा अभिमानाचा

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेस १ मे २०१६ रोजी ५६ वर्षे पूर्ण होत आहेत. या कालावधीत महाराष्ट्राने नेत्रदीपक कामगिरी करून विविध क्षेत्रात देशात पहिला क्रमांक पटकावला आहे. यामुळे आपले राज्य हे देशातील सर्वाधिक **स्वच्छ, सुंदर, समृद्ध, सर्वसमावेशक आणि संवेदनशील** ठरले आहे.

दुष्काळ व पाणी टंचाईवर मात करण्यासाठी शासन युद्धस्तरावर प्रयत्न करीत आहे. अन्नसुरक्षा, जीवनदायी योजना, वीजबिलात सवलत, ४ लाख जनावरांच्या चाऱ्याची व्यवस्था आदी उपाययोजनांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. पीक कर्जाच्या पुनर्गठनाचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. याचा लाभ २१ लाख शेतकऱ्यांना होणार असून ११ हजार कोटी रुपयांच्या कर्जाचे पुनर्गठन होईल. यंदाच्या खरीप हंगामासाठी १५० लाख हेक्टर पेरणीचे नियोजन करण्यात आले आहे. त्यासाठी १४.४३ लाख क्विंटल बियाणे उपलब्ध करण्यात आले आहे. यंदा मान्सून चांगला पडणार असल्याचे भाकीत करण्यात आल्याने शासनाच्या विविध उपाययोजना कृषिक्षेत्र आणि शेतकऱ्यांसाठी लाभदायक ठरतील.

२६ मे २०१६ रोजी केंद्र शासनास २ वर्षे पूर्ण होत आहेत. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या कुशल नेतृत्वाखाली **'मेक इन इंडिया', 'स्किल इंडिया', 'डिजिटल इंडिया', 'स्वच्छ भारत', 'स्मार्ट सिटी', 'सुकन्या समृद्धी', 'अटल पेंशन', 'जन-धन'** यांसारख्या प्रत्येक घटकांच्या विकास आणि प्रगतीसाठी योजना प्रभावीपणे राबवण्यात येत आहेत. यामुळे सबंध जगात भारताची उज्ज्वल प्रतिमा निर्माण झाली आहे.

महाराष्ट्र हे पर्यटनाच्या दृष्टीने समृद्ध राज्य आहे. राज्यात विस्तीर्ण सागरकिनारे, दाट वने, वन्यप्राणी, ऐतिहासिक ठिकाणे, गडकिल्ले, धार्मिक स्थळे विपुल आहेत. ही बाब लक्षात घेऊन या क्षेत्रातील पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी नवे पर्यटन धोरण जाहीर करण्यात आले आहे. यामुळे १० लाख नवीन रोजगार निर्मिती शक्य होईल. कृषी, धार्मिक, निसर्ग आणि साहसी पर्यटनास चालना देऊन देशविदेशातील अधिकाधिक पर्यटकांना आकर्षित केले जाईल. उन्हाळ्यामध्ये पर्यटनाचा आनंद घेताना आपण विविध अनुभवांनी समृद्ध होऊ शकतो. अशा काही ठिकाणांची माहिती देणारी विशेष 'भ्रमंती पुरवणी' हे या अंकाचे वैशिष्ट्य आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाला उजाळा देणाऱ्या 'लोकराज्य एप्रिल २०१६' च्या 'प्रज्ञासूर्य' या विशेषांकास उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालच्या महान्यूज वेबपोर्टल, दिलखुलास आणि जय महाराष्ट्र या माध्यमांमधूनही या महामानवास आम्ही आदरांजली अर्पण केली आहे.

हा अंक आपणास आवडेल अशी आशा आहे.

**मनीषा पाटणकर-म्हैसकर**
**सचिव**
**(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)**

# उमेद आणि प्रेरणा

**महाराष्ट्र दिन हा सर्व मराठी बांधवांसाठी अभिमानाचा दिवस. महाराष्ट्राची निर्मिती होऊन ५६ वर्षे झाली असली तरी प्रत्येक वर्षी येणारा महाराष्ट्र दिन हा साऱ्यांसाठी उमेद आणि प्रेरणा देणारा असतो. हा दिन महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी शहीद झालेल्या हुतात्म्यांचे कृतज्ञ स्मरण करणारा तर आहेच मात्र, त्यासोबतच महाराष्ट्राच्या आजवरच्या वाटचालीचे सिंहावलोकन करून; भावी वाटचालीसाठी दिशा ठरवण्याचे एक निमित्तही आहे. यंदाचा महाराष्ट्र दिन काही आव्हानांची मालिका घेऊन आला असला तरी त्यासोबतच तो त्यांच्या मुकाबल्यासाठी निश्चितच प्रेरणा देणाराही आहे. आजवरच्या वाटचालीत अशा आव्हानांनीच महाराष्ट्राची मजबूत अशी जडणघडण केली आहे. त्यामुळेच 'राकट देशा... कणखर देशा...' असा होणारा महाराष्ट्राचा गौरव सार्थच आहे.**



यंदा महाराष्ट्र दिन साजरा करीत असताना माझ्या डोळ्यासमोर आहे तो राज्यातील सर्वसामान्य शेतकरी आणि दुष्काळाच्या दुष्टचक्रात अडकलेली हजारो गावे. राज्याच्या निर्मितीनंतर ५६ वर्षांनीही केवळ पिण्याच्या पाण्यासाठी धडपडावे लागणे हाच साऱ्यांच्या चिंतेचा विषय असायला हवा. राज्यासमोर सध्या दुष्काळसदृश परिस्थितीचे सर्वात मोठे आव्हान आहे. राज्याच्या काही भागात विशेषत: मराठवाड्यात परिस्थिती अतिशय आव्हानात्मक असली तरी तिला सरकार सर्वशक्तीनिशी तोंड देत आहे. गेल्याच महिन्यात राज्याचे संपूर्ण मंत्रिमंडळ मराठवाड्यातल्या जनतेला दिलासा देण्यासाठी गावागावांत पोहोचले. अशा अडचणीच्या प्रसंगी सरकार एकदिलाने आपल्यासोबत आहे, ही सहवेदनेची जाणीव आम्ही जनतेला पुरेपूर दिली आहे. तहानलेल्या लातूर शहराला पाणी देण्यासाठी रेल्वेची मदत घेण्याचा ऐतिहासिक निर्णय आम्ही अथक परिश्रमातून अमलात आणला. आजवर तीन कोटी लीटरहून अधिक पाणी या शहराला पुरवण्यात आम्हाला यश आले आहे.

## दुष्काळ निर्मूलनाचा आदर्श पॅटर्न

राज्यातील २४ हजारांहून अधिक गावांमध्ये सातत्याने दुष्काळ असतो. भविष्यात हे चित्र बदलावे यासाठी माझे सरकार निष्ठेने प्रयत्न करीत आहे. त्यासाठी गेल्या वर्षी आम्ही सुरू केलेल्या जलयुक्त शिवार अभियानासारख्या अत्यंत वास्तववादी योजनेला, सहा हजारांहून अधिक गावांतील जनतेने दिलेला प्रतिसाद मोठा होता. तब्बल ३५० कोटी रुपयांहून अधिक रकमेचा लोकसहभाग लाभलेले हे अभियान जनआंदोलन झाले आहे. यंदा पाच हजारांहून अधिक गावांत ते उत्साहाने आम्ही राबवत आहोत. त्यासाठी विशेष निधीतून दोन हजार कोटींची भरीव तरतूद करण्यात आली आहे. दुष्काळ निर्मूलनाचा एक आदर्श पॅटर्न म्हणून देशात हे अभियान ओळखले जात आहे. राज्यातील कायमस्वरूपी दुष्काळमुक्तीसाठी, जागतिक बँकेकडे चार हजार कोटींचा एक महत्त्वाकांक्षी प्रस्ताव आम्ही सादर केला आहे. त्यावर सकारात्मक निर्णय होईल, अशी आम्हाला खात्री आहे. 'मागेल त्याला शेततळे' ही योजना आम्ही व्यापक प्रमाणावर राबवत आहोत. ५० हजारांचे उद्दिष्ट असताना ८० हजारांहून अधिक अर्ज आले आहेत. पाण्याची समस्या सोडवण्यासाठी, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठ्याची महत्त्वाकांक्षी योजना आखण्यात आली आहे.

**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री

## कर्जाचे पुनर्गठन

२०१२-१३ आणि २०१३-१४ या आर्थिक वर्षांतील कर्जाचेसुद्धा पुनर्गठन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आणि त्याबाबतची परवानगी रिझर्व्ह बँकेकडे मागण्यात आली आहे. जवळजवळ ११ हजार कोटींच्या कर्जाचे पुनर्गठन यातून साध्य होणार आहे. केंद्राकडून तीन हजार कोटींची मदत दुष्काळनिवारणासाठी प्राप्त झाली आणि ती थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली. त्यासोबत विम्यापोटी १८०० कोटी आणि चारा, टँकर आदींचा खर्च मिळून ५१५० कोटी एवढा मोठा निधी खर्च करण्यात आला आहे.

अन्नसुरक्षा, जीवनदायी योजना, वीजबिलात सवलत, परीक्षा शुल्काची माफी, चार लाखांवर जनावरांच्या चाऱ्याची व्यवस्था, चारा कमी पडू नये म्हणून अन्य जिल्ह्यांतून तो आणण्यासाठी परवानगी असे अनेक उपाय योजिले आणि आज दुष्काळग्रस्तांना दिलासा देऊ शकलो, याचे समाधान आहे. विशेषत: शेतकरी आत्महत्यांबाबत सरकार अत्यंत संवेदनशीलतेने कार्यवाही करीत आहे. त्यामुळेच आमच्या भविष्यकालीन नियोजनाचा केंद्रबिंदू शेती आणि सिंचन हाच निश्चित करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना मदत करण्यासह संस्थात्मक कर्जपुरवठा वाढवून, शेतीतील गुंतवणूक वाढवण्यावर आमचा भर आहे.



## विकासाची दिशा स्पष्ट

राज्यात नुकतेच 'मेक इन इंडिया सप्ताहा'चे अतिशय अभिमानास्पद आयोजन राज्य सरकारने केले. मा. प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या तीन सामंजस्य करारांपैकी दोन करार हे शेतीसाठी होते. फळप्रक्रिया, वस्त्रोद्योग याही क्षेत्रात अनेक संधी आहेत. शेवटी शेतीचा समग्र आणि शाश्वत विचार आपल्याला करावा लागेल. शेतीला पाणी आणि विजेसोबतच स्थानिक बाजारपेठही आवश्यक आहे. विदर्भातील संत्री, कोकणातील आंब्यासाठी स्थानिक पातळीवरच प्रक्रिया उद्योग असतील तरच शेतीचे चित्र आपण बदलू शकतो. कापूस सर्वाधिक पिकणाऱ्या भागात टेक्सटाईल पार्कचे प्रयोजन हे त्यासाठी आहे. या शेतकरी स्वाभिमान वर्षांत, शेतीसाठी विक्रमी २५ हजार कोटींची तरतूद ही राज्याच्या विकासाची दिशा स्पष्ट करणारी ठरावी. 'शेतकरी स्वावलंबी झाला पाहिजे, ग्रामआधारित अर्थव्यवस्था असली पाहिजे, गोवंश टिकवला पाहिजे', हे महात्मा गांधी यांनी सांगितलेले विचारधन, पुस्तकातून बाहेर काढून कृतीच्या पातळीवर आणावे लागेल.

कृषीवर आधारित लोकसंख्येचा भार थोडा हलका करून त्याला इतर उद्योगांची जोड दिली पाहिजे. कृषी क्षेत्राशिवाय अतिरिक्त रोजगार निर्मितीसाठी औद्योगिक विकासही तितकाच महत्त्वाचा आहे. 'मेक इन इंडिया'च्या माध्यमातून आठ लाख कोटींची गुंतवणूक करू शकणारे २४०० हून अधिक करार झाले आहेत. हे करार प्रत्यक्षात साकारण्यासाठी राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक देखरेख समिती स्थापन करण्यात आली आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्योजकता प्रोत्साहन योजना राबवण्याचा आम्ही निर्णय घेतला. तंत्रकुशल हातांना काम यातून मिळेल आणि आपला तरूण उद्याच्या औद्योगिक भारताचे नेतृत्त्व करेल, असेच हे नियोजन आहे. सेवा हमी कायद्याच्या माध्यमातून सामान्यांना घरपोच सेवा, 'ईज ऑफ डुईंग'च्या माध्यमातून परवानाराज संपुष्टात आणण्याचा प्रयत्न, आपले सरकारच्या माध्यमातून संवादाचे व्यासपीठ, या साऱ्या बाबी सरकारच्या गतिमानता आणि पारदर्शकतेचा परिचय करून देणाऱ्या आहेत. त्यात उत्तरदायित्त्वाची भावना अधिक आहे.

**राज्यात गुंतवणूक आणायची असेल तर पायाभूत सुविधांचे जाळे उभारणे आवश्यक आहे. मुंबई ट्रान्सहार्बर लिंक, प्रमुख शहरातील मेट्रो, नवी मुंबई विमानतळ, शेंद्रा बिडकीन औद्योगिक पार्क, टेक्सटाईल पार्क, देशातील सर्वांत मोठी ग्रीन रिफायनरी, मिहान, नागपूर-मुंबई सुपर एक्सप्रेस वे, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, रखडलेल्या रेल्वे मार्गांचे काम अशी कितीतरी कामे 'टेकऑफ'च्या अवस्थेत आहेत. यातून राज्यात येणारी गुंतवणूक आणि निर्माण होणारा रोजगार राज्याच्या अर्थकारणाला गती देणारा ठरणार आहे. त्यासोबतच देशात राज्याचे अग्रेसरत्व सिद्ध करणारा आहे.**

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या भारतमातेच्या थोर सुपुत्राच्या १२५ व्या जयंती वर्षांत इंदू मिल स्मारकाचे भूमीपूजन, दीक्षाभूमीला 'अ' वर्गाच्या तीर्थक्षेत्र/पर्यटन क्षेत्राच्या दर्जासह २५० कोटींचा विकास आराखडा, लंडनमधील महामानवाचे स्मारक, कोयासन विद्यापीठातील पुतळा अनावरण आणि अगदी जयंतीच्या पूर्वसंध्येला सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा पारित करून अभिवादन करण्याची संधी आपल्या सरकारला प्राप्त झाली, याचा मला नेहमीच अभिमान वाटत राहील. अनुसूचित जातींच्या सर्वांना घरे देण्याची योजनासुद्धा आम्ही साकारत आहोत. महाराष्ट्र हे सर्व समाजघटक सामावणारे एक कुटुंब आहे. या कुटुंबातील साऱ्याच घटकांच्या आकांक्षांना समतोल न्याय देण्याचे आव्हान सरकारपुढे आहे. महाराष्ट्राची उभारणी ही एक निरंतर प्रक्रिया आहे. ती अधिक सर्वंकष आणि सर्वसमावेशक करण्याच्या आमच्या निर्धाराचा आम्ही यंदाच्या महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने पुनरुच्चार करीत आहोत!

**शब्दांकन : हेमराज बागूल, मा. मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी**

# मुकाबला दुष्काळाशी

**राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. या अंतर्गत दुष्काळ निवारण समित्या गठित करणे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी विशेष मदतीचा कार्यक्रम राबवणे, खरीप २०१५ मधील बाधित शेतकऱ्यांना अर्थसाहाय्य करण्यासाठी निधी वितरित करणे, पीक कर्जाचे पुनर्गठन, पीक पैसेवारी पद्धतीमध्ये सुधारणा करणे, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत देणे, लातूरला मिरजहून पाणी आणण्यासाठी सुरू केलेली जलदूत आदी उपाययोजनांचा यात समावेश आहे.**

राज्याला गेल्या ३ वर्षांपासून कमी पावसामुळे दुष्काळाचा सामना करावा लागत आहे. या परिस्थितीत जलसंधारणाची कामे करण्यासाठी जिल्हा नियोजन मंडळाला जेसीबी, पोकलँडसारखी यंत्र खरेदीचे अधिकार देण्यात आले आहेत. राज्य शासनाने खरीप हंगामातील पैसेवारी अहवालानुसार १५ हजार ७४७ गावांमध्ये टंचाई परिस्थिती जाहीर केली आहे.



नव्याने सुरू करण्यात आलेली प्रधानमंत्री पीक विमा योजना राज्यात यंदाच्या खरीप हंगामापासून लागू करण्यात येणार आहे.

राज्याच्या इतिहासात प्रथमच रब्बी हंगामातील सोलापूर व अहमदनगर जिल्ह्यातील १,०५३ गावांमध्ये टंचाईची परिस्थिती जाहीर करण्यात आली. दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांसाठी जमीन महसुलात सूट, शैक्षणिक शुल्क माफ, कर्जाचे पुनर्गठन पाच वर्षांत करणे आदी निर्णयांची अंमलबजावणी सुरू आहे. केंद्र व राज्य शासनाने दुष्काळग्रस्तांसाठी करावयाच्या उपाययोजनेच्या निकषात बदल करण्यात आले आहेत, नैसर्गिक आपत्तीत करावयाच्या मदतीसाठीचे निकष देखील केंद्र शासनाने बदलले आहेत. पूर्वी एखाद्या भागाचे ५० टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाल्यास नुकसान भरपाई दिली जायची, आता हा निकष बदलून ५० टक्क्यांऐवजी ३३ टक्क्यांवर नुकसान झाल्यास भरपाई देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी विशेष मदतीच्या कार्यक्रमांतर्गत उस्मानाबाद व यवतमाळ जिल्ह्यातील जिल्हास्तरीय व ग्रामस्तरीय समित्यांना एकूण रु.३४१९.५० लाख इतका निधी विभागीय आयुक्त, औरंगाबाद व अमरावती यांच्यामार्फत वितरित करण्यात आला. जिल्हा स्तरावर समिती गठित करून या समितीद्वारे बळीराजा चेतना अभियान राबवण्याचा तसेच या समितीस कामकाजानिमित्त सुयोग्य निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्याच्या विविध भागात एकूण १५,७४७ गावांमध्ये सन २०१५ च्या खरीप हंगामात अपुऱ्या पावसामुळे सर्व प्रकारच्या पिकांचे नुकसान झाले. अवर्षणामुळे बाधित शेतकऱ्यांना सबसिडी वाटप करण्याकरिता रू.२००० कोटी निधी वितरित करण्यात आला आहे. या व्यतिरिक्त दिनांक २३ मार्च २०१६ ला विदर्भातील सुमारे ११,८६२ गावे खरीप हंगामाकरिता बाधित घोषित केली आहेत.

### रोहयोतून ४ लाख मजुरांना काम

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राज्यात १६ एप्रिलपर्यंत ३० हजार ४४७ कामे सुरू असून या कामांवर तीन लाख ९५ हजार २०८ मजुरांची उपस्थिती आहे.

राज्यात ४ लाख १४ हजार ६२४ कामे शेल्फवर असून त्या कामांची मजूर क्षमता १२८८.२६ लाख एवढी आहे.

### राज्यात ३६७ चारा छावण्या

राज्यात बीड, लातूर, उस्मानाबाद आणि अहमदनगर या जिल्ह्यात चारा छावण्या सुरू करण्यात आल्या आहेत. २१ एप्रिल अखेरपर्यंत बीड २७१, उस्मानाबाद ८८, अहमदनगर



**जनावरांच्या छावण्यासाठी चारा उपलब्ध होण्याकरिता वन विभागाची कुरणे राखीव करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यात ज्या ठिकाणी आवश्यकता भासेल तेथे जनावरांच्या छावण्या सुरू करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार देण्यात आले असून वन खात्याचे कुरण राखीव ठेवण्यात आले आहेत. टंचाई परिस्थितीच्या काळात शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पुढील कालखंडासाठी मोफत बियाणे, त्याचबरोबर दुधाळ जनावरे दगावल्यास ३० हजार रुपये प्रतिजनावर, ओझे वाहणारे जनावर दगावल्यास प्रति जनावर १५ हजार रुपये मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

# शेतकऱ्यांसाठीचा १०० टक्के निधी विभागांना उपलब्ध

वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिलेल्या निर्देशानुसार सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात शेतकऱ्यांसाठी करण्यात आलेल्या आवश्यक असलेल्या तरतुदी शंभर टक्के पूर्णपणे संबंधित विभागांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. भांडवली खर्च, जिल्हा योजना व स्थानिक विकास निधी कार्यक्रमांतर्गत १०० टक्के अर्थसंकल्पीय निधी विभागाला उपलब्ध करण्यात आला असून उर्वरित योजनांतर्गत, योजनेतर निधी ८०% उपलब्ध करण्यात आला आहे. यासंदर्भात वित्त विभागाने १६ एप्रिल, २०१६ रोजी परिपत्रक काढले आहे.



वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिलेल्या निर्देशानुसार शेतकऱ्यांसाठी ज्या पूर्ण १००% तरतुदी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत त्यात प्रामुख्याने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची मजुरी, साहित्य पुरवठा व प्रशासकीय खर्च या बाबींची केंद्र व राज्य हिश्श्याची एकूण तरतूद रुपये ३२४३.६७ कोटी, मदत व पुनर्वसन विभागांतर्गत नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी साहाय्य या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना पीक नुकसान भरपाई व पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, पूर, चक्रीवादळ इत्यादीमुळे हानी पोहोचल्यास शेतकऱ्यांना पीक नुकसान भरपाई, घर दुरुस्ती, पशुधन खरेदी इत्यादीबाबतची एकूण तरतूद रु. ५५७१.५४ कोटी, कृषी विभागांतर्गत पीक विमा निधी दाव्यापोटी देण्यात येणारी नुकसान भरपाई, सर्वंकष पीक विमा, स्व.गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा, हवामानावर आधारित फळ पीक विमा याबाबतची एकूण रुपये १८९१ कोटी रुपयांची तरतूद या तरतुदींचा समावेश आहे. वृक्षलागवडीसाठी सुद्धा १००% निधी वनविभागाला उपलब्ध करण्यात येणार आहे.

## दोनशे फुटांपेक्षा खोल बोअरवेल खोदल्यास कारवाई

सततचा दुष्काळ, खोलवर जाणारा भूजलसाठा, त्यामुळे वारंवार निर्माण होणारी पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेता बोअरवेलच्या खोलीवर नियंत्रण ठेवणाऱ्या महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियमाची राज्यात काटेकोर अंमलबजावणी केली जाईल. या कायद्याच्या अंमलबजावणीसंदर्भात राज्यातील सर्व जिल्ह्यात वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या



कार्यशाळा घेऊन चर्चा करण्यात आली असून नियमावली तयार करण्यात येत आहे. जमिनीत जितके पाणी मुरते त्यापेक्षा अधिक पाण्याचा उपसा करण्यात येत असल्याने दोनशे फुटांपेक्षा खोल बोअरवेल खोदणाऱ्यांवर या कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल, अशी माहिती पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री बबनराव लोणीकर यांनी दिली आहे.



यापुढील काळात दुष्काळी परिस्थिती टाळण्यासाठी बोअरवेलवर नियंत्रण मिळवणे आवश्यक आहे. यासाठी महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियमाची राज्यात काटेकोर अंमलबजावणी केली जाणार आहे.

५, लातूर ३ याप्रमाणे एकूण ३६७ चारा छावण्या सुरू आहेत. त्यात लहानमोठी अशी एकूण ३ लाख ८३ हजार १९३ जनावरे आहेत.

## ४ हजार ६४० टँकर्सद्वारे पाणीपुरवठा

राज्याच्या जलाशयातील एकूण पाण्याचा उपयुक्त साठा केवळ १७ टक्के इतका शिल्लक असून पाणीटंचाईग्रस्त ३५८६ गावे आणि ५९९३ वाड्यांना ४६४० टँकरच्या माध्यमातून पाणी पुरवठा करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनातर्फे दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना दिलासा देण्यासाठी व्यापक प्रयत्न करण्यात येत आहेत. राज्यात सध्या ४ हजार ६४० टँकर्सद्वारे लोकांना पाणीपुरवठा करण्यात येत असून यात मराठवाडा विभागात सर्वाधिक टँकर



सुरू आहेत. राज्य शासनाने ७५० कोटी रुपयांच्या टंचाई आराखड्यास मान्यता दिली असून ५०० कोटी रुपयांचे जिल्हाधिकाऱ्यांना वितरण करण्यात आले आहे. यात टँकरने पाणीपुरवठा करणे, निकृष्ट पाईपलाइन बदलणे, जळलेले पंप बदलणे, टाक्यांचे लिकेज काढणे अशा विविध १७ उपाययोजनांसाठी हा निधी वापरून लोकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत आहे.

**डॉ. सुरेखा मुळे, गजानन पाटील आणि टीम लोकराज्य**

# शेतकऱ्यांना दिलासा

गेल्या तीन वर्षांपासून राज्यावर येत असलेल्या विविध प्रकारच्या नैसर्गिक आपत्तींमुळे पिकांचे नुकसान होत असून शेतकरी अडचणीत आले आहेत. अशा आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पीक कर्जाच्या पुनर्गठनाचा निर्णय सरकारने गेल्या वर्षी घेतला होता. त्यानुसार २०१४-१५ या वर्षातील खरीप-२०१४ या हंगामातील पीक कर्जाचे पुनर्गठन केलेल्या ३५०३ कोटी कर्जापोटी जून २०१६ पर्यंत देय असलेला पहिला वार्षिक हप्ता ७०० कोटींचा होता. या रकमेपैकी थकीत राहणाऱ्या अंदाजे ३०० कोटी रकमेची परतफेड करण्यास पुढील एक

**नैसर्गिक आपत्तीमुळे अडचणीत आलेल्या राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पीक कर्जाच्या पुनर्गठनाचा निर्णय शासनाने घेतला होता. त्यानुसार पुनर्गठित केलेल्या खरीप-२०१४ च्या पीक कर्जाच्या पहिल्या हप्त्यास एक वर्ष मुदतवाढ, खरीप-२०१५ च्या पीक कर्जाचे पुनर्गठन करून व्याज शासनातर्फे देणे आणि विशेष बाब म्हणून २०१२-१३ व २०१३-१४ या दोन वर्षातील पीक कर्जाचे पुनर्गठन करण्याचा निर्णय मंत्रिपरिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयामुळे २१ लाखाहून अधिक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, त्यांच्या जवळपास ११ हजार कोटी रुपयांच्या कर्जाचे पुनर्गठन झाले आहे.**

११ लाख ३५ हजार ३७२ शेतकऱ्यांच्या सुमारे पाच हजार कोटी थकीत पीक कर्जाचे पुनर्गठनही करण्यात येणार आहे. त्यासोबतच या कर्जावरील प्रथम वर्षाचे संपूर्ण व्याज व द्वितीय वर्षापासून चार वर्षाचे (२०१७-१८ ते २०२०-२१) ६ टक्के दराने होणारे व्याज असे एकूण अंदाजे १२७२ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या वतीने शासनाकडून बँकांना देण्यात येणार आहेत.

सततच्या दुष्काळी परिस्थितीत सापडलेल्या शेतकऱ्यांना पीक कर्ज पुरवठा होण्यासाठी संबंधित शेतकरी थकबाकीदार नसणे आवश्यक आहे. त्यामुळे २०१२-१३ व २०१३-१४ या दोन वर्षात ५० पेक्षा कमी





वर्षाची मुदतवाढ देऊन या रकमेवरील व्याजाचे ३६ कोटी शासनामार्फत बँकांना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे ५ लाख ३३ हजार ७४१ शेतकऱ्यांना या निर्णयाचा लाभ होणार आहे. तसेच शेतकऱ्यांच्या कर्जाच्या पुनर्गठनाच्या मूळ कालावधीत पुढील एक वर्षाने वाढ करण्यात येणार आहे. वर्ष २०१५-१६ मधील खरीप-२०१५ या हंगामातील पीक कर्जापैकी शासनाकडून ५० पेक्षा कमी पैसेवारी जाहीर केलेल्या गावातील

## कर्जाचे पुनर्गठन म्हणजे काय?

**शेतकऱ्यांवर खरीप किंवा रब्बी हंगामासाठी असणाऱ्या अल्प मुदतीच्या पीक कर्जाचे (क्रॉप लोन) मध्यम मुदतीच्या कर्जामध्ये रूपांतर करणे आणि परतफेडीचे हप्ते पाडणे म्हणजे कर्जाचे पुनर्गठन करणे. शासनाने यामध्ये पहिल्या हप्त्याचे १२७२ कोटी रुपयांचे व्याज शेतकऱ्यांच्या वतीने भरण्याचा निर्णय घेतला आहे.**

पैसेवारी जाहीर झालेल्या भागातील एकूण चार लाख ४२ हजार ९०२ शेतकऱ्यांकडे थकीत असलेल्या २४३८.९८ कोटी पीक कर्जाचे विशेष बाब म्हणून पुनर्गठन करण्यास मान्यता देण्याची विनंती; भारतीय रिझर्व्ह बँकेस करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या तिन्ही निर्णयांमुळे राज्यातील २१ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांच्या जवळपास ११ हजार कोटी रुपयांच्या कर्जाचे पुनर्गठन झाले आहे. त्यामुळे आगामी खरीप हंगामासाठी शेतकरी कर्ज घेण्यास पात्र ठरू शकतील.

### शेतकरी अपघात विमा

कुटुंबप्रमुख असणारा शेतकरी जर दगावला किंवा अपंग झाला, तर कुटुंब आर्थिक संकटात सापडते. या परिस्थितीत शेतकरी कुटुंबाला मोठ्या हिमतीने सावरावे लागते. दुर्दैवाने अपघात झाल्यास स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत विम्याची मदत दिली जाणार आहे. शासनाने सर्व खातेदार शेतकऱ्यांचा विमा उतरवला आहे. या योजनेंतर्गत



## शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी

**महाराष्ट्र शासनाने पीक कर्जाचे पुनर्गठन करून १२७२ कोटी रुपयांचे व्याज, शेतकऱ्यांच्या वतीने भरण्याचा निर्णय घेतला आहे. या हंगामात पेरणी करताना शेतकऱ्यांना पीक कर्ज घेण्यासाठी आता बँकांकडून अडवणूक होणार नाही, याची काळजी शासनाने घेतली आहे. दुष्काळी भागातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वात वॉर रूम गठित करण्यात आली आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्राच्या सद्य:स्थितीची रोजची माहिती मंत्रालयात अद्ययावत होत असून शासनाला परिस्थितीची पूर्ण जाणीव आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची समस्या, छावण्यांची आवश्यकता आणि येत्या हंगामात शेतकऱ्यांच्या शेतीविषयक कर्जाची उपलब्धता याबाबत शासन तातडीने निर्णय घेत असून; शेतकऱ्यांनी शासनाच्या मदतीबाबत निर्धास्त असावे.**

**– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

शेतकऱ्याचा अपघाती मृत्यू झाल्यास दोन लाख रुपये, अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन अवयव निकामी झाल्यास, एक डोळा व एक अवयव निकामी झाल्यास दोन लक्ष रुपये आणि अपघातामुळे एक डोळा अथवा एक अवयव निकामी झाल्यास एक लक्ष रुपये मदत दिली जाणार आहे. या लाभासाठी लाभार्थ्यांकडे सातबारा प्रमाणपत्र, ६ क, ६ ड (फेरफार) आदी पात्रता असावी. यामध्ये नोंदणीकृत असलेले १० ते ७५ वयोगटातील खातेदार शेतकऱ्यांचा विमा उतरवण्यात आला आहे. विमा संरक्षणासाठी रस्ता/रेल्वे अपघात, उंचावरून पडणे, बुडून मृत्यू, सर्पदंश, प्राणीदंश, खून, जनावराचा हल्ला, दंगल, वीज पडणे, विषबाधा, नक्षलवादी हल्ला व इतर अपघात आदींमधील अपघातांचा समावेश आहे. विम्याचा दावा करण्यासाठी दावा पत्र, वारसा नोंद, शेतकऱ्याचा वयाचा पुरावा, पोलीस (एफआयआर) किंवा जवाब, बँक पासबुक प्रत, सातबारा उतारा, तलाठी प्रमाणपत्र, ६ ड (फेरफार), उतारा ६ क, शवविच्छेदन अहवाल, पोलीस स्थळ पंचनामा, अपंगत्व आल्यास टक्केवारी प्रमाणपत्र, लाभार्थ्याच्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र, मृत्यू प्रमाणपत्र व पोलीस मरणोत्तर पंचनामा आदी कागदपत्रे आवश्यक आहेत. राज्यातील जवळपास १.३७ कोटी खातेदार शेतकऱ्यांचा विमा शासनाने उतरविला आहे. विम्याचा हप्ताही कंपनीकडे सुपुर्द करण्यात आला आहे. दुर्देवाने अपघात झाल्यास अशा संकटसमयी केवळ कृषी कार्यालयात अर्ज भरून अपघातग्रस्त शेतकरी कुटुंबीय विम्याची मदत मिळवू शकतात. एवढी सुटसुटीत लाभाची ही योजना आहे. सदर योजनेचा विमा कालावधी १ डिसेंबर २०१५ ते ३० नोव्हेंबर २०१६ आहे. या कालावधीसाठी विमा कंपनी म्हणून नॅशनल इन्शोरेन्स कंपनी व सल्लागार कंपनी म्हणून बजाज कॅपिटल इश्योरेन्स कंपनी राहणार आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अपघातानंतर लवकरात लवकर संबंधित जिल्हा/तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे आवश्यक कागदपत्रांसहित दावा अर्ज दाखल करावा. याकरिता कोणताही वकील किंवा एजंट नेमण्याची आवश्यकता नाही.

**निलेश तायडे, गजानन पाटील आणि टीम लोकराज्य**

## अशी आहे प्रधानमंत्री पीक विमा योजना

**योजनेची वैशिष्ट्ये:**

- प्रधानमंत्री फसल विमा योजना अर्थात प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत भारतीय कृषी विमा कंपनीबरोबरच योजनेत नमूद खासगी विमा कंपन्यांकडूनही विमा संरक्षण घेण्याची तरतूद.
- योजना क्षेत्र घटक धरून राबवण्यात येईल.
- योजना पीक कापणी प्रयोगाचा पूर्वीचा तपशील उपलब्ध असलेल्या सर्व पिकांसाठी राबवण्यात येईल.
- योजना कर्जदार शेतकऱ्यांना सक्तीची बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे.
- अपरिहार्य कारणासाठी पेरणी न होऊ शकलेल्या प्रकरणात विमा संरक्षणाच्या २५ टक्के नुकसान भरपाई तत्काळ देण्याची तरतूद.
- कापणी करून वाळवणी करण्यात येत असलेल्या पिकांकरिता कापणीनंतर १४ दिवसांपर्यंत संरक्षण देय.
- स्थानिक आपत्ती व कापणीनंतरचे नुकसान याकरिता वैयक्तिक पंचनामे करण्याची तरतूद.
- खराब हवामानामुळे सरासरीच्या ५० टक्के पेक्षा कमी उत्पन्न येण्याचा प्राथमिक अंदाज असल्यास विमा संरक्षणाच्या २५ टक्के नुकसान भरपाई आगाऊ देय.

**योजनेमध्ये संरक्षण मिळणाऱ्या बाबी :**

आग, वीज पडणे, वादळ, गारपीट, चक्रीवादळ, तापमानात वाढ, पूर, भुस्खलन, दुष्काळ, पावसातील खंड, रोग व किडीचा प्रादुर्भाव.

**विमा हप्ता :**

- **खरीप पिके :** विमासंरक्षित रकमेच्या २ टक्के
- **रब्बी पिके :** विमासंरक्षित रकमेच्या १.५ टक्के
- **नगदी पिके :** विमासंरक्षित रकमेच्या ५ टक्के
- यापुढील विमा हप्त्यातील देय रक्कम राज्य शासन व भारत सरकारद्वारे समप्रमाणात (५०:५०) देण्यात येईल.

**विमा संरक्षण :**

- कर्जदार शेतकऱ्यांच्या बाबतीत त्याने घेतलेले कर्ज अथवा सरासरी उत्पन्न यापैकी, अधिक असेल ती रक्कम.
- बिगर कर्जदार शेतकऱ्यांच्या प्रकरणात सरासरी उत्पन्नाइतकी रक्कम.

**नुकसानीची निश्चिती :**

- भारतीय कृषी विमा कंपनी अथवा स्वतंत्रपणे नियुक्त करण्यात येणाऱ्या यंत्रणेद्वारे करावयाची आहे.
- राज्य शासनाने यादीतील कंपन्यांकडून त्यांना पिकाबाबत आवश्यक तपशील उपलब्ध करून देऊन विमा हप्ता दर मागवावयाचे आहेत. सहभागी होणाऱ्या विमा कंपनीने अधिसूचित क्षेत्रातील सर्व पिकांसाठी दर देणे बंधनकारक आहे. अन्यथा सदर कंपनी अपात्र ठरेल

**नुकसान भरपाई :**

- जमा विमा हप्ता रक्कमेच्या ३५० टक्के अथवा विमा संरक्षण रक्कमेच्या ३५ टक्के यापैकी, अधिक असेल ती रक्कम विमा कंपनीने द्यावयाची आहे. उर्वरित रक्कम केंद्र व राज्य शासनाने समप्रमाणात द्यावयाची आहे.
- सरासरी उत्पन्न : मागील ७ वर्षातील २ खराब वर्ष वगळून उर्वरित ५ वर्षाचे उत्पन्न गृहीत धरण्यात यावे.

**उंबरठा उत्पन्न :** सरासरी उत्पन्नाच्या ७०/८०/९० टक्के.

# आव्हान आणि संधी...

**या वर्षी चांगल्या मान्सूनचे सूतोवाच हवामान खात्याने केले आहे. गेल्या तीन-चार वर्षांत दुष्काळामुळे कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्याला राज्य सरकारने कर्जाचे पुनर्गठन करून दिलासा दिला आहे. त्यामुळे पीक कर्जासाठी शेतकऱ्याची अडवणूक होणार नाही. शिवाय त्याला लागणारे बी-बियाणे, खते वेळेत आणि माफक दराने मिळेल याचे नियोजन सरकारने केले आहे. गत वर्षांच्या दुष्काळातून उभारी घेण्याची ही संधी असून कोणताही शेतकरी पीक कर्ज, बी-बियाणे, खते मिळण्यापासून वंचित राहता कामा नये, यासाठी 'मिशन मोड'वर काम करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीत प्रशासनास केल्या आहेत.**





मान्सूपूर्व तयारीचा भाग म्हणून २०१६ या वर्षासाठी राज्यस्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठक २८ एप्रिल रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे घेण्यात आली. राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असून शाश्वत शेतीचा विकास, शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीच्या दृष्टीने राज्याची तिजोरी खुली असल्याचे ठामपणे सांगत शेतीसाठी कोणत्याही परिस्थितीत निधी अपुरा पडू दिला जाणार नसल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली.

या बैठकीस कृषी मंत्री एकनाथराव खडसे, वित्त व नियोजन मंत्री सुधीर मुनगंटीवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री डॉ. दीपक सावंत, महिला व बालकल्याण मंत्री पंकजा मुंडे, आदिवासी विकास मंत्री विष्णू सवरा, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, परिवहन मंत्री दिवाकर रावते, पर्यावरण मंत्री रामदास कदम, गृहनिर्माण मंत्री प्रकाश महेता, ऊर्जा व नवीन न नवीकरणीय ऊर्जा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री बबनराव लोणीकर, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री राजकुमार बडोले, कृषी व फलोत्पादन राज्यमंत्री प्रा. राम शिंदे, सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे, कामगार राज्यमंत्री विजय देशमुख, सहकार राज्यमंत्री दादाजी भुसे, वित्त राज्यमंत्री दीपक केसरकर, गृहनिर्माण राज्यमंत्री रवींद्र वायकर, सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री प्रवीण पोटे-पाटील, नगरविकास राज्यमंत्री डॉ. रणजित पाटील, मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय आदींसह मान्यवर उपस्थित होते.

## विनाअडथळा पुरवठा

**यंदाचे वर्ष महाराष्ट्रातील दुष्काळ निवारणाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. या वर्षी मान्सूनची साथ लाभणार असल्याने प्रशासनाने 'मिशन मोड'वर काम करावे. पीक कर्ज वा पेरणीसाठी आवश्यक असलेली बि-बियाणे या सर्व गोष्टींचा पुरवठा शेवटच्या घटकापर्यंत विनाअडथळा खात्रीशीर झाल्यास शेती रुळावर येईल. शेतीचा शाश्वत विकास होणार असेल तर शेतकऱ्यांसाठी राज्याच्या तिजोरीचे दरवाजे सदैव खुले असतील.**

**देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**



**राजाराम देवकर**

राज्यात ठिबक व तुषार सिंचनाचे क्षेत्र वाढवण्यावर भर देण्यात आला आहे.  राज्यातील १.३७ कोटी खातेधारकांना ३ वर्षामध्ये जमीन आरोग्य पत्रिकांचे वितरण करण्यात येणार असून यामुळे खत वापरात व पर्यायाने उत्पादन खर्चात मोठी बचत होणार आहे. जलयुक्त शिवार अभियानातंर्गत राज्यातील टंचाईग्रस्त गावांमध्ये १.८५ लाख कामे सुरू आहेत. त्यापैकी १.४९ लाख कामे पूर्ण झाली असून या कामांवर मार्च १६ अखेर २०४७.९६ कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे. सर्वांसाठी पाणी-टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अभियान राबवण्यात येणार आहे.

कृषी विभागाने तयार केलेल्या 'पीक उत्पादकतेत स्थैर्य राखत उत्पादन खर्चात बचत' या पुस्तिकेचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते बैठकीदरम्यान विमोचन तसेच कृषी विभागाच्या प्रयोगशाळेत तयार झालेल्या जैविक खताचे लोकार्पण करण्यात आले.

नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई मिळण्यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप २०१६ पासून सुरू करण्यात येत असून खरीप पिकासाठी २ टक्के, रब्बी पिकासाठी १.५ टक्के व नगदी पिकांसाठी ५ टक्के दराने विमा हप्ता आकारण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत वैयक्तिक पंचनामा करून नुकसान भरपाई देण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत आता शेतकऱ्याला पेरणीपासून ते कापणीनंतरदेखील पीक संरक्षण मिळणार आहे.




खरीप हंगामपूर्व बैठकीदरम्यान 'पीक उत्पादकतेत स्थैर्य राखत उत्पादन खर्चात बचत' या पुस्तिकेचे लोकार्पण करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आदिवासी विकासमंत्री विष्णू सवरा, ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार, परिवहन मंत्री दिवाकर रावते, कृषी राज्यमंत्री प्रा. राम शिंदे आणि इतर मान्यवर.

### आव्हान आणि संधीचे वर्ष

गेल्या चार वर्षांपैकी तीन वर्षे दुष्काळाची राहिली आहे. यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. अशा स्थितीत दुष्काळनिवारणाचे हे प्रशासनासमोर मोठे आव्हान आहे. परंतु यंदा मान्सून अनुकूल असल्याने दुष्काळावर मात करून शेतीला उभारी देण्याची मोठी संधी आहे. त्यामुळे हे वर्ष आव्हान आणि संधीचे आहे, याकडे मुख्यमंत्र्यांनी लक्ष वेधले. या वर्षी 'मागेल त्याला शेततळे' या योजनेंतर्गत ५० हजार शेततळी निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी ऑनलाइन अर्जदेखील मागवले गेले. त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला. तब्बल ८० हजार एवढे अर्ज प्राप्त झाले असून अतिरिक्त अर्जांनादेखील मंजुरी देण्याबाबत, तसेच मागेल त्याला शेततळे देण्यासाठी जिल्ह्यांचे उद्दिष्ट वाढवून देण्यासाठी शासन सकारात्मक विचार करणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. शेततळे शाश्वत शेतीच्या दृष्टीने महत्त्वाचे असून, मोठे शेततळे मनरेगांतर्गत पूर्ण केल्यास; त्यासाठी येणाऱ्या लाखो रुपयांच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली.

## दृष्टिक्षेपात नियोजन

- **खरीप हंगाम २०१६ मध्ये १५० लाख हेक्टर पेरणीचे नियोजन**
- **पेरणीसाठी १०० टक्के बी-बियाणांचे नियोजन : १४.४३ लाख क्विंटल**
- **अपेक्षित उत्पादन : १६२ लाख मेट्रीक टन**
- **कापूस : ७५,०६,००० पाकिटांची मागणी. ८९ लाख पाकिटे उपलब्ध**
- **४०.२५ लाख मे. टन खतांचे नियोजन मंजूर. राज्याच्या मागणीप्रमाणे युरियाचा ५० हजार मेट्रिक टन अतिरिक्त पुरवठा करण्यास केंद्र सरकारची मंजूरी.**
- **फळबागेसाठी मनरेगांतर्गत १०० टक्के अनुदान**
- **शेतीला जोडधंदा म्हणून पशुधन वाढीसाठी १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये पशुधनासाठी ७५ टक्के अनुदान**
- **शेती व फळपिकांसाठी नवीन विमा धोरण राबविणार**
- **खरीप हंगाम २०१६ पासून प्रधानमंत्री पीक विमा योजना सुरू**
- **बी.टी. बियाणांचे भाव १०० रुपयाने कमी.**

## १५० लाख हेक्टर पेरणीचे उद्दिष्ट



**राज्यात आवश्यक असलेली सर्व बी-बियाणे व खते शंभर टक्के या प्रमाणे उपलब्ध असतील असे नियोजन राज्य सरकारने केले आहे. १५० लाख हेक्टर पेरणीचे नियोजन असून त्यासाठी १०० टक्के म्हणजेच १४ लाख ४३ हजार क्विंटल बियाणे उपलब्ध आहे. यातून १६२ लाख मेट्रीक टन उत्पादन अपेक्षित आहे. शिवाय मनरेगाच्या माध्यमातून 'फळ लागवड योजना' राबवून १ लाख हेक्टर जमीन फळबागेखाली आणली जाईल. यासाठी १०० टक्के अनुदान दिले जाणार आहे.**

**एकनाथराव खडसे, कृषी व फलोत्पादन मंत्री**

### नीम कोटेड युरिया

यापूर्वी पांढऱ्या युरियाचा मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग केला होता. त्यामुळे शेतकऱ्यांना पीकासाठी युरियाची कमतरता भासत होती. शिवाय या युरियाचे मोठ्या प्रमाणावर बाष्प होत असल्याने पिकांना त्याचा कमी उपयोग होत होता. यावर उपाय म्हणून केंद्र सरकारने नीम कोटेड म्हणजेच कडुलिंबाचे लेपण असलेल्या युरियाचे उत्पादन करून तो शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवला. या युरियाचे बाष्प होत नसल्याने यातील ८० ते ८५ टक्के नायट्रोजन पिकाला मिळतो.

**लातूरमधील पाणीटंचाई लक्षात घेता रेल्वेने तेथे गरज असेपर्यंत पाणी पाठवण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्यासाठी शासनाने अथक परिश्रम घेतले.लातूरकरांची गरज लक्षात घेऊन रेल्वेने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. या निर्णयाची अंमलबजावणी १९ एप्रिलपासून सुरू झाली. २० एप्रिलला ५० टँकरची (वॅगन) पहिली खेप लातुरात दाखल झाली. तत्पूर्वी रेल्वे प्रशासनाच्या पुढाकाराने ११ ते १९ एप्रिलपर्यंत १० वॅगन्सच्या जलदूतने लातूरला पाणीपुरवठा करण्यात आला. या रेल्वेला रेल्वे मंत्रालयाने जलद गाडीचा दर्जा दिला. यामुळे ही गाडी मिरज ते लातूर हे अंतर सहा तासात पूर्ण करू लागली. पहिल्या खेपेत तब्बल २५ लाख लीटर पाणी लातुरात आले. लातूर शहराला दरडोई दरदिवशी २० लीटर पाणी पुरवायचे ठरवले तर दररोज १ कोटी लीटर पाण्याची गरज आहे. रेल्वेमुळे यापैकी २५ टक्के गरज एकदम भागत आहे, हे लक्षात घेतले म्हणजे रेल्वेने आणल्या जाणाऱ्या पाण्याचे महत्त्व लक्षात येते.**

# लातूरकरांच्या अंगणी 'जलदूत' एक्सप्रेस

गेल्या ४ वर्षापासून लातूर शहरात अपेक्षित असा पाऊस पडला नाही. त्यामुळे यंदा लातूर शहराला तीव्र पाणीटंचाई जाणवत आहे. या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी रेल्वेद्वारे पाणीपुरवठा करण्याच्या शक्यतेचा विचार शासनाद्वारे करण्यात आला. त्या अनुषंगाने ५ एप्रिल २०१६ रोजी पहिली बैठक घेण्यात आली. ४८ तासात कृती आराखडा तयार करण्यात आला. अतिशय गतीने या आराखड्याप्रमाणे काम करण्यात येऊन १९ एप्रिल २०१६ रोजी ५० वॅगन्सची (टँकर) पहिली जलदूत एक्सप्रेस पाठवण्यात आली. याद्वारे २५ लाख लीटर पाणी लातूर शहरात आले.

मार्च महिन्यात मराठवाडा विभागातील लातूर, बीड, उस्मानाबाद या तीन जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्यात जाऊन मंत्र्यांनी दुष्काळी परिस्थिती आणि त्यावरील उपाययोजनांचा आढावा घेतला. या मंत्र्यांच्या पाहणी दौऱ्याअखेरीस लातूरमध्ये ४ मार्चला बैठक झाली. या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी लातूर शहरासाठी तातडीच्या आणि कायमस्वरूपी उपायाबाबत शासन गंभीर असून तातडीच्या उपयांचा भाग म्हणून प्रसंगी रेल्वेनेही पाणी पुरवठा केला जाईल असे सांगितले. रेल्वे मंत्री सुरेश प्रभू यांनीही लातूर शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी रेल्वे तयार असल्याचे सांगितले. लातूरला पंढरपूर येथून नव्हे मिरज येथून पाणी मिळणार हे स्पष्ट झाले. त्याच्या पूर्वतयारीसाठी राज्याचे महसूल तथा मदत व पुनर्वसन मंत्री एकनाथराव खडसे आणि जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी ५ एप्रिल रोजी लातूर शहराला भेट दिली. रेल्वे स्टेशन परिसराची पाहणी केली. संबंधित यंत्रणांची बैठक घेतली आणि लातूरला रेल्वेने पाणी पुरवठा करणे निश्चित झाले यंत्रणेने सगळी पूर्वतयारी पूर्ण करावी त्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात येत आहेत, असे श्री. खडसे यांनी सांगितले. रेल्वेने १५ दिवसात पाणी येईल हेही त्यांनी जाहीर केले.

या दौऱ्यानंतर शासनाची यंत्रणा युध्दपातळीवर गतिमान झाली. रेल्वेने येणारे पाणी साठविण्याचा प्रश्न रेल्वे स्थानकाशेजारी असलेल्या श्री. एस. आर. देशमुख यांच्या शेतातील विहिरीमुळे सुटला. या विहिरीतील गाळ तातडीने काढण्यात आला. विहिरीची डागडुजी करण्यात आली. शेततळ्याला जसे प्लास्टिकचे अच्छादन घातले जाते तसे या विहिरीला अच्छादन घालण्यात आले. विहिरीला संरक्षक जाळी बसवण्यात आली.

रेल्वेने आणले जाणारे पाणी विहिरीत साठवण्यासाठी रेल्वे रुळाशी समांतर सुमारे ८५० मीटर लांबीची सिमेंटची पाईपलाइन अंथरण्यात आली. शेतातील काळ्या मातीच्या थरांमुळे हे काम करणे सोपे नसते हे लक्षात घेणे आवश्यक आहे. ५० टँकरमधील पाणी या पाईपलाइनमध्ये सोडण्यासाठी ठिकठिकाणी पॉईंटस घ्यावे लागले.

विहिरीत साठविलेले पाणी उचलून टँकरमध्ये भरण्यासाठी मोठी व्यवस्था करावी लागली. त्यासाठी विहिरीपासून काही अंतरावर ८ टँकर पॉइंटस उभारण्यात आले, सुमारे २०० मीटर अंतराची पाईपलाईन टाकण्यात आली. पाणी उपसण्यासाठी २० अश्वशक्ती क्षमतेच्या १२ मोटारी बसवण्यात आल्या. या यंत्रणेसाठी आवश्यक तो वीज पुरवठा सतत सुरू राहावा म्हणून वीज मंडळाने तेथेच २०० के.व्ही.ए. क्षमतेचे रोहित्र बसवले. या रोहित्रावरून २४ तास वीज पुरवठा सुरू राहावा, यासाठी एक्सप्रेस फिडर बसवण्यात आले.

ही सर्व कामे पूर्ण करण्याकरिता जिल्हाधिकारी पांडुरंग पोले व त्यांच्या



सहकाऱ्यांनी अहोरात्र मेहनत घेतली.

तिकडे मिरजला रेल्वेत पाणी भरणारी यंत्रणा सज्ज झाली होती. या यंत्रणेशी लातूरच्या यंत्रणेचा सतत समन्वय होता. लातूरकरांची गरज लक्षात घेऊन रेल्वेने ५० टँकरने पाणी पुरवठा करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाची अंमलबजावणी १९ एप्रिलपासून सुरू झाली. रेल्वेने आणलेले पाणी विहिरीत ओतल्यानंतर टँकरने आर्वी येथील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत नेले जाते. तेथून ते टँकरनेच वितरित केले जाते. आता रेल्वेस्थानक ते आर्वी येथील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत नवीन पाईपलाइन टाकली जात आहे. हे काम युद्धपातळीवर सुरू आहे. ते पूर्ण झाले म्हणजे मिरजहून आलेल्या पाण्याची, जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत कार्यक्षमतेने वाहतूक होऊ शकेल.

### साठा उत्तरांची कहाणी सुफळ संपूर्ण

लातूरची पाणीबाणी लक्षात घेऊन उजनी धरणातून पाणी देण्याचा विचार प्रारंभी करण्यात आला. मात्र, काही अडचणींमुळे ऐनवेळी मिरजहून पाणी देण्याचा पर्याय पुढे आला. सांगली जिल्हा प्रशासन, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि रेल्वे प्रशासनाच्या टीमवर्कने भगीरथ प्रयत्नांनी हा पर्याय सार्थ ठरवत शासकीय मदतकार्याचा नवा अध्याय लिहिला. लातूरला मिरजवरून रेल्वने पाणी देण्याचा पर्याय पुढे आल्यानंतर जिल्हाधिकारी शेखर गायकवाड यांनी जिल्हा प्रशासनाच्या वतीने सर्व सूत्रे हाती घेतली. या कामासाठी १ कोटी, ८५ लाख रुपये खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.

कृष्णा नदीपासून मिरज रेल्वे यार्डापर्यंत ७ किलोमीटर अंतर आहे. त्यापैकी नदीपासून जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत ४.५ किलोमीटर अंतरावर जलवाहिनी अस्तित्वात आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने जलशुद्धीकरण केंद्र ते मिरज रेल्वे यार्ड या उर्वरित २७०० मीटर अंतरावर नवीन जलवाहिनी टाकण्याचे काम युद्धपातळीवर केले. रेल्वेच्या जॅकवेलमध्ये ५० अश्वशक्तीचा नवीन व्ही. टी. (व्हर्टिकल टर्बाइल) पंप टाकण्यात आला. त्यामुळे लातूरसाठी अतिरिक्त पाणी मिळणार आहे. रेल्वेच्या सध्या अस्तित्वात असलेल्या ३०० एमएमडीआयके ९ यंत्रणेशिवाय ३१५ मिमी व्यासाची पीव्हीसी ६ केजी पाइप, ३०० मिमी व्यासाची एमएस पाइप आणि डीआयके ९ पाइप टाकण्यात आली. हैदरखान विहिरीवर २५ अश्वशक्तीचे ३ सबमर्सिबल पंप बसवण्यात आले.





### अशी धावली 'जलदूत'

- ५ एप्रिल – पहिली बैठक
- ४८ तासात – कृती आराखडा
- ९ एप्रिल – चर खोदण्यास प्रारंभ
- ११ एप्रिल – जलदूत १ रवाना (सकाळी ११.११), क्रॉस कनेक्शन, रेल्वे क्रॉसिंग पहिला टप्पा काम पूर्ण
- १२ एप्रिल – शासनाची मंजुरी
- १३ एप्रिल – जलदूत २
- १४ एप्रिल – जलदूत ३
- १५ एप्रिल – जलदूत ४, क्रॉसिंग दुसरा टप्पा काम पूर्ण
- १६ एप्रिल – जलदूत ५ रेल्वे यार्डातील पाणी भरण यंत्रणा, २५ जलस्तंभाचे काम पूर्ण
- १७ एप्रिल – जलदूत ६ (पहाटे २)
- १७ एप्रिल – जलदूत ७ (रात्री ११)
- १८ एप्रिल – जलदूत ८ पीव्हीसी पाइपचे काम पूर्ण, पाणीवहनाची ५० वॅगन्सची यशस्वी चाचणी (२५ लाख लीटर प्रती खेप)
- १९ एप्रिल – जलदूत ९ वॅगन्समध्ये पाणीभरण
- १९ एप्रिल – ५० वॅगन्सची पहिली जलदूत

२७०० मीटरच्या कामात ६ ठिकाणी रेल्वेरुळाखालून जलवाहिनीचे काम करण्यात आले आहे. कृष्णा घाट येथे महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाकडून वीज जोडणी घेण्यात आली. रोज १० तास पंपिंगद्वारे हैदरखान विहीर येथे पाणी आणून तिथून ते पाणी २५ अश्वशक्तीच्या सबमर्सिबल पंपाने रेल्वे यार्डमध्ये जिथे वॅगन्समध्ये पाणी भरण्यात येणार आहे. आवश्यकतेनुसार रेल्वे स्थानकामधूनच पंपांवर नियंत्रण ठेवता येणार आहे. त्यामुळे सर्व यंत्रणा सक्षमतेने चालेल आणि पाण्याचा अपव्यय टाळण्यास मदत होईल. एका वेळी २५ वॅगन्समध्ये पाणी भरू शकू, अशी यंत्रणा सज्ज झाली आहे. किमान एक वर्षाचा कालावधी लागणारे काम १० दिवसांत पूर्ण झाले आहे. मिरज जंक्शनवरून, जिथे राष्ट्रीय आणि राज्यातील रेल्वेची सतत वर्दळ असते, तिथे फलाटावर टँकरमध्ये पाणी भरण्यासाठी रेल्वेचे व्यवस्थापक आणि स्टेशन प्रबंधक यांच्याकडे आग्रह धरण्यात आला. फलाट रिकामा मिळाला की वॅगन्स फलाटावर आणि दुसरी ट्रेन आली की वॅगन्स परत यार्डात अशा रीतीने पाणी भरण्याची कसरत करण्यात आली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या जलवाहिनीचे काम पूर्ण होईपर्यंत रेल्वे प्रशासनाने ट्रेनचे नेहमीचे वेळापत्रक कुठेही कोलमडू न देता आपल्या परीने १० वॅगनद्वारे पाणी देण्याचा नित्यक्रम ठेवला.

**राधाकृष्ण मुळी, संचालक (माहिती), मराठवाडा विभाग; अरुण सूर्यवंशी, जिल्हा माहिती अधिकारी, लातूर आणि संप्रदा बीडकर, माहिती अधिकारी, सांगली व टीम लोकराज्य**




**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने गेल्या २ वर्षात अनेक महत्त्वाच्या योजना घोषित केल्या आहेत. या योजनांमध्ये उद्योग आणि गुंतवणूकवाढीसाठी 'मेक इन इंडिया' तरुणांमध्ये कौशल्य निर्मितीसाठी 'स्किल इंडिया', शहरांच्या नवनिर्माणासाठी 'स्मार्ट सिटी', स्वच्छतेसाठी 'स्वच्छ भारत', शेतकऱ्यांसाठी 'प्रधानमंत्री फसल बीमा योजना', मुलींसाठी 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' आणि 'सुकन्या समृद्धी योजना', गरिबांसाठी 'अटल पेंशन योजना' आदी सर्व क्षेत्रातील योजनांचा समावेश आहे. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जात असून त्यामुळे देश गतिमानतेने प्रगती आणि विकासाची नवी शिखरे गाठत आहे.**

# नवी झेप उत्कर्षाची

## मेक इन इंडिया

मेक इन इंडिया केंद्र शासनाची महत्त्वकांक्षी योजना असून या योजनेंतर्गत जगभरातील तसेच भारतातील बहुराष्ट्रीय कंपन्यांना त्यांच्या वस्तुंचे उत्पादन भारतात करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यासाठी त्यांना सुलभ सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून जगभरातील कंपन्यांना एकत्रित आवाहन करण्यासाठी पहिल्या 'मेक इन इंडिया वीक'चे आयोजन मुंबईत १३ ते १८ फेब्रुवारी, २०१६ रोजी करण्यात आले होते.

## प्रधानमंत्री कौशल्य विकास आणि उद्योजकता अभियान (स्किल इंडिया) :

केंद्र शासनाच्या कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयामार्फत हे अभियान राबवले जात असून याची सुरुवात जुलै, २०१५ मध्ये करण्यात आली. भारतातील बहुसंख्य लोकसंख्या तरुण असून या तरुणांना कौशल्यावर आधारित प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार उपलब्ध करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

## डिजिटल इंडिया कार्यक्रम

भारतातील नागरिकांना सर्व नागरी सुविधा ऑनलाइन उपलब्ध व्हावी आणि नवनवीन माहिती व तंत्रज्ञान सुविधेतून त्यांना शासनाच्या विविधांगी योजनांचा लाभ व्हावा, यासाठी केंद्र शासनाच्या दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञान विभागाने जुलै, २०१५ मध्ये ही योजना सुरू केली आहे.

MAKE IN INDIA

Skill India

## स्टार्टअप इंडिया-स्टॅण्डअप इंडिया

ग्रामीण व शहरी भागातील युवकांना स्वयंपूर्ण बनविण्यासाठी या मोहिमेची सुरुवात जानेवारी २०१६ मध्ये करण्यात आली. लहान व मध्यम उद्योगांना सुरू करण्यासाठी युवकांमध्ये आवश्यक कौशल्य विकास करणे, पतपुरवठा करणे व व्यवसायाभिमुख मार्गदर्शन उपलब्ध करणे यासाठी या मोहिमेची सुरुवात केली आहे.

## स्मार्ट सिटी

केंद्रीय नगर विकास मंत्रालयाअंतर्गत शहरांच्या विकासालाच लक्षात घेऊन ही योजना तयार करण्यात आली आहे. नगर रचना आणि विकासाला मूर्त स्वरूप देण्यासाठी आणि उत्तम नागरी सुविधा व नागरी सुविधांचा दर्जा वाढविण्यासाठी या योजनेची सुरुवात करण्यात आली.

## अटल मिशन फॉर रिज्युव्हेनेशन ॲण्ड अर्बन ट्रान्सफॉर्मेशन (अमृत)

भारतातील अल्प विकसित आणि विकसनशील लहान शहरांना मोठ्या शहरांसारख्या सुविधा बहाल करून उत्तम नागरी सुविधा व नागरी सुविधांचा दर्जा वाढवण्यासाठी या योजनेची जून, २०१५ मध्ये सुरुवात करण्यात आली.

## अटल पेंशन

माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या नावाने निवृत्ती वेतनाबाबतची अटल पेंशन या नावाने असणारी ही योजना ९ मे, २०१५ रोजी सुरू करण्यात आली.

## प्रधानमंत्री जन-धन

सर्व सामान्य नागरिकांचा बचतीकडे कल वाढवून त्यांना बँकेचे व्यवहार ज्ञात करणे व त्यामाध्यमातून बँकेचे खाते उघडणे, योजनेंतर्गत भरपाई मिळवणे, कर्ज मिळवणे, विमा मिळवणे, निवृत्ती वेतन मिळवणे आदी सुविधांशी जोडण्यासाठी प्रधानमंत्री जन धन योजना ऑगस्ट, २०१५ मध्ये सुरू केली.

## स्वच्छ भारत अभियान

नागरिकांच्या सहभागातून आपला परिसर, रस्ते, गाव व शहरे स्वच्छ व नीटनेटकी करण्यासाठी २ ऑक्टोबर, २०१४ रोजी या योजनेचा शुभारंभ करण्यात आला. यामध्ये शहरी व ग्रामीण स्वच्छता अभियानाचा सहभाग आहे. व्यक्तिगत व सार्वजनिक शौचालय निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. २ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत देशातील प्रत्येक नागरिकांना शौचालयासह स्वच्छता सुविधा उपलब्ध करण्याचा मुख्य उद्देश या मोहिमेंतर्गत ठेवण्यात आला आहे.

## बेटी बचाव बेटी पढाव

देशात स्त्री-भृणहत्येवर निर्बंध आणणे, मुलींना शिक्षणाची हमी देणे यासाठी व मुलींना सामाजिक व आर्थिक संरक्षण बहाल करणारी महत्त्वाकांक्षी योजना म्हणून 'बेटी बचाव व बेटी पढाव' योजना जाहीर करण्यात आली आहे. २२ जानेवारी, २०१५ रोजी या योजनेची घोषणा करण्यात आली. महिला व बालकल्याण आणि मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने ही योजना राबवली जात असून योजनेच्या सुरुवातीलाच यासाठी १०० कोटी रुपयांची सबळ तरतूद करण्यात आली आहे.

## सुकन्या समृद्धी

केंद्र शासनाच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत मुलींच्या समान हक्कासाठी आणि आर्थिक सबलतेसाठी तयार करण्यात आलेली ही योजना आहे. मुलांच्या तुलनेत मुलीकडे दुर्लक्ष केले जाते त्यामुळे मुलींना आर्थिकदृष्ट्या सक्षमता प्रदान करण्यासाठी जानेवारी, २०१५ मध्ये ही योजना सुरू करण्यात आली.

## प्रधानमंत्री आवास

जून, २०१५ मध्ये शहरी भागात राहणाऱ्या लोकांच्या राहणीमानात बदल करण्यासाठी व त्यांचा आर्थिक विकास करण्यासाठी नवीन घरे निर्माण करण्याच्या क्षेत्रात उचललेले धाडसी पाऊल म्हणून प्रधानमंत्री आवास योजनेचा उल्लेख केला जातो.

## ग्राम उदय से भारत उदय अभियान

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती कार्यक्रमात त्यांचे जन्मस्थान महू येथे 'ग्राम उदय से भारत उदय' अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. या योजनेचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण देशातील ग्रामीण भागात सामाजिक सौहार्द वाढविणे, पंचायत राजव्यवस्था बळकट करणे, ग्रामीण विकासाला चालना देणे आणि सामान्य शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा करणे हे आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी १४ एप्रिल, २०१६ रोजी या मोहिमेची सुरुवात केली.

## प्रधानमंत्री सुरक्षा विमा

सामान्य नागरिकांना विमा कवच बहाल करण्यासाठी आणि मोठ्या प्रमाणातील लोकांना अपघातानंतर आवश्यक आर्थिक साहाय्य मिळावे या हेतूने सर्वसामान्य माणसाला परवडेल अशा विमा कवचाची ही योजना मे, २०१५ मध्ये सुरू करण्यात आली आहे. या योजनेमध्ये केवळ १२ रुपये प्रतिवर्षाने अपघाती विमा देण्यात येत आहे.

## प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा

घरातील कर्त्याच्या किंवा कोणत्याही व्यक्तीच्या अपघाती मृत्यूनंतर त्या घरावर मोठ्या प्रमाणात आर्थिक संकट कोसळते अशा अपवादात्मक परिस्थितीमध्ये केवळ ३३० रुपये वार्षिक हप्त्यामध्ये २ लाख रुपयांच्या विम्याचे कवच या योजनेंतर्गत बहाल करण्यात आले आहे. वित्त विभागाने मे, २०१५ मध्ये ही योजना सुरू केली आहे.

### हेरीटेज सिटी डेव्हलपमेंट ॲण्ड ॲग्युमेंटेशन योजना

केंद्र शासनाच्या नगरविकास मंत्रालयाने जानेवारी, २०१५ मध्ये या योजनेला सुरुवात केली. या योजनेंतर्गत आपल्या देशातील प्राचीन सभ्यता जोपासणाऱ्या शहरातील वारसांना जोपासतांनाच या शहरांना आधुनिक बनवण्याचा संकल्प या योजनेद्वारे करण्यात आला. प्राचीन भारतीय सभ्यतेला आधुनिक स्वरूपात जगापुढे मांडण्यासाठी या योजनेची सुरुवात करण्यात आली आहे.

### प्रधानमंत्री फसल विमा योजना

ग्रामीण भारतातील शेतकऱ्यांना शेती विषयात स्थैर्य आणण्यासाठी व कृषी क्षेत्राला आर्थिक बळकटी देण्यासाठी प्रधानमंत्री फसल विमा योजना केंद्र शासनाने जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांच्या पीक विम्याचा हप्ता केंद्र व राज्य शासन भरणार असून कमी हप्त्यामध्ये अधिक भरपाई देण्याचा उद्देश ठेवण्यात आला आहे. हा विमा ॲग्रीकल्चर इंश्युरन्स कंपनीच्या अंतर्गत काढण्यात येणार आहे.

### प्रधानमंत्री संसद आरोग्य ग्राम योजना

देशातील प्रत्येक खासदाराने आपल्या मतदार संघातील एक गाव दत्तक घेऊन त्यामध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध कराव्यात, त्या गावाचा पथदर्शी आदर्श गाव म्हणून विकास करावा यासाठी या योजनेची घोषणा ११ ऑक्टोबर, २०१४ रोजी करण्यात आली.



मुंबईत झालेल्या 'मेक इन इंडिया वीक'मध्ये महाराष्ट्र दालनात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे स्वागत करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### प्रधानमंत्री ग्राम सिचाई योजना

कृषी मंत्रालयांतर्गत प्रधानमंत्री ग्राम सिचाई योजनेची घोषणा १ जुलै, २०१५ रोजी करण्यात आली. शेतकऱ्यांची आर्थिक आत्मनिर्भरता वाढावी यासाठी पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा वापर करून सूक्ष्म सिंचन, जलपुर्नभरण, जलसंधारण क्षेत्रात प्रगती करण्यासाठी या योजनेची आखणी करण्यात आली आहे.

## दोन वर्षात महाराष्ट्राचा लाभ

२६ मे २०१४ रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शपथ घेतली, त्यानंतर लगेच सहा महिन्यात महाराष्ट्रात सत्तांतर होऊन मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस विराजमान झाले. त्यावेळी महाराष्ट्रात दुष्काळी परिस्थिती होती. शाश्वत सिंचनासाठी मुख्यमंत्री आग्रही असताना, प्रधानमंत्र्यांनी देशातील नैसर्गिक आपत्तीमुळे दुष्काळाला सामोरे जाणाऱ्या राज्यांसाठी; गठित केलेल्या उच्चाधिकार समितीला राज्यातील दुष्काळाची समीक्षा करायला लावली. या समीक्षेनंतर केलेल्या शिफारशीवर राज्याला, आतापर्यंत जाहीर झालेल्या केंद्रीय मदतीचा उच्चांक गाठणारी ३ हजार ५० कोटी रुपयांची मदत करण्यात आली. मराठवाड्यातील दुष्काळासंदर्भात प्रधानमंत्र्यांनी एप्रिल महिन्यात उच्चस्तरीय समितीला समीक्षा करायला सांगितली आहे. प्रधानमंत्री कार्यालयाचे मराठवाड्यातील परिस्थितीवर बारकाईने लक्ष असून, सर्व उपाय संपल्यावर मिरजेतून लातूरला पाणी पुरवठा करण्याच्या प्रस्तावाची तातडीने झालेली अंमलबजावणी हे त्याचेच द्योतक आहे.

या वर्षी केंद्राने दोन मोठे कार्यक्रम महाराष्ट्राच्या आर्थिक स्थितीला बळकटी आणण्यासाठी दिले आहेत. देशाच्या अर्थव्यवस्थेला गती देण्याचा मूळ उद्देश असला तरी भारताची आर्थिक राजधानी असणाऱ्या मुंबई शहराला, प्रधानमंत्री मोदी यांच्या लेखी किती महत्त्व आहे ही बाब यामधून अधोरेखित होते. हे दोन कार्यक्रम म्हणजे वांद्रे-कुर्ला संकुलात झालेले 'मेक इन इंडिया वीक' आणि गोरेगाव येथे झालेली 'मेरी टाइम समिट'. या दोन्ही मोठ्या कार्यक्रमांकडे जगाचे लक्ष वेधले गेले. १३ ते १८ फेब्रुवारी

अटल पेंशन योजना

प्रधानमंत्री जन-धन योजना
मेरा खाता भाग्य विधाता

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

दरम्यान झालेल्या मेक इन इंडिया सप्ताहामध्ये एकट्या महाराष्ट्राला ८ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची हमी मिळाली.

या सप्ताहामध्ये २५९४ सामंजस्य करार झाले. या ८ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून ३० लाख नवीन रोजगारांची निर्मिती होणार असून मुंबईत झालेल्या या गुंतवणूक सप्ताहामध्ये देशाला १५ लाख २० कोटी रुपयाच्या गुंतवणुकीची हमी मिळाली आहे. १०२ देश आणि १७ राज्याच्या या आयोजनाचा महाराष्ट्राच्या अर्थकारणावर दूरगामी परिणाम झाला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या आयोजनात घेतलेल्या पुढाकाराचेही राष्ट्रीय राजकारणात कौतुक झाले आहे.

केंद्राच्या मदतीने महाराष्ट्रात मुंबई येथे वांद्रे-कुर्ला संकुलात जागतिक दर्जाचे आंतरराष्ट्रीय व्यापारी केंद्र उभे राहत आहे. इंदू मिल्स् येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक आणि अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकासंदर्भातील पर्यावरणविषयक परवानगी, केंद्राकडून मिळाली आहे.

पश्चिम घाटावर कोकणामध्ये तेल शुद्धीकरण प्रकल्पाला केंद्रीय पेट्रोलियम मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी मान्यता दिली आहे. इंडियन ऑयल, भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड, हिंदुस्थान पेट्रोलियम या कंपन्यांद्वारे चालवला जाणारा हा १ लक्ष कोटी रुपयांची गुंतवणूक असणारा प्रकल्प आहे. कोकणात हा प्रकल्प सुरू झाल्यावर एक लाख लोकांना रोजगार मिळणार आहे. लातूरची तहान भागवण्यासाठी मिरजेतून रेल्वे पाणी पोहोचवण्यासाठी केंद्र शासनाची मदत झाली. जेव्हा सर्वच मार्ग संपले तेव्हा हा जुना लोहमार्ग पाणी एक्सप्रेसच्या कामी आला. परंतु या वर्षात केंद्राकडून अत्यंत भरीव असे योगदान रेल्वे संदर्भात राज्याला मिळाले आहे.

२३ हजार कोटी रुपयांच्या नऊ प्रमुख रेल्वे प्रकल्पांना या वर्षी रेल्वे अर्थसंकल्पानंतर गती मिळाली आहे. पनवेल ते सीएसटी रेल्वे आणि रोड असा मल्टिमोडल एलिवेटेड कॉरिडॉर, पहिल्या टप्प्यात बांद्रा ते विरार, दुसऱ्या टप्प्यात बांद्रा ते चर्चगेट असे कॉरिडॉर विकसित करण्यात येणार आहेत. अहमदनगर-बीड-परळी वैजनाथ, वर्धा-यवतमाळ-नांदेड, वडसा-गडचिरोली, नागपूर-नागभीड, पुणे-नाशिक, मनमाड-धुळे-इंदौर, गडचिरोली-आदिलाबाद, बारामती-लोणंद, कोल्हापूर-वैभववाडी हे मार्ग लवकरच पूर्ण करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून, हे प्रकल्प चार वर्षात पूर्ण करण्यात येणार आहेत. याशिवाय मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, मेट्रो आणि नवी मुंबई-बेलापूर-पेंढार मेट्रो प्रकल्पाला पर्यावरण विभागाकडून मान्यता मिळाली असून हे प्रकल्प २०१९ पर्यंत टप्याटप्याने पूर्ण होऊ शकतील. १२ हजार कोटी रुपये किंमतीच्या महत्त्वाकांक्षी सागरी रस्ते प्रकल्पालाही यावर्षात गती मिळणार आहे. यावर्षी सप्टेंबर २०१६ला महिन्यात प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याची अपेक्षा आहे. वडाळा-ठाणे-कासरवडवली मेट्रो प्रकल्प येत्या जून महिन्यात सुरू होईल.

केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी देशभरातील रस्त्यांचे चित्र बदलण्याचा विडा उचलला असून मंबई-नागपूर हे अंतर कमी करणारा सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस वे पुढच्या साडेतीन वर्षात पूर्ण होण्याची अपेक्षा असून केंद्राकडून याला भरपूर पाठबळ मिळत आहे. कमी विकसित असणाऱ्या १४ जिल्ह्यांतून हा मार्ग जाणार असून कृषी आधारित व्यापार-उद्योगाला यामुळे चालना मिळेल, अशी अपेक्षा आहे. ३० हजार कोटी रुपयांचा हा प्रकल्प आहे. याशिवाय महाराष्ट्रात २ लाख कोटी रुपयांचे महामार्ग उभे राहतील, असे आश्वासन केंद्राकडून मिळाले आहे.

**डॉ. विजय पवार**

**(लेखक हे नागपूर येथील ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**

**संपर्क : ०९८८१२०२१९३**

## महाराष्ट्रासाठी महत्त्वाचे निर्णय

- मुंबई सागरी मार्ग प्रकल्पाला पर्यावरण मंत्रालयाची मंजुरी
- केंद्रीय अर्थ संकल्पात शेंद्रा-बिडकीन, दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉरसाठी तरतूद
- महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्प पूर्ण करण्याकरिता कंपनी स्थापन करण्याची घोषणा
- महाराष्ट्रातील ३८ रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास करण्याचा केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय
- पुणे मेट्रोला गती
- 'स्मार्ट सिटी योजनेसाठी' महाराष्ट्रातील १0 शहरांची निवड महाराष्ट्रातील स्मार्ट शहरांसाठी २0 कोटी रुपयांचा निधी मंजूर
- नागपुरात इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस (एम्स) आणि इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट उभारण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी
- दुष्काळ निवारणासाठी महाराष्ट्राला ३ हजार ५0 कोटी रुपयांची मदत
- माळढोक पक्षी अभयारण्याचे क्षेत्र ४00 चौ.कि.मी.करणार
- केंद्राकडून मुंबई सागरी मार्गासाठी अंतिम अधिसूचना जारी
- 'मुंबई-काझीपेट आनंदवन एक्सप्रेसचा' शुभारंभ
- मुळा-मुठा नदी शुद्धीकरणासाठी केंद्र सरकारचा जपान सरकारसोबत १ हजार कोटी रुपयांचा करार
- नागपूर शहराच्या विकासासाठी फ्रान्ससोबत महाराष्ट्राचा करार
- महाराष्ट्रात राखीव बटालियन स्थापन करण्यास मंजुरी
- मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते ' व्हिजिट महाराष्ट्र' २0१७ या पर्यटन वर्षाचा दिल्लीत शुभारंभ
- 'सेतू भारत' अंतर्गत महाराष्ट्रातील १२ मार्गांवर पूल बांधण्यात येणार
- नागपूर मेट्रो प्रकल्पासाठी ३ हजार ७५0 कोटी रुपयांचा करार

## एक दिवस मंत्र्यांसोबत

**खानदेशासह महाराष्ट्राच्या समाजजीवनावर आपल्या नेतृत्वाने आणि सर्वसमावेशकतेने गारुड करणारे लोकनेते महसूल मंत्री एकनाथराव खडसे यांची लोकप्रियता अनुभवायची असेल, तर त्यांच्या मतदार संघात त्यांच्यासोबत दौऱ्यावर जाणे हा एक वेगळा अनुभव असतो. महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या अनेक दशकांपासून आपला ठसा उमटवणाऱ्या खडसे साहेबांना लोकांप्रती असणाऱ्या जिव्हाळ्याने लोकनेते केले आहे. त्यामुळे उन्हातान्हात हजारोंचा जनसमुदाय मतदार संघात त्यांना ठिकठिकाणी भेटायला तयार असतो. त्यांच्या सोबत एक दिवस घालवताना त्यांच्या अफाट लोकप्रियतेचे आणि कार्यतत्परतेचे दर्शन ठिकठिकाणी होते.**





# अविरत, अविश्रांत..

*'बापाजीच्या हायलीत*
*येती शेट शेतकरी*
*दारी खेटराची रास*
*घरी भरली कचेरी'*

खानदेश कवयित्री बहिणाबाई चौधरी यांनी आपल्या 'माहेर' या कवितेत आपल्या वडलांच्या श्रीमंतीचे वर्णन करताना या ओळी लिहिल्या आहेत. माणसाची श्रीमंती ही त्याच्याकडे किती माणसांचा राबता आहे यावरून मोजली जाते. थोडक्यात 'लोकसंग्रह' हा श्रीमंतीचे द्योतक मानला जातो. हा निकष लावला तर राज्याचे महसूल, कृषी मंत्री आणि जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथराव खडसे हे 'कुबेर' पदाला जाऊन पोहोचले आहेत, असेच म्हणावे लागेल. अफाट लोकसंग्रह आणि लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी अविरत आणि अविश्रांतपणे चाललेले त्यांचे अथक प्रयत्न. श्री. खडसेंच्या या सेवाभावीवृत्तीमुळे जनसामान्यांशी जोडली गेलेली नाळ ही त्यांना 'नाथाभाऊ' हे प्रेमाचं बिरुदही देते. त्यांच्या अविश्रांत लोकसेवेतला टिपलेला एक दिवस.




जळगाव शहरातल्या 'मुक्ताई' बंगल्याचा दिवाणखाना सकाळी नऊ वाजल्यापासून माणसांनी

**मिलिंद दुसाने**

फुलून गेला आहे. साहेब बेडरूममध्ये तयार आहेत. काही निवडक अधिकाऱ्यांना कामांच्या सूचना द्यायच्या आहेत. हे काम बेडरूममधूनच आटोपले जाते. अधिकारी कामाला लागतात. साहेब जिना उतरून खाली येतात आणि लोकांच्या गर्दीत सामील होतात ते पुढे दिवसभर याच गर्दीचे होऊन जातात.

साहेबांच्या जीवनपटासाठीच्या चित्रीकरणाला ही



शेतकरी मेळाव्याला संबोधित करताना एकनाथराव खडसे.

सकाळची वेळ दिलेली आहे. लोकांना नमस्कार करुन ते चित्रीकरणासाठी बसतात. चित्रीकरण आटोपून बाहेर येतात. लोक साहेबांना भेटण्यासाठी उत्सुक. कुणाचे काही काम अडले आहे, कुणाच्या ग्रामपंचायतीसाठी निधी हवा आहे, आपल्या भागातील रस्त्याची समस्या कुणी मांडतेय, कुणाला आपल्या मुलीच्या लग्नाची पत्रिका द्यायची आहे. साहेब सगळ्याचा हसतमुखाने स्वीकार करतात. 'भाऊ, येनं पडीन बरं' हा प्रेमळ आग्रहही स्वीकारतात. त्यांना बाहेर पडायचे आहे. दाराशी उभ्या गाडीजवळ काही महिला साहेबांना भेटतात. एका महिलेची मुलगी डॉक्टर झाली म्हणून ती त्यांना भेटायला आली आहे तर दुसऱ्या महिलेला वैद्यकीय उपचारासाठी मदत हवी आहे. गाडीत बसता बसता साहेब त्यांच्या मदतीची व्यवस्था करतात.

त्यानंतर ते बोदवड तालुक्याकडे निघतात. जळगाव शहरात एका आप्तेष्टांकडे भेट देऊन गाड्यांचा ताफा बोदवडच्या दिशेने निघतो. महामार्गावर नशिराबाद येथून बोदवडकडे जाणाऱ्या रस्त्याला ताफा वळतो. जाता जाता रस्त्यात लागणाऱ्या शिंदी, मानमोड मुक्तळ अशा गावांमध्ये भर उन्हात कार्यकर्ते व चाहते उभे असतात. त्यांना भेटून, विचारपूस करून ताफा पुन्हा पुढे. रस्त्यात थांबून साहेबांना शेतकरी भेटतात. ताफा जलचक्र गावात येतो. तेथे ग्रामपंचायतीच्या कार्यालयाचे उद्घाटन साहेबांच्या हस्ते होते. तेथून लगेच एका हॉटमिक्स प्लॅन्टचे उद्घाटन आणि शेतकरी मेळावा या कार्यक्रमांसाठी साहेब निघतात. त्यादरम्यान साहेब एका ठिकाणी थांबून सोबत आणलेल्या डब्यातले जेवण घेतात. जेवणानंतर लगेचच शेतकरी मेळाव्याला सुरुवात होते.

या मेळाव्यात स्वागत सत्काराचे सोपस्कार पार पाडल्यानंतर साहेबांचे संबोधन सुरू होते. स्वतः शेतकरी असलेल्या साहेबांनी उपस्थित शेतकऱ्यांना पीक पद्धती, पाणी बचत, शेतीचा विकास, त्यासाठी शासन करत असलेले प्रयत्न आणि शेतकऱ्यांकडून अपेक्षित प्रत्यक्ष कृती याबद्दल मार्गदर्शन करून प्रोत्साहित करतात. नकारात्मक वातावरणात शेतकऱ्यांनी मरगळ झटकून कामाला लागावे, शासकीय योजनात सहभागी व्हावे, हे त्यांचे संबोधन मनाचे कान करून शेतकरी ऐकतात. हा मेळावा संपेपर्यंत दुपारचे दोन वाजतात. रखरखीत उन्हातही लोक 'नाथाभाऊं'ना भेटायला, त्यांच्याशी हस्तांदोलन करायला गर्दी करतात. या गर्दीतून वाट काढत गाड्यांचा ताफा शेलवड गावाकडे निघतो. येथे साहेबांच्या हस्ते ग्रामपंचायतीच्या वाचनालयाचे उद्घाटन होते. तेथून जवळच आयोजित एका सभेस साहेब संबोधित करतात. तेथे साहेबांना ऐकण्यासाठी महिला आणि मुलींची गर्दी आहे. या सभेचे संचलन मुलीच करतात. त्यांनाही साहेब पशुपालन, दुग्धोत्पादन, स्वयंरोजगार, जलसंधारण यासाठी प्रोत्साहित करणारे मार्गदर्शन करतात. विद्यार्थ्यांनी वाचनाची आवड जोपासावी हाही संदेश आवर्जून देतात. त्यानंतर या गावात सुरू असलेल्या जलयुक्त शिवार योजनेंतर्गत एका कामाची पाहणी होते. तेथेही अधिकाऱ्यांना सूचना दिल्या जातात. तेथून ताफा बोदवड गावात येतो. बोदवड ग्रामपंचायतीच्या कार्यक्रमाला उपस्थिती लावून ते येथेच अल्पसंख्याक समाजाच्या मेळाव्याला जातात. येथे मोफत पाणी टँकरचे लोकार्पण होते. या मेळाव्याच्या निमित्ताने मुस्लीम समाजात साहेबांची अफाट लोकप्रियता दिसून येते. त्यानंतर येथेच निखिलभाऊ खडसे यांच्या नावाने सुरू करण्यात आलेल्या हेल्थक्लबचे उद्घाटन त्यांच्या हस्ते होते. तेथेही मार्गदर्शन करताना साहेब आरोग्य आणि आधुनिक दिनचर्येचा



वाचनालयाचे उद्घाटन महिला सरपंचांच्या हस्ते करून घेताना महसूल मंत्री एकनाथराव खडसे.

आरोग्यावर होणारा परिणाम आणि हेल्थक्लबसारख्या संस्थांची उपयुक्तता,यावर मार्गदर्शन करतात.

हा कार्यक्रम आटोपेस्तोवर सूर्य मावळलेला असतो. गाड्या आता मुक्ताईनगरकडे वळतात. मुक्ताईनगरला आल्यावर कोथळी गावात एका आप्तेष्टांकडे साहेब सांत्वनपर भेट देतात. मग घरी जाऊन रात्री मलकापूरकडे रवाना होतात. विधिमंडळाच्या अधिवेशनासाठी त्यांना मुंबई गाठायची आहे. दिवसभर न थांबता, न थकता सुरू असलेला हा त्यांचा प्रवास थक्क करणारा असतो. कर्तृत्व, नेतृत्व, दातृत्व, वक्तृत्व आणि पालकत्व या पंचगुणांचा समुच्चय असलेले ना. एकनाथराव खडसे यांना लाभलेल्या मोठेपणाचे गमक या अविश्रांत, अविरत जनकल्याणाच्या ध्यासात आहे, याची प्रचिती येते.

**(लेखक हे जळगाव येथे जिल्हा माहिती अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०९४२२७८९७३४**

## विशेष मुलाखत

**या वर्षी प्रत्येक नागरिकाने एक झाड लावावे आणि त्याला जगविण्याची जबाबदारी घ्यावी, पर्यावरण जपण्याचा हाच एक मूलमंत्र आहे. महाराष्ट्र शासन यावर्षी पावसाळ्यात २ कोटी झाडे लावणार आहे, त्याची जोपासना करणार आहे. येत्या जून महिन्यात राज्यातील प्रत्येक नागरिकाने हा संकल्प पाळल्यास दुष्काळावर मात करण्यास मदत होणार आहे. यासाठी महाराष्ट्राच्या प्रत्येक सुजाण नागरिकाने एक पाऊल पुढे टाकावे, असे आवाहन राज्याचे पर्यावरण मंत्री रामदास कदम यांनी केले आहे.**



# एक नागरिक, एक झाड

रश्मी पुराणिक

**शासनाच्या पर्यावरण विभागाकडून पर्यावरण संवर्धनाबाबत कोणते महत्त्वपूर्ण निर्णय घेतले गेले आहेत?**

सध्या संपूर्ण जगात पर्यावरणाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. अवकाशातील ओझनचा स्तर कमी होत असल्यामुळे सूर्याची अतिनील किरणे थेट पृथ्वीवर पोहोचत आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पृथ्वीचे तापमान वाढले असून हा एक जागतिक प्रश्न झाला आहे. देशाचे नव्हे जगाचे लक्ष या समस्येकडे लागले असून महाराष्ट्राने या प्रश्नाकडे अतिशय गांभीर्याने पाहिले आहे. वातावरणातील जीवघेणे बदल यासाठी अपरिमित वृक्षतोड, जंगलतोड हे प्रमुख कारण असून त्यामुळे पावसाचे तंत्र बिघडले आहे. किंबहुना दुष्काळाचे सावट सर्वत्र असण्याचे कारण हेच आहे. त्यामुळे महाराष्ट्राने याबाबत पुढाकार घेतला असून राज्यात या पावसाळ्यामध्ये २ कोटी झाडांची लागवड केली जाणार आहे. वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी यासाठी अर्थसंकल्पात तरतूद केली असून अशाप्रकारे कार्यवाही करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. यामध्ये झाडे लावणे यासोबतच ते जगवणे याकडे लक्ष वेधले आहे. याशिवाय, वातावरणात कार्बन डाय ऑक्साइड सोडणाऱ्या वाहनांचा धूर शोषून घेणारे नवे तंत्रज्ञान प्रमुख शहरात वापरणे, बांधकाम व्यवसायात वापरण्यात येणाऱ्या यंत्रांमधून मोठ्या प्रमाणात धुळीचे कण वातावरणात पसरतात, अशा ठिकाणी पूर्ण प्रक्रिया यंत्रणा असल्याशिवाय यंत्राचा वापर होणार नाही, याची खबरदारी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहे. नदी-नाल्याचे शुद्धीकरण, कारखान्यांना यापुढे दूषित पाणी सोडण्यावर निर्बंध लावले आहे. प्लास्टिक पिशव्या संदर्भातील वापरावरही निर्बंध कडक करण्यात आले आहेत. एकूणच पर्यावरणविषयक अनेक निर्णय विभागाने घेतले आहे.

**जनजागृतीसाठी मोहीम राबवणार आहात काय? पर्यावरण विषयक उद्योगाला लागणाऱ्या परवानगीसाठी सुरू केलेल्या वेबपोर्टलला कसा प्रतिसाद आहे?**

या सर्व नियमांची अंमलबजावणी व उद्दिष्टांची पूर्ती व्हावी, यासाठी जनजागृती मोठ्या प्रमाणात सुरू आहे. पावसाळ्यात प्रत्येकाने एक वृक्ष तरी लावावा, असे आवाहन मी करत आहे. मात्र यासंदर्भात काही जबाबदारी निश्चित करण्याचे आमचे धोरण आहे. यापुढे दरवर्षी एकाच ठिकाणी वृक्षारोपणाचे प्रकार घडणार नाहीत, याची काळजी घेतली जाईल. झाडांच्या संवर्धनाची जबाबदारी यापुढे विभागामार्फत दिली जाईल. पर्यावरणाच्या कोणत्याच निर्णयाच्या अंमलबजावणीला वेळ लागू नये, आणि जसे एक झाड कापले तर पाच पुन्हा लागली पाहिजेत, त्याचे सर्वेक्षण झाला पाहिजे. यासाठी या पावसाळ्यात लक्ष दिले जाणार आहे.

राज्य शासनाने पर्यावरणविषयक परवानगीसाठी ऑनलाइन माध्यमाचे धोरण स्वीकारले आहे. याकामात पारदर्शी कारभार यावा यासाठी www.ec.maharashtra.gov.in बेवपोर्टल निर्माण केले असून उद्योगाच्या परवानगीसाठी आता मंत्रालयात हेलपाटे घालावे लागणार नाही. या वेबपोर्टलवर ऑनलाइन मदत मिळत आहे. दरवर्षीच्या परवानगीची अट आता सहा वर्षांसाठी करण्यात आली असून ऑनलाइन सर्व कामे सुरू असल्याने गैरवापराला आळा बसला आहे.

**देवणार डम्पिंग ग्राउंडसारख्या घटनांनी प्रदूषणात वाढ होते. पर्यावरण विभाग यावर काय उपाययोजना करणार?**

देवणार डम्पिंग ग्राउंड येथे १९५७ पासून कचरा व्यवस्थापन चालते. नुकत्याच या ठिकाणी आगीच्या घटना घडल्या आहेत, ज्यांच्या चौकशीचे



आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. अशा आगी लागू नये यासाठी शासन एकीकडे दक्षता घेत असताना या ठिकाणी निर्माण होणाऱ्या मिथेन व अन्य धोकादायक वायू संदर्भात निरी सारख्या संस्थेकडून मार्गदर्शन घेतले जात आहे. रासायनिक प्रक्रियेतून पर्यावरणाला धोका निर्माण होणार नाही यासाठी आपला विभाग जागरूक असून त्यासाठी विविध पातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

**महानगरातील वाढत्या ध्वनिप्रदूषण नियंत्रणाबाबत पर्यावरण विभागाची काय मोहीम आहे?**

महानगरातील ध्वनिप्रदूषणासंदर्भात उच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या घटनांबाबत गुन्हे दाखल करण्याचे आणि न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्याबाबत आपला विभाग कटिबद्ध आहे.

**पर्यावरण विषयक परवानगी संदर्भात माहिती देणारे संकेतस्थळ**
www.ec.maharashtra.gov.in

**पर्यावरण विभागाच्या संदर्भात माहिती देणारे संकेतस्थळ**
www.mahenvis.nic.in

**पर्यावरण विषयक सूचना व तक्रारीसाठी संकेतस्थळ**
www.aaplesarkar.maharashtra.gov.in

**पर्यावरण रक्षणासाठी काम करणाऱ्या संघटना, व्यक्तींची पर्यावरण संवर्धनासाठी कशी मदत घेता येईल?**

खरे तर आपण सर्वांनीच निसर्गाचा सन्मान केला पाहिजे. पर्यावरण रक्षण ही कायम लोकचळवळ झाली पाहिजे. तरीही आमच्या सर्वांच्या भल्यासाठी काही अभिनव प्रयोग समाजात सुरू असतो. अशाप्रकारे पर्यावरणाच्या रक्षणासाठी पुढे येणाऱ्या संस्थांसाठी आमच्या विभागामार्फत नियमित नोंद घेतली जाते. वर्षातून एकदा यासंदर्भात कार्यक्रम घेऊन समारंभपूर्वक त्यांचा सत्कार केला जातो. वेगवेगळ्या संस्थांचा सन्मान आणि रोख पुरस्कारही दिले जातात.

**प्रदूषित पाणी प्रक्रिया न करता नदीत सोडणाऱ्या उद्योगांवर काय कारवाई करणार?**

महानगरातील सांडपाणी थेट नद्यांमध्ये, समुद्रात सोडण्यावर आपल्या विभागाने निर्बंध आणले असून; महानगरपालिका व नगरपालिका यांना आपल्या बजेटमध्ये २५ टक्के निधी हा सांडपाणी व्यवस्थापन आणि कचऱ्याचे नियोजन यावर राखीव ठेवण्याचे व यासाठीच खर्च करण्याचे बजावले असून, नद्यांचे प्रदूषण कमी करण्यात आम्हाला आगामी काळात नक्कीच यश येईल असा प्रतिसाद मिळत आहे.

नद्यांच्या प्रदुषणाबाबत पर्यावरण विभागाच्या आदेशाकडे दुर्लक्ष करणाऱ्या काही उद्योगांवर कारवाई करण्यात आली आहे. काही उद्योगाची बँक गॅरंटी जप्त करण्यात आली. ५० लाखापर्यंत ही कारवाई झाली असून कायदेशीर कारवाईदेखील केली आहे. यापुढे नदीच्या पाण्याचे प्रदूषण याबाबत राज्य सरकार अधिक गंभीरतेने पाऊले उचलणार आहे. राज्यातील अनेक नद्या स्वच्छ व पर्यावरणाच्या दृष्टीने स्वच्छ झाल्याचे नजीकच्या काळात दिसेल.



**कोस्टल रोड, अरबी समुद्रातील शिवाजी महाराजांचे स्मारक, मेट्रो प्रकल्प यांना केंद्राकडून पर्यावरण परवानगी मिळण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे?**

सागरी रस्ता प्रकल्प, अरबी समुद्रातील शिवाजी महाराजांचे स्मारक, मेट्रो प्रकल्प यांना केंद्र सरकारच्या सागरी किनारपट्टी नियामक क्षेत्राची परवानगी आवश्यक असते. ती मिळाली असून राज्य सरकारचे हे सर्व महत्त्वाकांक्षी प्रकल्प केंद्रीय पर्यावरण विभागाच्या पर्यावरणविषयक सूचनांचे पालन करूनच पूर्ण केले जातील.

**(लेखिका या एबीपी माझा या वृत्तवाहिनीच्या विशेष प्रतिनिधी आहेत.)**
**संपर्क : ०९९३०८९९४८९**

# नागपूरची मेट्रो गतिमान

**नागपूर मेट्रो प्रकल्पासाठी जर्मनीच्या केएफडब्ल्यू बँक आणि केंद्र सरकार यांच्यात १ एप्रिल रोजी ३ हजार ७५० कोटी रुपयांचा करार झाला. मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या एकूण किमतीपैकी कर्जस्वरूपात ४३ टक्के वाटा जर्मनीने पूर्ण केल्याने नागपूर मेट्रो रेल्वेच्या मार्गातील हा सर्वांत मोठा माइलस्टोन ठरला.**

कर्जाला मान्यता मिळाली. एनएमआरसीएलचे हे मोठे यश मानले जात आहे.

नॉर्थ ब्लॉकस्थित केंद्रीय आर्थिक विकास विभागाच्या कार्यालयात १ एप्रिल रोजी आयोजित बैठकीत केंद्रीय आर्थिक विकास विभागाचे सह सचिव एस. सेल्वा कुमार, केएफडब्ल्यू बँकेचे आशिया देशांचे महासंचालक रोलॅण्ड सीलर यांनी भारतातील जर्मनीचे राजदूत डॉ मार्टीन ने यांच्या उपस्थितीत करारावर स्वाक्षऱ्या केल्या.




**मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत 'एनएमआरसीएल'चे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित आणि जर्मनीच्या बँकेचे पीटर हिलीजेस यांनी करारावर स्वाक्षरी केली.**

नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प डिसेंबर २०१८ पर्यंत पूर्ण करण्यासाठी या प्रकल्पाला ८ हजार ६८० कोटी रुपयांची गरज भासणार आहे. यातील २० टक्के वाटा केंद्र सरकारचा आणि २० टक्के वाटा राज्य सरकारचा आहे. ५ टक्के नागपूर सुधार प्रन्यास (नासुप्र) आणि ५ टक्के नागपूर महापालिकेचा वाटा आहे. फ्रान्सच्या फ्रेन्च डेव्हलपमेंट एजन्सी, जर्मनीची केएफडब्ल्यू बँक, युरोपीयन डेव्हलपमेंट बँक, चीन, जपान या देशांसोबत चर्चा केल्यानंतर जर्मनीने कर्ज देण्याची तयारी दर्शवली होती. यावर आता खऱ्या अर्थाने शिक्कामोर्तब झाल्याने पैशांअभावी कुठलेही काम थांबणार नसल्याची वस्तुस्थिती आहे. अवघ्या सहा महिन्याच्या प्रक्रियेनंतर

**प्रवीण लोणकर**

केंद्रीय नगर विकास विभागाचे सहसचिव मुकुंद सिन्हा, नागपूर मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित, महाराष्ट्र शासनाचे सचिव तथा आयुक्त (गुंतवणूक तथा राजशिष्टाचार) लोकेश चंद्र यांच्यासह वरिष्ठ अधिकारी या वेळी उपस्थित होते.

### आता स्पर्धा वेळेशी

डिसेंबर २०१८ मध्ये प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवण्यात आले आहे. मुदतीवरूनच प्रकल्पाची किंमत निर्धारित करण्यात आली. डिसेंबर २०१८

मध्ये प्रकल्प पूर्ण होणार असेल तर त्यासाठी ८ हजार ६८० कोटी रुपयांची गरज आहे. ही गरज लक्षात घेऊनच पैशांची जुळवाजुळव करण्यात आली. करारानुसार नागपूर मेट्रोच्या कामांसाठी केएफडब्ल्यू बँकेने २० वर्ष मुदतीसाठी ३,७५० कोटी रुपये (५०० मिलीयन युरो) कर्ज स्वरूपात दिले आहे. पहिल्या ५ वर्षात एकूण रकमेवरील व्याज तर उर्वरित १५ वर्षात मुद्दलासह व्याजस्वरूपात कर्ज परतावा करण्यात येणार आहे.

मात्र प्रश्न इथेच संपत नाही. जून २०१२ च्या मूल्यानुसार मेट्रो रेल्वे प्रकल्पाची किंमत निर्धारित करण्यात आली. प्रकल्पाला लागणारी जमीन, समतोल करणे, स्टेशन निर्माण, मेट्रोसाठी आगार, विद्युत पुरवठा केंद्र, फिडर बसेस यासह प्रकल्प उभा करण्यासाठी मेट्रो रेल्वेला ५ हजार ९९९ कोटी रुपयांची गरज निश्चित करण्यात आली. करांचा समावेश करून ही किंमत ६ हजार ८६२ कोटी रुपयांवर गेली. चलनवाढीमुळे मेट्रो रेल्वे प्रकल्पाची किंमत दरवर्षी ७.५ टक्क्यांनी वाढणार आहे. त्यामुळे प्रकल्प पूर्ण होईपर्यंत डिसेंबर २०१८ पर्यंत या प्रकल्पाला ८ हजार ६८० कोटी रुपयांची गरज आहे. मात्र उशीर झाल्यास दरवर्षी ७.५ टक्क्याने प्रकल्पावरील खर्च वाढणार आहे. त्यामुळे वेळेत नागपूर मेट्रो रेल्वे पूर्ण करण्याचे मोठे आव्हान एनएमआरसीएलपुढे आहे.

### केएफडब्ल्यूचा असणार वॉच

रामदासपेठ येथील हॉटेल सेंटर पॉइंट येथे नागपूर मेट्रो रेल्वेसाठी जर्मनीची केएफडब्ल्यू बँक आणि नागपूर मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लि. (एनएमआरसीएल) यांच्यात १० एप्रिल रोजी प्रकल्प करार करण्यात आला. 'एनएमआरसीएल'चे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित आणि जर्मनीच्या के. एफ. डब्ल्यू. बँकेचे पीटर हिलीजेस यांनी नागपुरात झालेल्या प्रकल्प करारावर स्वाक्षरी केली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर प्रवीण दटके यांच्यासह केएफडब्ल्यू बँकेचे पीटल हिलीजेस आदी उपस्थित होते.

जर्मन समुदाय म्हणजे दर्जा अशा शब्दात वर्णन करत मेट्रो प्रकल्प साकारताना गुणवत्तेशी कुठलीही तडजोड केली जाणार नाही. प्रकल्प साकारताना गुणवत्तेबरोबर पर्यावरणाचे संतुलनही टिकून राहावे यावर अधिक भर देण्यावर लक्ष राहणार आहे. त्यामुळे केएफडब्ल्यू बँक प्रकल्पाच्या वाटचालीवर पूर्ण लक्ष ठेवणार आहे.




छत्रपती चौकातील मेट्रो रेल्वे स्थानकाचे संकल्प चित्र.

### ४०० कोटी रुपयांची कामे ट्रॅकवर

ऑटोमोटीव्ह चौक ते मिहान आणि प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर ३८ किलोमीटरच्या मार्गावर डिसेंबर २०१८ मध्ये मेट्रो रेल्वे धावण्याचे नियोजन करण्यात आले आहे. केंद्र सरकार, राज्य सरकार, नासुप्र, महापालिका यांचा संयुक्त प्रकल्प असलेल्या मेट्रो रेल्वेसाठी ५० टक्के कर्ज उभे करणे मोठे आव्हान होते. मेट्रोच्या कामांसाठी केएफडब्ल्यू बँकेने २० वर्ष मुदतीसाठी ३,७५० कोटी रूपये (५०० मिलीयन युरो) कर्ज स्वरूपात दिले असल्याने प्रकल्पाच्या मार्गातील मोठा अडसर दूर झाला आहे. मेट्रो रेल्वेच्या कामाने आता वेग घेतला असून रुपये ४०० कोटींची कामे सध्या सुरु आहेत. ठरवलेल्या बजेटमध्ये मेट्रो रेल्वे पूर्ण करायची असेल तर डिसेंबर २०१८ पर्यंत काम पूर्ण होणे आवश्यक आहे. या दिशेने वाटचाल सुरू असून रुपये ५०० कोटींच्या कामांना येत्या काही दिवसात सुरुवात होणार आहे.

### न्यू एअरपोर्ट ते मिहान मार्ग

न्यू एअरपोर्ट ते मिहान ही ५.६ किलोमिटर मेट्रो रेल्वे जमीन पातळीवर धावणार आहे. या मार्गाचे काम सुरू आहे. नागार्जुन कंपनीला २५० कोटी रुपयांमध्ये काम देण्यात आले असून येत्या ५ महिन्यात काम पूर्ण होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. मातीकाम, मुरूम टाकणे, रूळ तयार करण्याचे काम सुरू होत आहे.

## पहिला पिलर झाला उभा

**प्राइड हॉटेल ते मुंजे चौक या मार्गावर पिलर टाकण्याचे काम नागार्जुन कंपनीला देण्यात आले आहे. १०० कोटीत हे काम देण्यात आले आहे. काम सुरू होऊन तीन महिने झाले असून येत्या वर्षभरात हे काम पूर्ण होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. वर्धा मार्गावरील पहिला पिलर तयार झाला आहे.**


### स्टेशनचे डिझाइन

वर्धा मार्गावरील मेट्रो रेल्वेच्या ९ स्टेशनचे डिझाइन तयार करण्याचे काम एल ॲण्ड टी कंपनीला दिले होते. न्यू एअरपोर्ट आणि खापरीचे डिझाइन तयार झाले आहे.

### या कामांनाही येणार वेग

मेट्रो रेल्वेची ४०० कोटी रुपयांची कामे सुरू असून येत्या काही दिवसांत आणखी महत्त्वपूर्ण कामांना सुरुवात होणार आहे. झाशी राणी चौक ते लोकमान्यनगर या मार्गाचे काम लवकरच सुरू करण्यात येणार आहे. मेट्रो रेल्वेसाठी सर्वांत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या जनरल कन्सलटन्टची महिन्याभरात निवड करण्यात येणार आहे. सुमारे २०० कोटी रुपयांत जनरल कन्सलटन्ट नेमण्यात येईल. रोलिंग स्ट्रॉक, ट्रेनचे डब्बे यांच्या निविदा काढण्यात आल्या आहेत. जूनपर्यंत या कामांनाही वेग येईल. मेट्रो रेल्वेचे काम अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने व्हावे यासाठी ५ डी तंत्रज्ञानासाठी निविदा मागवण्यात आल्या होत्या. १०० कोटी रुपयांचे हे काम असणार आहे.

**(लेखक हे दै. महाराष्ट्र टाइम्स नागपूर येथे वरिष्ठ पत्रकार आहेत.)**
**संपर्क : ०९८२२६६०२००**




# महागुंतवणूक 'मेरीटाइम'ची

**मुंबईमध्ये १४ ते १६ एप्रिल या काळात पहिली मेरीटाइम इंडिया परिषद संपन्न झाली. केंद्रीय जहाज बांधणी मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने झालेल्या या परिषदेत केवळ ३ दिवसात ८३ हजार कोटींचे औद्योगिक सामंजस्य करार झाले. देशातील २४० प्रकल्पांवर यावेळी १३ सत्रांमध्ये चर्चा झाली. या शिखर परिषदेत देशविदेशातील ५ हजार शिष्टमंडळांनी सहभाग घेतला. बंदर विकास व सागरी उद्योगांमध्ये अग्रेसर असणाऱ्या १२ देशांच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळासोबत १४० महत्त्वाचे करार झाले. देशाच्या सागरी व्यापार व अर्थव्यवस्थेला बळकटी देणाऱ्या 'मेरीटाइम इंडिया समिट'चा हा अहवाल**

**प्रवीण टाके**

भारत हा प्राचीन काळापासून समुद्रमार्गाने व्यापार करणारा आणि संपूर्ण जगाला मसाल्याचे पदार्थ पुरविणारा देश म्हणून ओळखला जातो. गुजरातमधील आताचे भरुच, केरळमधील कोडुनगल्लुर, तामीळनाडूमधील नागपट्टनम, पाँडेचरीतील आरियांकुप्पम आदी सागरी बंदरातून २ हजार वर्षांपूर्वी जगाशी व्यापार होता. भारताच्या प्राचीन सागरी व्यापारामध्ये या व्यापारी बंदरांचा इतिहास नमूद केला आहे. आपल्या या वैभवशाली सागरी व्यापाराच्या हजारो वर्षांच्या परंपरेला पुन्हा नव्याने जागतिक ख्यातीचे बनवण्याचा ध्यास व या क्षेत्रात जागतिक समूहाला आकर्षित करण्यासाठी नुकताच एक गुंतवणूक मेळा जहाज बांधणी मंत्री नितीन गडकरी यांच्या अभिनव आयोजनातून मुंबईत झाला. केंद्र शासन, जहाज बांधणी मंत्रालय, राज्य शासनाच्या महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड आदींच्या सहभागातून मुंबईतील गोरेगाव येथील बॉम्बे कन्हेंशन ॲण्ड एक्झिबेशन सेंटर येथे १४ ते १६ एप्रिल या काळात मेरीटाईम इंडिया परिषदेचे (समिट) आयोजन करण्यात आले होते. कोरिया हा देश सहयोगी असणाऱ्या या तीन दिवसीय परिषदेत जगातील ४० देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. यावेळी १३ सत्रांमध्ये भारतीय समुद्र किनाऱ्यावर उपलब्ध असणाऱ्या गुंतवणुकीच्या संधी आणि शेकडो सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या सर्व उपक्रमाला 'सागरमाला प्रकल्प' नाव देण्यात आले असून यामध्ये गुंतवणुकीचे आवाहन करण्यात आले आहे.

### सागरमाला प्रकल्प

भारताच्या सागर किनाऱ्यावरील बंदरांचे अद्यावतीकरण, सागरी वाहतूक व व्यापार वृद्धीसाठी जागतिक समूहाला आकर्षित करून या क्षेत्रात गुंतवणूक वाढवणे आणि या माध्यमातून भारतीय अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी तयार केलेले हे केंद्र शासनाचे धोरण आहे.

### आयोजनाचा उद्देश

भारताच्या तीनही बाजूला असणारा विस्तीर्ण सागरी किनारा आणि जगातील देशांचा भारताशी वाढलेला व्यापार व वाणिज्यक सबंध लक्षात

घेता जागतिक समूहाला समुद्रमार्गे गुंतवणुकीसाठी आकर्षित करणे आणि भारताच्या सागरी वैभवाला नवी झळाळी देऊन त्यातून अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याचे केंद्र शासनाचे धोरण आहे. भारताने जहाज बांधणी, बंदरे विकास, सागरी व्यापार या क्षेत्रात भरारी घेतली असून गेल्या दोन वर्षात ही प्रगती ३० टक्क्यांनी वाढली असल्याचे केंद्रीय जहाजबांधणी मंत्री नितीन गडकरी यांनी या परिषदेत जाहीर केले. याशिवाय सागरमाला प्रकल्पातून देशांतर्गत नदीवाहतूक क्षेत्रातही गुंतवणूक व्हावी अशी अपेक्षा आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटनाला महाराष्ट्राचे राज्यपाल सी. विद्यासागर राव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गुजरातच्या मुख्यमंत्री आनंदीबेन पटेल, केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक, महामार्ग आणि जहाज बांधणी मंत्री नितीन गडकरी आदी उपस्थित होते.

भारताच्या विस्तीर्ण ७५१६.६ कि.मी. लांबीच्या समुद्रकिनारपट्टीला विकसित करून देशाच्या पूर्वेइतिहासाला साजेसा सागरी व्यापार विकसित करण्यासाठी; देशाने 'सागरमाला' कार्यक्रम जाहीर केला आहे. जहाज बांधणी, जहाज दुरुस्ती, बंदरे निर्मिती आणि विकास, सागरी व किनारी



**सागरी मार्गाने गुंतवणुकीची ही सर्वोत्तम वेळ : प्रधानमंत्री**

पर्यटन, बंदरे जोडणाऱ्या पायाभूत प्रकल्पांची निर्मिती, देशातंर्गत नदी वाहतूक, या क्षेत्रात भविष्यात भारत मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधांची निर्मिती करेल. त्यामुळे जगभरातील गुंतवणूकदारांनी, भारतात सागरी प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्याची ही सर्वोत्तम वेळ असल्याचे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या वेळी जागतिक समुदायाला केले. मुंबई ही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कर्मभूमी होती. त्यामुळे हा कार्यक्रम त्यांच्या १२५ व्या जयंतीला मुंबईत घेण्यात आला. बाबासाहेब यांना आपण घटनेचे शिल्पकार म्हणून ओळखतो, मात्र अनेकांना आश्चर्य वाटेल की, ते भारताच्या जलसंपदा आणि जलवाहतूक धोरणाचेही शिल्पकार आहेत. भारताला उज्ज्वल बनविण्याच्या त्यांच्या धोरणावरच आम्ही यापुढे जलवाहतूक आणि सागरी किनारपट्टीच्या विकासासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही त्यांनी या वेळी बाबासाहेबांना अभिवादन करताना दिली.

**(लेखक हे वरिष्ठ साहाय्यक संचालक आहेत.)**
**संपर्क : ०९७०२८५८७७७**

## गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र सर्वोत्कृष्ट स्थान : मुख्यमंत्री

बंदरांच्या विकासातून देशाचा विकास शक्य आहे. बंदरांच्या विकासासाठी शासनाने सर्वंकष धोरण आखले आहे. 'ईज ऑफ डुईंग बिझनेस'च्या माध्यमातून विविध परवानग्या तत्काळ देण्यात येत आहेत. महाराष्ट्राला ७२० किलोमीटरचा किनारा लाभला असून, मुंबईसारखी देशाची आर्थिक राजधानी स्वागतासाठी सज्ज आहे. महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याची हीच योग्य वेळ




या धोरणामुळे राज्यात गुंतवणुकीला चालना मिळत आहे.

सागरमाला प्रकल्पाबरोबरच राज्यातील बंदरे जोडण्याचा उपक्रम शासनाने हाती घेतला आहे. वर्धा व जालना येथे ड्रायपोर्ट उभारण्यात येत आहे. 'नागपूर-मुंबई कम्युनिकेशन एक्सप्रेस'मुळे राज्यातील १४ जिल्हे जेएनपीटीला जोडले जाणार आहेत. सन २०१९ पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासन

आहे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या परिषदेत गुंतवणूकदारांना केले.

या परिषदेमध्ये 'अपॉर्च्युनिटीज इन मेरिटाइम स्टेट' या चर्चासत्रात ते बोलत होते. मुख्यमंत्री म्हणाले की, देशाच्या अर्थव्यवस्थेत बंदर विकासाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. विकसित राष्ट्रांकडे पाहिल्यास त्यांनी बंदर विकासाला प्राधान्य दिल्याचे दिसते. महाराष्ट्रालाही बंदरे विकासाची समृद्ध परंपरा लाभली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनीसुद्धा बंदरांच्या विकासाचे महत्त्व ओळखले होते. मुंबई हे देशाच्या सागरी विकासाचे केंद्र आहे. जागतिक दर्जाची जहाजे येथे बांधली जातात. या सर्व गोष्टींचा विचार करून शासनाने सर्वंकष, असे बंदर विकास धोरण तयार केले आहे. 'ईज ऑफ डुईंग बिझनेस' या संकल्पनेवर आधारित

प्रयत्नशील आहे. वाढवण बंदराच्या विकासाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्पही शासनाने हाती घेतला असून त्याबाबत केंद्र शासनाशी करार झाला आहे. महाराष्ट्र मेरिटाइम बोर्ड चांगले काम करीत असून बंदराच्या विकासातून अर्थव्यवस्थेला गती देण्याचे शासनाचे धोरण असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. नवीन बंदरांची निर्मिती, जेट्टींचा विकास, जहाजबांधणी आदी विविध विषयांबाबतचा आढावा घेताना गुंतवणूकदारांनी राज्यात गुंतवणूक करण्याची हीच योग्य वेळ असल्याचेही ते म्हणाले.

चर्चासत्राच्या सुरुवातीला ८ सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यापैकी ७ सामंजस्य करार महाराष्ट्र मेरिटाइम बोर्डाचे तर एक सामंजस्य करार एमटीडीसी आणि जेएनपीटीमध्ये होता.




**नागरी सेवा दिनानिमित्त उत्कृष्ट कार्य करणारे सोलापूरचे जिल्हाधिकारी तुकाराम मुंढे यांचा सत्कार करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. या वेळी महसूलमंत्री एकनाथराव खडसे, उद्योगमंत्री सुभाष देसाई व मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय उपस्थित होते.**

# परिवर्तनाचे शिलेदार

सामाजिक, आर्थिक परिवर्तनाचे माध्यम म्हणून लोकशाहीमध्ये प्रशासन कार्यरत असते. सामाजिक आर्थिक परिवर्तनाच्या माध्यमातून सामान्य नागरिकांच्या मनातील महाराष्ट्र घडविण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा. प्रशासनाच्या कार्यामुळेच राज्य प्रगतिपथावर जाईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागातर्फे नागरी सेवा दिन २०१६ निमित्त उत्कृष्ट कार्य करणारे अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार सह्याद्री राज्य अतिथिगृहात आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. या वेळी राज्याचे महसूल मंत्री एकनाथराव खडसे, उद्योगमंत्री तथा मुंबईचे पालकमंत्री सुभाष देसाई, खासदार अरविंद सावंत, राज्याचे मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय, सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. पी.एस. मीना आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

**सामान्य शेतकऱ्याच्या कुटुंबापासून, व्यावसायिक, कर्मचारी, विचारवंत या सर्वांचीच मुले प्रशासनात असतात. त्यामुळे आपण ज्या ठिकाणाहून आलोय तिथल्या सामान्य माणसाच्या आयुष्यामध्ये बदल घडवण्याची मोठी संधी प्रशासनात शासकीय अधिकाऱ्यांना मिळते. या संधीचा योग्य वापर करणारे अधिकारी कौतुकाचे धनी ठरतात. अशाप्रकारे स्वत:च्या कर्तृत्वाने राज्याच्या विकासामध्ये गती आणणाऱ्या अधिकाऱ्यांचा सामान्य प्रशासन विभागातर्फे नागरी सेवा दिनाला सत्कार करण्यात आला.**

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, भारतीय लोकशाहीचे विधिमंडळ, कायदेमंडळ व नागरी सेवा हे तीन स्तंभ असून नागरी सेवेमुळे देश एकसंध राहील आणि तो देशाचा कणा म्हणून काम करेल, हा सरदार वल्लभभाई पटेल व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखविलेला विश्वास आज सार्थ झाल्याचे दिसून येते. प्रशासनाने 'प्रोॲक्टिव्ह'भूमिका घेऊन काम केले तर पाच वर्षाहून कमी काळात राज्यात बदल झालेले

दिसतील. राज्यातील प्रशासनाने गेल्या दीड वर्षात केलेल्या कामांतून हे सिद्ध केले आहे. जलयुक्त शिवार, पाणंद रस्ते योजना, स्वच्छ महाराष्ट्र अभियान, इज ऑफ डुईंग बिझनेस, आपले सरकार पोर्टल, नाशिक कुंभमेळा नियोजन असे विविध उपक्रम प्रशासनाने यशस्वी करून दाखविले आहेत. जलयुक्त शिवारच्या माध्यमातून राज्याने देशाला एक नवीन विचार दिला असून, येत्या पावसाळ्यानंतर या अभियानाची खरी फलश्रुती दिसेल.

राज्य शासन माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून नागरिकांना जास्तीत जास्त सेवा ऑनलाइन आणि मोबाइल ॲपच्या माध्यमातून देणार आहे. नागरिकांना शासकीय कार्यालयात चकरा माराव्या लागू नयेत अशी व्यवस्था निर्माण करून गतिमान व पूर्णपणे पारदर्शी कारभार देण्याचा राज्य शासन प्रयत्न करत आहे. यासाठी प्रशासनाची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. कोणत्याही कार्यात शासनाचा हस्तक्षेप असेल तर परिवर्तन शक्य होते, हे अनेक जिल्ह्यांनी दाखवून दिले आहे. यंदा भीषण दुष्काळी परिस्थिती असतानाही प्रशासनाने राबवलेल्या उपाययोजनांमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी झाल्या आहेत, असेही त्यांनी या वेळी सांगितले.

### गतिमानता वाढली

महसूल मंत्री श्री. खडसे म्हणाले की, गेल्या काही काळापासून प्रशासनाची गतिमानता वाढली आहे. पारदर्शी व गतिमान यंत्रणेसाठी प्रशासनाने जाणीवपूर्वक पावले उचलली आहेत. शासन व प्रशासनाने एकत्र येऊन निर्णय घेतला व त्याची अंमलबजावणी केली तर जनतेला उत्तम सेवा देता येते. शासनाच्या नवनवीन कल्पनांना मूर्त स्वरूप देण्याचे काम प्रशासन करत आहे. यापुढील काळात पेपरलेस कामासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत. कठीण काळातही राज्याचा महसूल वाढवण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी वेगवेगळे उपक्रम राबवले. निधीशिवाय जलयुक्त शिवार, स्वच्छ महाराष्ट्र यासारखे उपक्रम यशस्वी करून दाखवले आहेत. अशा उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव करणे आवश्यक आहे. त्यातून इतरांनाही चांगल्या कामासाठी प्रेरणा मिळते.

### 'स्टील फ्रेम' जोपासा

मुख्य सचिव श्री. क्षत्रिय म्हणाले की, नागरी सेवा ही देशाची एकजूट कायम ठेवणारी 'स्टीलफ्रेम' आहे, तिला जोपासा. लोकाभिमुख व गतिमान कारभारासाठी अधिकारी नेहमीच प्रयत्नशील असतात. गेल्या काही काळात राज्यातील अधिकाऱ्यांनी अनेक नवनवीन उपक्रम राबवले. त्यातून राज्यातील जनतेला दिलासा मिळाला आहे. प्रशासनाने अनेक छोट्या छोट्या उपक्रमांतून मोठे बदल घडवून आणले आहेत. कागदपत्रांवरील साक्षांकनाची अट रद्द करणे, मुलींसाठी अधिवास प्रमाणपत्राची अट शिथिल करणे, पेपरलेस वर्क आदी लहान लहान उपक्रमांतून प्रशासनाने पारदर्शकतेच्या दृष्टीने पावले उचलली आहेत. या वेळी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. त्याचबरोबर जलयुक्त शिवार, स्वच्छ महाराष्ट्र अभियान आणि आपले सरकार वेब पोर्टल या उपक्रमांचे सादरीकरण व उद्योग विभागाच्या 'ईज ऑफ डुईंग बिझनेस' या पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात आले.

**टीम लोकराज्य**

## पुरस्कारांचे मानकरी

**राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा (सृजन उपक्रम)–** सहसंचालक सुधाकर ग. सिद्धेवाड, लेखा अधिकारी रविंद्र जोगी, कनिष्ठ लेखापाल स्नेहल गुल्हाने, सहायक लेखा अधिकारी राजेश भुयार, लेखा लिपिक शिवदत्त सालबर्डे (अमरावती)

**राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा (भ्रष्टाचार मुक्त महाराष्ट्र उपक्रम) –** प्रभारी महासंचालक संजय बर्वे, अपर पोलीस अधीक्षक वसंत अप्पा देवरकर

**ग्राम विकास व जलसंधारण विभाग –** रा. वि. गमे, मुख्य कार्यकारी अधिकारी, नंदुरबार

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग –** शेखर सिंग (मुख्य कार्यकारी अधिकारी, सिंधुदुर्ग), अनिल बागल (उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सिंधुदुर्ग). अभिमन्यू काळे (मुख्य कार्यकारी अधिकारी,नांदेड), जी. एल. रामोड (उपमुख्य कार्यकारी अधिकारी, नांदेड). महेंद्र कल्याणकर (मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपूर), रविंद्र मोहिते (उपमुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपूर), भुजंग गजभिये (गट विकास अधिकारी, बल्लापूर), शैलेश नवाल (मुख्य कार्यकारी अधिकारी, अहमदनगर), उज्ज्वला बावके (उपमुख्य कार्यकारी अधिकारी, अहमदनगर), नामदेव ननावरे (मुख्य कार्यकारी अधिकारी,बीड), मधुकर वासनिक (उपमुख्य कार्यकारी अधिकारी, बीड).

**नगर विकास विभाग –** एस. शिवशंकर (आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका), अभिजित बापट (मुख्याधिकारी, सातारा नगर परिषद), विद्या पोळ (मुख्याधिकारी, पाचगणी नगर परिषद), रामदास कोकरे (मुख्याधिकारी, वेंगुर्ला नगर परिषद).

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग –** अविनाश पाटील (सहसचिव, नगरविकास विभाग), विजय पाटील (कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका), संजय निर्मल (सहायक अभियंता,बृहन्मुंबई महानगरपालिका), शिवाजी पाटील (सहसंचालक, उद्योग विभाग), संजय कोरबू (सहसंचालक, उद्योग), डॉ. पी. अन्बलगन (सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ), विनोद जाधव (महाव्यवस्थापक, महाराष्ट्र आद्योगिक विकास महामंडळ), उपसंचालक नरेश देवराज, सहायक आयुक्त विश्वास जाधव, सहायक आयुक्त विश्राम देशपांडे (सर्व कामगार विभाग), सहआयुक्त व्ही.व्ही. कुलकर्णी (विक्रीकर विभाग), मुख्य महाव्यवस्थापक वाय.एम. गडकरी (महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण संस्था), सहसचिव श्री. तिवारी (महसूल व वने), अतिरिक्त नियंत्रक कैलास पगारे (वैध मापन शास्त्र विभाग).

**कृषी व पदुम विभाग –** जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अंकुश माने, जिल्हा मृद सर्वेक्षण मृद चाचणी अधिकारी बाळासाहेब संपतराव नितनवरे, कृषी सहायक उमेश काशिनाथ शेळके (सर्व जि. अहमदनगर).

**महसूल व वन विभाग –** तुकाराम मुंढे (जिल्हाधिकारी, सोलापूर), दीपेंद्र कुशवाह (जिल्हाधिकारी, नाशिक), प्रशांत नारनवरे (जिल्हाधिकारी, उस्मानाबाद), राधाकृष्णन बी. (जिल्हाधिकारी, रत्नागिरी), सचिन कुर्वे (जिल्हाधिकारी, नागपूर), पांडुरंग पोले (जिल्हाधिकारी, लातूर), नवलकिशोर राम (जिल्हाधिकारी, बीड), अश्विन मुद्गल (जिल्हाधिकारी, सातारा), किरण गिते (जिल्हाधिकारी, अमरावती). मुख्य पोस्ट मास्तर जनरल कार्यालय, मुंबई – अधीक्षक युनुस नूर मोहम्मद (पोस्ट ऑफिस, ठाणे पश्चिम), वरिष्ठ अधीक्षक आर. पी. पाटील (पोस्ट ऑफिस, कोल्हापूर).

## रेल्वे विकास 'फास्ट ट्रॅक' वर!



मुंबईमध्ये रेल्वे, मेट्रो, मोनो, बेस्ट, शेअर टॅक्सी या सर्व प्रवाससेवांचे एकाच ठिकाणी तिकिट उपलब्ध होण्यासाठी सिंगल तिकिट सिस्टिम सुरू करण्यात येणार आहे. ही सुविधा मोबाइल ॲपवर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील रेल्वेचा विकास गतीने करण्यासाठी केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने 'महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी' स्थापन करण्यात येणार आहे. या कंपनीच्या माध्यमातून राज्यातील ९ प्रकल्प मार्गी लावण्यात येणार असून सुमारे २३ हजार कोटी रूपयांचे प्रकल्प पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय रेल्वे मंत्री सुरेश प्रभू यांनी दिली. नुकतीच त्यांनी मंत्रालयात मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली.

### राज्यातील ९ प्रकल्प पूर्ण करणार

अहमदनगर-बीड-परळी वैजनाथ, वर्धा-यवतमाळ-नांदेड, वडसा-गडचिरोली, नागपूर-नागभीड, पुणे-नाशिक, मनमाड-धुळे-इंदौर, गडचिरोली-आदिलाबाद, बारामती-लोणंद, कोल्हापूर-वैभववाडी हे मार्ग लवकरच पूर्ण करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून, हे प्रकल्प चार वर्षात पूर्ण करण्यात येणार आहेत. राज्यातील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी दर आठवड्याला संबंधित अधिकारी आढावा घेणार असून, दर तीन महिन्यांनी मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेऊन आढावा घेण्यात येईल, असेही श्री. प्रभू यांनी सांगितले.

## 'गिव्ह इट अप'मध्ये महाराष्ट्र अव्वल

घरगुती गॅसच्या वापरासाठी नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सिलिंडरवर शासनातर्फे अनुदान देण्यात येते. त्यापोटी केंद्र सरकारला मोठा वित्तीय भार सहन करावा लागतो. या अनुदानाची गरज नसलेल्या नागरिकांनी अनुदानाचा त्याग करावा, असे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले होते. त्यासाठी देशभरात 'गिव्ह ईट अप' ही मोहीम हाती घेण्यात आली होती. केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने याबाबतची तपशीलवार आकडेवारी जाहीर केली आहे. देशात एकूण १४ कोटी ५४ लाख नागरिक एलपीजी गॅसधारक आहेत, त्यापैकी एक कोटीहून अधिक नागरिकांनी या अनुदानाचा त्याग केला आहे. यासाठी महाराष्ट्रात मोहीम राबवण्यात आली होती. त्याला




सकारात्मक प्रतिसाद देत महाराष्ट्रातील नागरिकांनी या अभियानात सर्वाधिक योगदान दिले आहे. राज्यातील १६ लाख ४२ हजार ८१४ नागरिकांनी या अनुदानाचा त्याग केला आहे.

राष्ट्रहितासाठी राज्यातील नागरिकांनी दिलेले हे योगदान अभिमानास्पद असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली असून भविष्यातही महाराष्ट्र अशा स्वरूपाच्या अभियानात आपले महायोगदान देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

## तारांकित ★★★★★★

### रेल्वेमंत्री लोकलमध्ये

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत मंत्रालयामध्ये ठरलेल्या बैठकीसाठी करी रोड रेल्वे स्थानकावरून रेल्वे मंत्री सुरेश प्रभू यांनी करी रोड ते सीएसटी असा रेल्वे प्रवास केला. यावेळी त्यांनी रेल्वे प्रवाशांशी संवाद साधला. प्रवाशांनी मुंबई लोकल संदर्भातील त्यांच्या समस्या या वेळी रेल्वे मंत्र्यांना सांगितल्या.



मुंबई लोकलच्या समस्यांची मला जाण असून, मुंबई संदर्भात घेतलेले निर्णय प्रत्यक्षात आणण्यासाठी आपण प्रयत्न करीत असल्याचे त्यांनी प्रवाशांना सांगितले. मुंबई लोकल संदर्भात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले असून त्याच्या गतिशील अंमलबजावणीसाठी प्रयत्न सुरू असल्याचेही ते म्हणाले. या वेळी त्यांच्या सोबत मुंबई महानगरपालिकेच्या महापौर स्नेहल आंबेकर व अन्य मान्यवर होते. मुख्यमंत्र्यांच्या भेटीच्या नियोजित वेळी पोहोचण्यासाठी त्यांनी हा मार्ग निवडला. त्यांनी अचानक घेतलेल्या या निर्णयामुळे रेल्वे अधिकाऱ्यांची व सुरक्षा अधिकाऱ्यांची तारांबळ उडाली. मुळचे मुंबईकर असणारे रेल्वे मंत्री सुरेश प्रभू यांनी अगदी सहजतेने प्रवाशांशी संवाद साधला. त्यांनी फर्स्ट क्लासच्या डब्ब्यातून हा प्रवास केला. या वेळी काही तरुणांनी त्यांच्यासोबत सेल्फी काढण्याचाही आनंद घेतला.

## 'पंचायत राज'साठी राज्याला पुरस्कार



पंचायत राज व्यवस्थेचे प्रभावी विकेंद्रीकरण केल्याबद्दल महाराष्ट्राला देशपातळीवरचा द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे. जमशेदपूर येथे एका कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राज्याच्या ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

राष्ट्रीय पंचायत राज दिनानिमित्त ग्रामोदयातून भारत उदय अभियानांतर्गत २४ एप्रिल रोजी जमशेदपूर (झारखंड) येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात महाराष्ट्रासह नऊ राज्यांना हा पुरस्कार देण्यात आला. पंचायत राज विकेंद्रीकरणात सन २०१४–१५ मध्ये महाराष्ट्र चौथ्या क्रमांकावर होते. ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांनी विभागाच्या सक्षमीकरणासोबतच अधिकारांच्या विकेंद्रीकरणाच्या अनुषंगाने विविध निर्णय घेतले. त्यामुळे या वर्षी महाराष्ट्राने चौथ्या स्थानावरून दुसऱ्या क्रमांकावर झेप घेतली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या कार्यक्रमात ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांच्या कामाचे कौतुक केले. ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव व्ही. गिरीराज हेही या वेळी उपस्थित होते.

## डाळींच्या दरावर नियंत्रण

राज्यात डाळींचे दर नियंत्रित ठेवण्यासाठी डाळींसाठी दर नियंत्रक कायद्याच्या प्रारुपास मंत्रिपरिषद बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. शासनाने निर्धारित केलेल्या दरापेक्षा जास्त दराने डाळीची विक्री केल्यास या कायद्यानुसार दंड आणि तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.




जीवनावश्यक वस्तूंचे दर नियंत्रित ठेवण्यासाठी जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या कलम ३ (क) अंतर्गत तरतूद करण्यात आली आहे. डाळींसाठी दर नियंत्रक कायदा हा या कायद्याला पूरक म्हणून तयार करण्यात येणार आहे. हा कायदा संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी लागू राहणार असून तूर डाळ, चना डाळ, उडीद डाळ किंवा अन्य कोणत्याही डाळी (आख्खी किंवा भरडाई केलेली) यांना लागू असेल. या कायद्यांतर्गत डाळींबाबत निश्चित करण्यात आलेले दर हे महानगरपालिका क्षेत्र, जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी वेगवेगळे असतील. व्यापारी किंवा उत्पादक यांनी या कायद्यातील कलम ५ पोटकलम १ (अ) नुसार अधिसूचित केलेल्या कमाल दरानुसार डाळींची विक्री करणे बंधनकारक असेल. शासन निर्धारित दरापेक्षा जास्त दराने डाळींची विक्री केल्यास या कायद्यानुसार दंड आणि तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. या कायद्याला केंद्र शासनाची परवानगी घेण्यासाठी पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

# तारांकित

## शासकीय नोकरीसाठी वयोमर्यादेत वाढ

शासकीय सेवेतील प्रवेशासाठीच्या कमाल वयोमर्यादेत ५ वर्षांने वाढ करण्यात आली आहे. यामुळे तरुणांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

राज्य शासन, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, जिल्हा निवड समित्या आणि विविध मंत्रालयीन विभागांनी नियुक्त केलेल्या निवड समित्यांमार्फत; शासन सेवा प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या निरनिराळ्या पदासाठींच्या स्पर्धा परीक्षांसाठी, असणाऱ्या उमेदवारांच्या कमाल वयोमर्यादेत आता ५ वर्षांची वाढ करण्यात आली आहे. या



निर्णयामुळे खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी सध्या असलेली कमाल वयोमर्यादा ३३ वरून ३८ वर्षे झाली असून मागासवर्गीय उमेदवारांसाठी सध्याची ३८ वर्षांची वयोमर्यादा आता ४३ वर्षे झाली आहे. याशिवाय सध्याच्या ज्या प्रवर्ग किंवा घटकांची कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक आहे, त्यामध्ये कोणतीही वाढ करण्यात आली नाही.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनसाठी ७ कोटी रुपयांची मदत जाहीर




भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला संविधानाबरोबरच कर्तव्य आणि जबाबदारीची जाणीव करून देण्याचे महान कार्य केले आहे. त्यांच्या समतेच्या विचारांमुळेच देश प्रगतिपथावर आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या दी पीपल्स इम्प्रुव्हमेंट ट्रस्टच्या नियोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन इमारतीच्या बांधकामाचा शुभारंभ मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते बाबासाहेबांच्या जयंती दिनाला दादर येथे झाला, मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमुळे स्वप्न पाहणाऱ्यांच्या पंखाना बळ मिळाले. त्यांनी नेहमी देशाच्या प्रगतीचा विचार केला. त्यांच्या विचारांमुळेच देश प्रगतिपथावर असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने राष्ट्रनिर्माते होते. त्यांच्या विचारांचा प्रसार आणि प्रचाराचे काम दी पीपल्स इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट करीत असल्याने, या ट्रस्टच्यावतीने बांधण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनासाठी शासनाच्या वतीने ७ कोटी रुपयांची मदत जाहीर करण्यात येत आहे. त्याचबरोबर यापुढे या भवनच्या बांधकामासाठी शासन सर्वतोपरी मदत करेल अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

## शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे मे महिन्यात भूमिपूजन

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जगातील सर्वात उंच अशा आंतरराष्ट्रीय स्मारकाचे भूमिपूजन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार असून या स्मारकाचे काम ४० महिन्यात पूर्ण करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.



कफ परेड येथे छत्रपती शिवाजी महाराज स्मारक उभारणीच्या कामासाठी स्थापन करण्यात आलेल्या क्षेत्रीय कार्यालय व आपत्कालीन कक्षाचे त्यांनी नुकतेच उद्घाटन केले. या आपत्कालीन कक्षाविषयी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, आवश्यक आणि अत्याधुनिक सुविधांनी सज्ज असा हा कक्ष अत्यंत उपयुक्त आहे. या स्मारकाच्या कामासाठी आवश्यक अशा सर्व परवानग्या केवळ एका वर्षात घेण्यात आल्या आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली असून भूमिपूजनाचा कार्यक्रम मे महिन्यात करण्यात येणार आहे. शिवाजी महाराजांचा कारभार जसा नियोजित होता त्याचप्रमाणे शिवस्मारकाचे कामदेखील नियोजित वेळेत पूर्ण करण्यात येईल.

## तारांकित

### विद्यार्थ्यांना एस.टी.बसपास शाळेतच मिळणार

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नजीकच्या गावात, शहरात शिक्षणासाठी सर्वाधिक सुरक्षित आणि स्वस्त प्रवास एसटीच देते. त्यामुळे ग्रामीण भागात विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात एसटीचा पास बनवावा लागतो. हा पास सुलभतेने व सहज मिळावा, यासाठी परिवहन मंत्री दिवाकर रावते यांनी एक पाऊल पुढे टाकले असून आता विद्यार्थ्यांना एस.टी.चा पास शाळेतच देण्याचा निर्णय परिवहन विभागाने घेतला आहे. राज्यातील जनतेला जलद व घरबसल्या सेवा देण्यावर सरकारने भर दिला असून सर्व आरटीओ



कार्यालये दलालमुक्त केले जातील, अशी ग्वाही परिवहनमंत्री दिवाकर रावते यांनी दिली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त रिक्षा परवाने वाटपात ५२ टक्के सामाजिक आरक्षण देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यामध्ये गिरणी कामगारांची मुले, गोवा मुक्तिसंग्राम व महाराष्ट्र सीमा लढ्यात शहीद झालेल्यांच्या वारसांचाही समावेश आहे. महिलांसाठी शेअर टॅक्सीमध्ये चालकाच्या शेजारची पहिली सीट राखीव ठेवण्यात आली आहे.

## ‘ब्रिक्स फ्रेंडशिप सिटीज कॉन्क्लेव्ह’




शहरे ही ’आहे रे’ वर्गाबरोबर ’नाही रे’ वर्गासाठीही राहण्याजोगी, परवडणारी आणि सुसह्य असली पाहिजेत. शहरांचा विकास करताना तो सर्वसमावेशक असायला हवा, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे व्यक्त केले. महाराष्ट्रातील शहरांचा विकास हा याच धोरणाने करण्यात येईल, असा विश्वास जागतिक समुदायापुढे मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. ते ‘ब्रिक्स फ्रेंडशीप सिटीज कॉन्क्लेव्ह’ परिषदेत ‘ब्रिक्स’ समुदायातील देशाच्या मुख्यमंत्री म्हणाले की, वाढत्या नागरीकरणाचा मुंबई शहर सामना करीत आहे. तसेच परवडणाऱ्या घरांच्या निर्मितीचेही आव्हान आहे.

शहरांचा विकास हा सर्वसमावेशक असल्याशिवाय तो शाश्वत स्वरूपाचा होऊ शकत नाही. या तीन दिवसांच्या परिषदेत नगरविकासविषयक विविध विषयांवर अत्यंत फलदायी अशी चर्चा झाली. ब्रिक्सचे सदस्य असलेल्या ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या पाचही देशांतील शहरांच्या विकासात या परिषदेचा निश्चित उपयोग होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. जगाच्या एकूण लोकसंख्येच्या ४२ टक्के लोकसंख्येचे ब्रिक्स देश प्रतिनिधित्व करते. त्यामुळे या संघटनेच्या आयोजनाकडे जगाचे लक्ष असते. शहरातील शाश्वत नियोजनावर भारत व अन्य देशातील परिस्थितीवर या बैठकीमध्ये व्यापक चर्चा झाली. भारताकडे फेब्रुवारी २०१६ पासून ब्रिक्स या संघटनेचे अध्यक्षपद आले असून ऑक्टोबर २०१६ मध्ये मुख्य परिषद होणार आहे.

## राज्याच्या सिंचनात वाढ

जलसंपदा विभागामार्फत सन २०१४-१५ या वर्षात ४४ हजार हेक्टर सिंचन क्षमता नव्याने निर्माण झाली आहे. त्यासोबतच ३५० दलघमी क्षमतेचे पाणीसाठे विभागामार्फत निर्माण करण्यात आले. यात नव्याने २१ प्रकल्पांची घळभरणी करून १०७ दलघमी पाणीसाठा निर्मिती समाविष्ट आहे. सन २०१५-१६ मध्ये एकूण २६ प्रकल्प पूर्ण करण्यात आले असून जून २०१६ पर्यंत ७१ हजार हेक्टर सिंचन क्षमता, ७६७ दलघमी पाणीसाठा निर्मिती अपेक्षित आहे, अशी माहिती जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

अर्थसंकल्पित केलेली पूर्ण तरतूद प्रकल्पांना उपलब्ध करण्याचे धोरण शासनाने स्वीकारले आहे. या वर्षी सन २०१६-१७ मध्ये जलसंपदा विभागाला ७८५७ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. निधीचे योग्य नियोजन करून या आर्थिक वर्षात १.६८ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता, ७६७ द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण करण्याचे तसेच २८ प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

शासनाने सन २०१५-१६ मध्ये रुपये ७,२७२ कोटीची तरतूद पूर्णत: वितरित केली आहे. मागील ५ वर्षांचा आढावा घेतल्यास मागील सरकारच्या काळामध्ये अर्थसंकल्पीय तरतुदीत २० ते ३० टक्के पर्यंत कपात केली जात असे. परंतु राज्यात दुष्काळी परिस्थिती असूनसुद्धा शासनामार्फत पाटबंधारे प्रकल्पांचे महत्त्व विचारात घेऊन कोणतीही कपात करण्यात आली नाही, असेही जलसंपदामंत्री श्री. महाजन यांनी सांगितले.

## तारांकित

### अजित जोशी यांना ‘पंतप्रधान पुरस्कार’

सोलापूरचे सुपुत्र व सध्या चंदिगडचे जिल्हाधिकारी असलेल्या अजित जोशी यांना ‘जनधन’ योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सर्वोत्कृष्ट जिल्हाधिकाऱ्याचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

राष्ट्रीय स्तरावर लोकप्रशासनात उत्कृष्ट व नावीन्यपूर्ण काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना दरवर्षी २१ एप्रिल रोजी ‘नागरी सेवा दिनी’



‘पंतप्रधान पुरस्कार’ देऊन गौरवण्यात येते. येथील विज्ञानभवनात प्रशासन सुधारणा व सार्वजनिक तक्रार निवारण मंत्रालयाच्यावतीने आयोजित कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी वर्ष २०१४-१५ साठी विविध श्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान केले. प्रशासन सुधारणा व सार्वजनिक तक्रार निवारण विभागाचे राज्य मंत्री डॉ. जितेंद्र सिंग, प्रधानमंत्र्यांचे मुख्य सचिव नृपेंद्र मिश्रा, कॅबिनेट सचिव बी.के.सिन्हा, प्रशासन सुधारणा व सार्वजनिक तक्रार निवारण विभागाचे सचिव देवेंद्र चौधरी या वेळी उपस्थित होते. केंद्र शासनाच्या ‘जनधन’, ‘स्वच्छ भारत अभियान(ग्रामीण)’, ‘स्वच्छ विद्यालय’ आणि ‘मृदा परीक्षण पत्र (सॉइल हेल्थ कार्ड) अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यांना विविध श्रेणींमधे पुरस्कार देऊन या कार्यक्रमात गौरवण्यात आले. केंद्रशासित प्रदेशांच्या श्रेणीत ‘जनधन’ योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणारे चंदिगडचे जिल्हाधिकारी अजित जोशी यांनी केली आहे.

# समृद्धी डाळिंब शेतीची...

पारंपरिक पिके अधिक खर्चिक आहेत. त्यापासून फारसे उत्पन्न मिळत नसल्याचा शेतकऱ्यांचा गेल्या

**यवतमाळ जिल्ह्यामध्ये पारंपरिक सोयाबीन, कापूस, तूर या पिकांना अपयश येत असताना डाळिंब शेतीचा नवा पर्याय स्वीकारून काही तरुण शेतकरी वार्षिक ३ लाखाच्या निव्वळ उत्पादनाचे उच्चांक गाठत आहेत. शासकीय योजना आणि मदत याच्या जोडीला कल्पकता वापरून व थोडे धाडस दाखवून केल्या गेलेल्या या प्रयोगाने अनेकांना शेती या विषयात रस निर्माण झाला असून, अशाच एका तरुण भावंडांची ही यशोगाथा.**



काही वर्षातील अनुभव आहे. त्यामुळे आता अनेक शेतकरी फळपिकांकडे वळत आहे. दारव्हा तालुक्यातील वरुड खेड येथील एका शेतकरी भावंडाने अशाच पारंपरिक पिकांना बाजूला सारत फळपिकांचा स्वीकार केला. संतोष व दिलीप मांगलेकर हे ते भावंड असून ते गेल्या दोन वर्षापासून डाळिंब पीक घेत आहे. यातून एकरी ३ लाखाचे उत्पन्न ते दरवर्षी घेतात.

कापूस आणि सोयाबीन किंवा तूर, ज्वारी अशी पारंपरिक पिके जिल्ह्यातील शेतकरी घेतात. नापिकी आणि निसर्गाच्या अवकृपेने शेतकऱ्यांना दरवर्षी या पिकांना फटका बसतो. कधी ओला तर कधी सुका दुष्काळही शेतकऱ्यांचे मोठे नुकसान करून जाते. त्यामुळे अशा परिस्थितीत तग धरू शकणारी आणि शाश्वत उत्पन्न देणारी पिके घेण्याकडे सद्या शेतकऱ्यांचा कल दिसून येत आहे. यवतमाळ जिल्ह्यातील मांगलेकर भावंड सुध्दा परंपरेने कापूस व सोयाबिनचे पिक घ्यायचे. या पिकास खर्च अधिक आणि उत्पन्न त्या तुलनेत कमी असल्याने त्यांनी फळपिकांचा स्वीकार केला.

पश्चिम महाराष्ट्रातील डाळिंबाची शेती व तेथील शेतकऱ्यांची संपन्नता पाहिल्यानंतर आपणही डाळिंबाचे पीक घेऊ शकतो, असा आत्मविश्वास निर्माण झाल्यानंतर दिलीप व संतोष मांगलेकर यांनी तीन वर्षापूर्वी शेतात साडेपाच एकर शेतात डाळिंबाची लागवड केली. तीन वर्षानंतर आलेल्या पहिल्या पिकातून त्यांना ५ लाख ५० हजारांचे उत्पन्न मिळाले. दुसऱ्या पिकात ५ लाखाचे उत्पन्न मिळाले. यातून ३ लाख रुपये खर्च वजा जाता ७ लाख ५० हजार रूपये निव्वळ नफा त्यांना शिल्लक राहिला आहे. त्यांनी तीन एकरात हजार तर अडीच एकर क्षेत्रात सातशे अशी एकूण १७०० डाळींब झाडांची लागवड केली होती. डाळिंबास सुरुवातीस अधिक खर्च येतो. मात्र त्यानंतर सलग दहा वर्ष डाळिंपासून भरपूर उत्पन्न मिळते. नंतर खर्चही कमी होत जातो. त्यामुळे डाळिंब पिकाची निवड केली असल्याचे संतोष मांगलेकर यांनी सांगितले. गेल्यावर्षी सोयाबिन पिकातून एकरी केवळ १४ हजाराचे उत्पन्न झाले होते. त्या तुलनेत डाळिंबापासून मिळणारे उत्पन्न हे बरेच अधिक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी डाळिंबासारख्या पिकाचा स्वीकार केला पाहिजे, असे मांगलेकर बंधूंनी सांगितले.

**मंगेश वरकड**

या भावंडांकडे साडेचार एकरात ऊसही असून त्यातूनही त्यांना चांगले उत्पन्न मिळते. पारंपरिक पिके अधिक खर्चिक व कमी उत्पन्न देणारी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी फळपिकांकडे वळावे, असे ते सांगतात.

**(लेखक हे यवतमाळ येथे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.)**
**संपर्क : ०९४०४१४०६६१**

# लोकराज्य

# भ्रमंती

## विशेष पुरवणी

महाराष्ट्र हा गडकिल्ले, वनसंपत्ती, धार्मिक स्थळे यांनी अतिशय समृद्ध असलेला प्रदेश. कायम देशविदेशातील पर्यटकांना आकर्षित करणारा. महाराष्ट्रात एकीकडे मन मोहवून टाकणारे समुद्रकिनारे आहेत, तर दुसरीकडे ताडोबा, पेंच, नवेगाव, नागझिरा, मेळघाट यांसारखी दाट वने आणि त्यात वाघापासून अस्वलापर्यंत तसेच विविध पक्षी यांचे वास्तव्य आहे. उन्हाळ्याच्या सुटीत अशा पर्यटन स्थळांना भेट देण्याचा आनंद काही औरच असतो. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागातील काही पर्यटन स्थळांची माहिती या विशेष पुरवणीत देण्यात आली आहे. ती वाचल्यावर प्रत्येकालाच आपला महाराष्ट्र हा अनलिमिटेड असल्याची खात्री पटेल.



# मौज न्यारी उन्हाळी पर्यटनाची

**उन्हाचा पारा चढू लागला की, अनेकजण उन्हाळी पर्यटनासाठी सज्ज होतात. एकतर उन्हाच्या काहिलीने जीव नकोसा होतो. त्यात मुलांना शाळेच्या सुट्ट्या असल्या की, त्यांनाही कुठे बाहेर घेऊन जावेसे वाटते. उन्हाळी पर्यटनासाठी अनेकजण युरोप किंवा देशाच्या उत्तरेकडे हिमालयाचा परिसर निवडतात. महाराष्ट्रात फार फार तर महाबळेश्वर, कोकण अशा तुलनेत थंड भागांकडे अनेकांचा कल असतो. पण, अलीकडे हा ट्रेंड बदलत चाललाय. आता उन्हाळी त्यातही वनपर्यटनाकडे पर्यटकांची पावले वळू लागली आहेत. त्यामुळे मागील काही वर्षात उन्हाळी वनपर्यटन चांगलेच लोकप्रिय होत आहे. उन्हाची चाहूल लागताच महाराष्ट्रातील व्याघ्र प्रकल्प आणि अभयारण्यातील सहलींचे नियोजन करण्यात अनेकजण मग्न होतात. ताडोबासारख्या व्याघ्र प्रकल्पाचे प्रवेश आरक्षण आणि रिसॉर्ट बुकिंग केव्हाच झालेले असते. एरवी उन्हाच्या काहिलीने वातानुकूलित खोलीतून बाहेर न पडणारे पर्यटकही उन्हाळी निसर्ग निरखायला बाहेर पडतात याची काही जादूई कारणे आहेत.**

मिलिंद उमरे

### पानगळ आणि वन्यप्राणी

महाराष्ट्रातील बहुतांश वने शुष्क पानगळीची आहेत. साधारणत: फेब्रुवारीपासून आपल्याकडे पानगळ सुरू होते. घनदाट राने काहीशी मोकळी होऊ लागतात. नजर दूरवर जाते. पावसाळा किंवा हिवाळ्यात जवळ असूनही प्राणी हिरव्या पानोळ्यात लपून जातात. हेच प्राणी पानगळीनंतर सहज दृष्टीस पडतात. अशा वेळेस वनभ्रमंती करताना खूप मजा येते. झाडांखाली पडलेल्या कोरड्या पाचोळ्यावर पाय देताच मोठा आवाज होतो. म्हणून जपून चालावे लागते. खूपदा दुरून पाचोळा तुडविल्याचा मोठ्ठा आवाज होतो. आपल्याला वाटते कुणी मोठा प्राणी येतोय. जवळ आल्यावर दिसतो तो छोटासा मुंगूस. उन्हाळा वाढत चालला की, जंगलातील पाणी कमी होऊ लागते. अनेक छोटे कालवे, झरे, पाणवठे कोरडे पडतात. मग मोजक्याच ठिकाणी पाणी असते. तहानलेल्या वन्यप्राण्यांना तिथे तहान भागवण्यासाठी यावेच लागते. म्हणजेच वन्यजीव दर्शनाची सर्वाधिक संधी याच काळात असते.







### पाणवठ्यातला वाघोबा

ज्यांनी वर्षभर वाघ बघण्यासाठी खटपट केली पण वाघोबा काही दिसले नाहीत, त्यांनी उन्हाळ्यात वनपर्यटन करावे. एखाद्या नैसर्गिक किंवा वनविभागाने तयार केलेल्या सिमेंटच्या पाणवठ्यात बसलेले वाघोबा नक्की दिसतील. वाघ हा पाणीप्रेमी प्राणी आहे. अनेकांना माहीत नसेल की, वाघ उत्तम जलतरणपटू असतो. वाघाचे मूळस्थान पृथ्वीच्या उत्तरेकडील सैबेरिया आहे. आपल्याकडच्या भारतीय वाघाचा (रॉयल बेंगाल टायगर ) मूळ वंशज मनाला जाणारा सैबेरीयन वाघ याच भागात आहे. मुळातला थंड प्रदेशातील असल्यामुळे वाघाला उन्हाळा अजिबात आवडत नाही. अशा वेळेस त्याला पाण्यात निवांत डुबत राहायला आवडतं. त्याच्याच मार्जार कुळातील बिबट्याला पाण्याचा फार सोस नाही. वाघाच्या भीतीने तो उन्हाळ्यातही पाण्याजवळ फार थांबत नाही. पण वाघोबा पाण्याच्या ठिकाणी नक्कीच रेंगाळतो. म्हणून अशा पाण–स्थळाजवळ वाघ नक्की दिसतो.

### चांदणरातीचे रान

उन्हाळी वनपर्यटन करताना व्याघ्रदर्शन हाच एकमेव उद्देश नसावा. आता शहरातील कृत्रिम रोषणाईत लख्ख पिठूर चांदण्याचं आकाश आपण हरवूनच बसलो आहोत. रानात अशा चांदण रात्री छान अनुभवता येतात. तुम्ही जंगल परिसरातच थांबले असाल तर सूर्य मावळताना रानात पायी निघा. उन्हाळ्यात साग, बिजा, तेंदू अशा अनेक वृक्षांचे खराटे झालेले असतात. रानातल्या निष्पर्ण वृक्षांकडे बघत राहा. अंधार पडू लागल्यावर जेव्हा आकाशात एक एक चांदणी दिसू लागेल तेव्हा तुम्हाला एक वेगळीच गंमत दिसेल. निष्पर्ण वृक्षांच्या काळ्याशार फांद्यांवर पानांच्या ठिकाणी चांदण्या लगडलेल्या दिसू लागतील. उन्हाळ्यात आपल्या चमकदार पांढऱ्या रंगामुळे भुताचे झाड म्हणून ओळखला जाणारा करू वृक्ष अशा रात्री भन्नाट दिसतो. जंगलातील एखाद्या तळ्याकाठी नक्षत्र

तारकांना न्याहाळत अशा चांदणरातीच रान बघणे हा एक विलक्षण अनुभव असतो.

## नर्तक पक्ष्यांची नवलाई

उन्हाळ्यात पक्षी निरीक्षणाची आवड असणाऱ्यांना नर्तक किंवा नाचण पक्ष्यांची नवलाई अनुभवता येते. हे नाचण पक्षी आणि इतर काही सुंदर छोटे पक्षी उन्हाळ्यात पाण्याजवळ राहणेच पसंत करतात. अशा वेळेस जंगलातील एखाद्या छोट्या ओढ्याजवळ या पक्ष्यांच्या करामती निरखता येतात किंवा एखाद्या झाडाच्या सावलीत भांड्यात पाणी ठेवले तरी स्वर्गनर्तक (पॅराडाईज फ्लायकॅचर), पंखेवाली नाचण (फ्यान टेल फ्लायकॅचर), नीलमणी नर्तक (ब्लॅक न्याप्ड ब्लू फ्लायकॅचर), जांभळा शिंजीर (पर्पल सनबर्ड) असे अनेक पक्षी निवांत बघता येतील. ताडोबा – अंधारी व्याघ्र प्रकल्पालगतच्या इरई नदीत वनविभागाने पर्यटकांसाठी खास बोटिंगची व्यवस्था केली आहे. त्यामुळे इरईच्या अथांग पाण्यात नौकाविहार करताना पाणपक्षीही निरखता येतील. बोटीने नदीत फिरताना शेकाटे (ब्लॅक विंग स्टील्ट) सारखे परदेशी स्थलांतरित पक्षी आणि इतरही अनेक पक्षी दिसले.

## मंतरलेल्या मचाणरात्री

मे महिन्यात बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी वनविभाग मचाणावरून वन्यजीव प्रगणना करत असतो. या उपक्रमात वनविभाग निसर्ग संस्था व व्यक्तींना सहभागी करून घेतो. या प्रगणनेसाठी तुमचा नंबर लागला तर तुम्हाला मचाणावरची मंतरलेली रात्र अनुभवता येईल. घनदाट रानात जिथे एखादा पाणवठा, ओहळ किंवा जलस्रोत असेल अशा ठिकाणी मचाण बांधलेली असते. या मचाणावर बसून पाण्यावर येणाऱ्या वन्यप्राण्यांची नोंद करायची. दिवसा कुणी पाण्यावर सहसा येत नाही. पण संध्याकाळ होऊ लागली की रान जाग होते. मग आधी एखादा मोर, चाकोत्री, ताडमांजर, चितळ, सांबर, माकडे पाण्यावर येऊ लागतात. कधी रानडुकरांची साद येते तर कधी गव्यांचा कळप आणि कधी तर जॅकपॉट लागतो. चक्क वाघोबाच येऊन बसतात पाण्यात. रात्री फिरणारे साळिंदर, चांदीअस्वल, झाडांवरून उडणारे पखमांजर (फ्लाइंग स्क्विरल) असे दुर्मीळ प्राणीही दिसतील. मी अशा अनेक रात्री अनुभवल्या आहेत. एक दिवसाच्या या प्रगणनेनंतर लगेच वाघ, बिबट यांच्या पाऊलखुणांचा अभ्यास (पगमार्क सेन्सस) असतो.

## अस्सल रानमेव्याची चव

उन्हाळी वनपर्यटनात तुम्हाला अस्सल रानमेव्याची चवही चाखायला मिळते. एरवी आपण बासुंदी, खीर किंवा अन्य पदार्थात सुकामेवा म्हणून चारोळी वापरतो. पण चारोळीचे फळ उन्हाळ्यात येते. त्याला चार म्हणतात. तुम्ही विदर्भातील जंगलात आलात की तुम्हाला हे आंबटगोड चार खायला मिळेल. याशिवाय कुड्याच्या फुलांची किंवा बहाव्याच्या पिवळ्याजर्द फुलांची भाजी विलक्षण चवीची असते.
तेंदूची फळे त्याला टेंभूर म्हणतात आपल्या चिकूपेक्षाही गोड असतात. गोड खिरन्या याच काळात मिळतात. हा काळ तसा लग्नाचाही असतो. एखाद्या खेडेगावातील लग्नात सहभागी होऊन तिखटजाळ तर्रीबाज वांग्याच्या भाजीवर ताव मारत; चिंचेच्या तिखट गोड आमटीचा आस्वाद घेण्याचा आनंद काही औरच असतो. पळसफूल, अंबाडीफूल, बेल, कवठ या फळांचे सरबत, कैरीचे पन्ह, तांदळाची, ज्वारीची आंबील, तांदळाचे पापड, कुरड्या, शेवया, गावठी आंब्याचा रस अशी सगळी मजाच मजा असते.

## काय काळजी घ्याल

उन्हाळी वनपर्यटन ताडोबा, नागझिरा, मेळघाट, बोर अशा ठिकाणी करत असाल तर विशेष काळजी घ्या. चंद्रपूरसारख्या जिल्ह्याचे तापमान या काळात ४२ अंशाच्या पलीकडे गेलेले असते. म्हणून भरपूर पाणी प्या. सुती कपड्यांचा वापर करा.

जंगलात पायी फिरत असाल तर स्कार्फ, टोपी वापरा. सोबत इलेक्ट्रॉल पावडर असू द्या किंवा साखर आणि मीठ एकत्र करून सोबत ठेवा. उन्हाचा त्रास झाला, गरगरल्यासारखे वाटले तर साखर मीठ तळहातावर तंबाखूप्रमाणे मळून फक्की मारायची. त्वरित ऊर्जा मिळेल. वनभ्रमंती करताना एकदम सकाळची किंवा ऊन कलल्यानंतरची वेळ निवडा. ज्यांना डोकेदुखी किंवा अन्य काही आजार असतील त्यांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार औषधे सोबत ठेवावी. अशी काळजी घेऊन तापणाऱ्या सूर्याच्या नाकावर टिच्चून उन्हाळी वनपर्यटनाचा आनंद घेता येईल.





**(लेखक हे वन्यजीव व जैवविविधता विषयाचे अभ्यासक आहेत.)**
**संपर्क : ०९४२३४२२३४८**



**'महाराष्ट्रातील पर्यटन' असे म्हटले की, डोळ्यासमोर उभे राहतो, निळ्याशार समुद्रावर पसरलेला हिरवागर्द कोकणपट्टा आणि सह्याद्रीतील डोंगरदऱ्या. पर्यटन ही संकल्पना गेल्या काही दशकांपासून रूढ झाल्यानंतर महाराष्ट्रात पर्यटनाचे भरपूर पर्याय उपलब्ध झाले आहेत. जसे पूर्वी शाळेच्या सहली, देवदर्शन, लग्नमुंज समारंभ किंवा सण यामुळेच पर्यटन घडत असे. परंतु आता यातील प्रत्येकाला आणि अशा इतरही अनेक कारणानिमित्त वेगवेगळ्या स्वरूपाचे पर्यटन पर्याय उपलब्ध आहेत.**

# साहसाचा आनंद

हल्ली अनेक कारणाने पर्यटन कधी संपूर्ण कुटुंबाबरोबर, तर कधी दोघेच, तर कधी मित्रमैत्रिणींच्या कंपू बरोबरही केले जाते. हल्ली नवीन कल, 'एकला चलो रे' म्हणत, बॅग खांद्याला अडकवून नियोजन न करता कुठेही कसेही भटकण्याचे रोमांचक अनुभव घेणाऱ्या एकांड्या शिलेदारांचा आहे. यातील सर्वच प्रकारात परस्परांशी किंवा नवनवीन व्यक्तींशी घडलेला संवाद, गप्पाटप्पा, खेळ, करमणुकीचे कार्यक्रम यातून परस्परांची आणि स्वत:चीही नव्याने ओळख व्हायला मदत होते. तसेच नवा उत्साह, ताजेपणा आणि टवटवीतपणा मिळतो.

प्रत्येक व्यक्तीला साहसाची ओढ कमी-अधिक प्रमाणात असतेच. प्रत्येकजण काहीतरी आगळेवेगळे करून स्वत:ला अजमावण्याच्या प्रयत्नात असतो. कोणी सायकलवरून देशभर प्रवास करतो, कोणी गिरिशिखरे पादाक्रांत करतो, तर कोणी समुद्राचा तळ आजमावून येतो. हे सगळेच प्रयत्न साहसी पार्यटनात मोडतात. याशिवाय आज साहसी पर्यटनात अनेक पर्याय उपलब्ध आहेत. जसे १) स्कूबा डाइव्हिंग २) रिव्हर क्रॉसिंग ३) जंगल सफारी ४) ट्रेकिंग ५) स्कीईंग (बर्फावरून घसरणे) ६) राफ्टिंग ७) कॅम्पिंग ८) हॉट एअर बलुनिंग ९) हेलिस्किइंग १०) पॅराग्लाइंडिंग ११) रॉक क्लाइंबिंग १२) बंजी जंपिंग १३) हायकिंग- गिर्यारोहण १४) हँग ग्लायडिंग १५) कॅम्पिंग इत्यादी.

ज्या महाराष्ट्राचे वर्णन

**राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा**
**नाजूक देशा, कोमल देशा, फुलांच्याही देशा**
**अंजन कांचन करवंदीच्या काटेरी देशा**
**बकुळफुलांच्या प्राजक्तीच्या दळदारी देशा...**

असे केले जाते, तेथे तर साहसाला भरपूर वाव आहे. त्यामुळेच आज महाराष्ट्रात साहसी पर्यटनाचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. यातील काही उपलब्ध पर्यायांची आता थोडक्यात माहिती करून घेऊया.

**अक्षता कुलकर्णी**

## १) कॅम्पिंग (Camping)

कॅम्पिंग करणे म्हणजे खुल्या मैदानावर अथवा पठारावर किंवा तत्सम सपाट भागावर तंबू ठोकून रात्र घालवणे. महाराष्ट्रात भंडारदरा येथे ही सुविधा उपलब्ध आहेत. भंडारदरा जाण्यासाठी मुंबईवरून कसारा लोकल पकडावी. कसारा स्टेशनवरून घोटी गावापर्यंत जाण्यासाठी बस अथवा जीप घ्यावी. घोटीपासून भंडारदरा येथे जाण्यासाठी जीप उपलब्ध आहेत. मुंबई, पुणे, नाशिक येथून तुम्ही स्वतंत्र वाहनानेसुद्धा भंडारदरा येथे पोहोचू शकता. याठिकाणी व्यक्तीमागे १०००/- रुपयात कॅम्पिंग करण्याची सुविधा उपलब्ध आहे. यातील विशेष हे आहे की, इथे मोकळ्या आकाशाखाली तुम्ही बेड लावून चांदण्या मोजत रात्र काढू शकता.

याशिवाय ठाण्यातील आदिवासी पाड्यांपैकी वाडा येथे कॅम्पिंग केले जाते. येथे ट्रेकिंग, टोपल्या विणणे, शेती, तराफा बनवणे, रोईंग असे विविध खेळाचे प्रकार उपलब्ध आहेत. तसेच गावकरी लोकनृत्यही सादर करतात. वाडा ठाण्यापासून ५८ किमी तर मुंबई पासून ८४ किमी दूर आहे. महाराष्ट्रात लहान मुलांचे कॅम्पिंग आयोजन करणाऱ्या अनेक संस्था आहेत. सूचनेनुसारही खासगी संस्था आयोजन करतात.

## २) पॅराग्लायडिंग

पॅराग्लायडिंग म्हणजे हवाई छत्रीच्या (Parachute) साहाय्याने उंचावरून मोकळ्या मैदानावर झेपावणे. सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये मैदानी भाग तसा कमीच आहे. परंतु लोणावळ्यापुढील कामशेतच्या गालिच्यावर आपण या खेळाचा आनंद घेऊ शकतो. कामशेतमध्ये पॅराग्लायडिंगची मजा लुटू शकतो. येथे २ किंवा अधिक दिवसांचे पॅराग्लायडिंग कोर्स उपलब्ध













आहेत. याखेरीज महाबळेश्वर, तळेगाव–दाभाडे येथेही काही प्रमाणात पॅराग्लायडिंग हा खेळ चालतो.

### ३) रिव्हर राफ्टिंग

खळाळणाऱ्या नद्यांची महाराष्ट्रात कमी नाही. परंतु, महाराष्ट्रातील नद्या बारमाही नसल्यामुळे ह्या खेळाचा आस्वाद आपण जुलै ते नोव्हेंबर अशा ठरावीक महिन्यात घेऊ शकतो. रायगड जिल्ह्यातील कोलाड येथे कुंडलिका नदीवर राफ्टिंग केले जाते. साधारणत: १२०० ते १५०० रुपयामध्ये या खेळाचा आनंद लुटू शकता. मुंबईपासून कोलाड साधारणत: १२२ किमी दूर आहे.

*साहसी क्रीडा प्रकारासाठी वेगवेगळ्या संस्था कार्यरत असून महाराष्ट्रात अनेक ठिकाणी या संस्थामार्फत साहसी क्रीडा प्रकारांचे प्रशिक्षण व साहसी पर्यटनासंदर्भात व्यवस्था केली जाते. या संदर्भात मोठ्या प्रमाणात ऑनलाइन माहिती उपलब्ध आहे. यातील काही संपर्क क्रमांक खाली दिले असून सर्व आस्थापना खाजगी आहेत.*

*कॅम्पिंगसाठी संपर्क: +९१ ९८३३१०११०१ / +९१ ९९८७२९४९६३ / +९१ ०२२ ६७११४९९९. पुणे – (०२०) ६६४९९९९९ आणि मुंबई – (०२२) २४२१८९२८, (०२०) ६६४४७७७७ / +९१ २२ २४०७ १२२०/ २१/ २२. infocountrysideindia.com अधिक माहितीसाठी भेट द्या: www.countrysideindia.com*

*पॅराग्लाइडिंगसाठी संपर्क: (०२२) २६०५३७२४ / (०२२) २६४९३११०*
*आणि भ्रमणध्वनी: +९१ ९३२३७ ०८८०९ / +९१ ९८२३३८४६५४*
*रिव्हर राफ्टिंगसाठी संपर्क +९१ ९९७५०१६१३*
*स्कूबा डायव्हिंगसाठी +९१ २२ २२०४४०४०*


### ४) स्कूबा डायव्हिंग

जसे आकाश उंच उडण्यासाठी माणसाला खुणावते तसेच समुद्राचा तळसुद्धा आपल्याला भुरळ घालतो. समुद्रातील एका आगळ्यावेगळ्या जीवसृष्टीचे दर्शन आपल्याला स्कूबा डायव्हिंग करून देते. महाराष्ट्रातील सर्वश्रुत स्कूबा डायव्हिंगचे ठिकाण म्हणजे तारकर्ली. महाराष्ट्र पर्यटन मंडळातर्फे तारकर्ली येथे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्कूबा डायव्हिंग आणि जलक्रीडा यांच्यामार्फत स्कुबा डायविंगचे प्रशिक्षण घेऊन तुम्ही या खेळाची मजा घेऊ शकता. साधारणात: १००० – १५०० रुपयांमध्ये आपण वेगळ्या जगाचा आनंद घेऊ शकता.

महाराष्ट्रात सह्याद्रीच्या कडेकपारीत हायकिंग– गिर्यारोहण; ताडोबा येथे वाइल्ड लाइफ सफारी; माथेरान, महाबळेश्वर येथे रॉक क्लाइबिंग यासारख्या अनेक थरारक क्षणांचा अनुभव घेऊ शकता. तुम्ही खेळ कुठलाही निवडा परंतु, काही गोष्टींकडे आवर्जून लक्ष द्या. उदाहरणार्थ जास्तीत जास्त पाणी प्या; तुम्हाला आरामदायक असतील असेच कपडे वापरा; फॅसिलिटेटर निर्देशांचे पालन करा; नेहमी आपल्या घोळक्यासोबतच राहा; एमपी३ प्लेअर किंवा तत्सम गॅझेट वापरणे टाळा; निसर्गाच्या नियमांचे पालन करा; तुम्ही जात असलेल्या स्थळाची – खेळाची संपूर्ण माहिती जाणून घ्या व मनाच्या पूर्व तयारीनीशी साहसाला सामोरे जा आणि वेगवेगळ्या अनुभवांचा परिपूर्ण आस्वाद घ्या.

**(लेखिका या साहसी पर्यटन क्षेत्रात कार्यरत आहेत.)**
**संपर्क : ०९७०२१०६५५९**

# साद देती सागर किनारे...



**महाराष्ट्राला लाभलेल्या ७५० किमीच्या समुद्राने, मोहिनी घालणारे अनेक सागरकिनारे दिले आहेत. कोणत्याही मोसमात ज्यांचे समुद्राशी नाते जुळते त्या दर्यावर्दी पर्यटकांना महाराष्ट्राची कोकण किनारपट्टी कायम खुणावत असते. राकट देशा असे वर्णन असणाऱ्या महाराष्ट्राला लाभलेली ही नाजूक सौंदर्याची किनार पर्यटकांना आपल्या नैसर्गिक सौंदर्याने आकर्षित करीत असते. त्यामुळेच देशविदेशातील पर्यटकांसह महाराष्ट्राची ही सागरी किनारपट्टी कायम गजबजलेली असते.**

संध्या गरवारे

सिंधुदुर्ग हे निसर्गाला पडलेले सुंदर स्वप्न, १२१ कि.मी.लांबीचा लाभलेला स्वच्छ सुंदर समुद्र, रमणीय खाड्या, सिंधुदुर्ग व विजयदुर्गसारखे गडकिल्ले, मनोहरी  दऱ्याखोऱ्या आणि घाटरस्ते, सागरी जैवविविधता, मंदिरे, देवस्थाने, रानमेवा, प्रसिद्ध देवालये, सांवतवाडीची लाकडी खेळणी, दशावतार व  चित्रकथीसारख्या प्राचीन लोककला, जोडीला चविष्ट खाद्यसंस्कृती, वन्यप्राणी अशा अनेक गोष्टींनी सिंधुदुर्ग जिल्हा समृद्ध आहे.

**सिंधुदुर्ग किल्ला :** छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेल्या ज्या किल्ल्याचे नाव अभिमाने घेतले जाते तो अभेद्य सिंधुदुर्ग किल्ला अर्थातच मालवण तालुक्यात आहे. ४८ एकर क्षेत्रात पसरलेल्या या किल्ल्याला चारही बाजूंनी तटबंदी असून किल्ल्याच्या भोवताली पाणी व ५२ बुरूज आहेत

**विजयदुर्ग किल्ला :** एकेकाळी देवगड हे अत्यंत महत्त्वाचे व सुरक्षित बंदर म्हणून प्रसिद्ध होते. बंदराला लागून १२० एकरात पसरलेला देवगडचा किल्ला हा आजही बऱ्यापैकी सुस्थितीत आहे.



किल्ल्याचे आवार म्हणजे एक विस्तीर्ण पठार आहे. किल्ल्यावरून बंदर, अथांग समुद्र, मच्छिमारी बोटी असे नयनरम्य दृश्य पाहायला मिळते.

**कुणकेश्वर व श्री भराडी देवी:** श्री क्षेत्र कुणकेश्वर हे देवगड तालुक्यातील यादवकालीन मंदिर समुद्रकिनारी असल्याने याचा परिसर नितांतसुंदर आहे. याशिवाय अनेक ऐतिहासिक धार्मिक स्थळे व मठ या परिसरात आहे.

### रुपेरी वाळूचे समुद्रकिनारे

सिंधुदुर्ग जिल्ह्यात आल्यानंतर आकर्षणाचा केंद्रबिंदू म्हणजे विस्तीर्ण समुद्रकिनारे होय. मालवण तालुक्यातील तारकर्ली, देवबाग, चिवला बीच, तोंडवली वेंगुर्ला तालुक्यातील भोगवे, निवती, खवणे, वायंगणी, सागरेश्वर, नवाबाग, मोचेंमांड, सागरतीर्थ, रेडी, शिरोडा तर देवगड तालुक्यातील गिर्ये, पडवणे, देवगड, मीठबुंबरी, तांबळडेग, मिठबांव या सर्व सागर किनाऱ्यांवर सकाळ व संध्याकाळ निरनिराळा अनुभव येतो.



भ्रमंती

**स्कूबा डायव्हिंग प्रशिक्षण संस्था :**

मालवणमधील देवबाग येथे जागतिक दर्जाचे अद्ययावत साधनसामुग्रीने सज्ज असे स्कूबा डायव्हिंग प्रशिक्षण केंद्र उभारण्यात आले आहे. कोणत्याही वयाची व्यक्ती हे सहज करू शकते.मात्र सोबतच्या प्रशिक्षकाच्या सूचना तंतोतंत पाळणे आवश्यक आहे.

**सावंतवाडीचा राजवाडा व लाकडी खेळणी :**

सावंतवाडी हे ऐतिहासिकालीन शहर आहे. सावंतवाडीतील राजवाडा, मोती तलाव, गंजिफा आर्ट, वुडवर्क पेंटींग, लॉकरवेअर या कला येथे पाहावयास मिळतात. राजवाड्याच्या दरबार हॉलमध्ये गंजिफा तयार करण्याचे (रंगवण्याचे) प्रात्यक्षिक, तयार लाकडी खेळणी, ऐतिहासिक पुरातन मूर्ती आहे. तसेच सावंतवाडीची लाकडी खेळणी ही या शहराची सार्वत्रिक ओळख आहे.

अधिक माहितीकरिता महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ,सिंधुदुर्गनगरी (०२३६२-२२८७८५) येथे व आपत्कालीन कामासाठी जिल्हा प्रशासन ०२३६२-२२८८४७ या क्रमांकावर पर्यटक संपर्क साधू शकतात.

**(लेखिका या सिंधुदुर्ग जिल्हा माहिती कार्यालयात माहिती साहाय्यक आहेत.)**
**संपर्क : ०९४२२९६१६४९**

## सिंधुदुर्ग जिल्ह्यात आल्यानंतर काय पाहाल ?

**मालवण तालुका : मालवण तालुक्यात सिंधुदुर्ग किल्ला, भराडीदेवी, धामापूर तलाव, देवबाग बॅकवॉटर, स्कुबा डायव्हिंग प्रशिक्षण केंद्र, तोंडवली व तळाशील बीच, तारकर्ली,चिवला बीच, वायंगणी खाडी, रामेश्वर मंदिर**
**देवगड तालुका : विजयदुर्ग किल्ला,कुणकेश्वर मंदिर,विमलेश्वर मंदिर-वाडा,रामेश्वर मंदिर गिर्ये, पडवणे,देवगड, मीठबुंबरी, तांबळडेग, मिठबांव समुद्रकिनारे व वाडातर**
**वेंगुर्ला तालुका : वेंगुर्ल्याची डच वखार,सागर बंगला दीपगृह, रेडीचा गणपती, सागरतीर्थ, मोचेंमांड, वायंगणी,निवती भोगवे, निवती, खवणे, वायंगणी,सागरेश्वर, नवाबाग,मोचेंमांड, रेडी, शिरोडा**
**सावंतवाडी तालुका: राजवाडा, लाकडी खेळणी, मोती तलाव, अंबोली,शिल्पग्राम ,सावंतवाडी बाजारपेठ**
**कुडाळ तालुका :- संत राऊळ महाराज मठ, ठाकर आदिवासी कलाआंगण, दत्तमंदिर माणगांव, वालावल खाडी**
**दोडामार्ग तालुका- तिलारी प्रकल्प, पावसाळ्यात मांगेली धबधबा**
**कणकवली तालुका- गोपुरी आश्रम, भालचंद्र महाराज मठ, सावडाव धबधबा, म्हाडकादेवी मंदिर, कासार्डे**
**वैभववाडी तालुका :-करूळ घाट,नापणे धबधबा,गगनगड**

## कसे पोहोचाल ?

**जवळचे विमानतळ : मुंबई**
**मुंबईपासून ५४० किमी अंतरावर**
**जवळचे रेल्वे स्टेशन : सिंधुदुर्ग.**
**याशिवाय कणकवली आणि कुडाळदेखील महत्त्वपूर्ण रेल्वे स्टेशन आहेत.**
**बससेवा : मुंबई-सिंधुदुर्ग**
**५४० किमी अंतरावर मुंबई-सिंधुदुर्ग बससेवा उपलब्ध**
**राहण्याची सोय: पंचतारांकितपासून स्थानिक रहिवाशांच्या घरी अल्प खर्चात व्यवस्था तसेच एमटीडीसी हॉलिडे रिसॉर्ट उपलब्ध**

# आध्यात्मिक पर्यटनानुभव



**अथांग पसरलेल्या समुद्राच्या सान्निध्यात असलेले निसर्गरम्य गणपतीपुळे पर्यटनाच्या दृष्टीने रत्नागिरी जिल्ह्यात येणाऱ्या पर्यटकांसाठी सर्वाधिक आवडते स्थळ ठरते. निळयाशार सागराच्या किनारी फेसाळणाऱ्या लाटांच्या पार्श्वभूमीवर मंदिराचे सौंदर्य खुलून दिसते. परिसरातील सुरूबन आणि नारळाची झाडे किनाऱ्याचे सौंदर्य खुलवतात. शांत आणि रम्य परिसरामुळे दरवर्षी लाखोंच्या संख्येने पर्यटक इथे येतात. श्रीगणरायाच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या या ठिकाणी पर्यटक निसर्गाच्या सौंदर्याप्रमाणेच आधात्मिक शांतीचादेखील अनुभव घेत असतात.**

सुमारे ४०० वर्षापूर्वी श्रींचे गुळ्याहून (गणेशगुळे) पुळ्याला आगमन झाले अशी आख्यायिका आहे. पेशवाईच्या काळात रमाबाई पेशवे येथे येऊन गेल्याचेही सांगितले जाते. अंगारकी, संकष्टी आणि माघ महिन्यातील गणेशचतुर्थीला देवदर्शनासाठी येथे भाविकांची रीघ लागते. परिसरातील उद्यान आणि मंदिर परिसराच्या सुशोभीकरणामुळे हे देवस्थान भाविक आणि पर्यटकांचे आकर्षण स्थळ बनले आहे.

## रमणीय समुद्रकिनारा

श्रीगणेश मंदिराच्या समोरच्या बाजूस विस्तारलेला पांढऱ्या वाळूचा समुद्रकिनारा आहे. स्वच्छ किनाऱ्यावर समुद्रस्नानाचा मनमुराद आनंद लुटता येतो. मात्र समुद्रात जाण्यापूर्वी स्थानिकांकडून माहिती अवश्य घ्यावी. किनाऱ्यावर गार वाऱ्याची झुळूक अंगावर घेत आनंद लुटण्यासाठी विविध प्रकारचे क्रीडा साहित्य भाड्याने मिळण्याची सुविधा आहे. वेगवेगळ्या सरबतांची चव येथे चाखायला मिळते. किनाऱ्यावर पॅरासिलिंगचा रोमांचित करणारा अनुभव पावसाळा संपल्यावर घेता येतो. अथांग समुद्राच्या पार्श्वभूमीवर सूर्यास्ताचे मनोहारी दृश्य कोकणची सफर स्मरणीय करणारे आहे.

## पर्यटन केंद्र

श्रीक्षेत्र गणपतीपुळे देवस्थानामुळे नावारूपाला आलेले, महाराष्ट्र पर्यटन विकास



महामंडळाचे गणपतीपुळे पर्यटन केंद्र आता आंतरराष्ट्रीय स्तरावरचे पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. या केंद्रात पर्यटकांसाठी व्हीआयपी कक्षासह, तंबू निवास व कोकणी हट्स बांधण्यात आलेल्या आहेत. परदेशी पर्यटकांना कोकणी हट्स आकर्षून घेतात. नारळाच्या दाट झाडीतील समुद्रकिनाऱ्यावरचे वास्तव्य पर्यटकांना सुखद अनुभव देणारे असते.

**विजय कोळी**

## प्राचीन कोकण दालन

गावात मंदिरापासून एक किलोमीटर अंतरावर असलेल्या 'प्राचीन कोकण' दालनास आवर्जून भेट द्यावी. कोकणातील पाचशे वर्षापूर्वीची संस्कृती या दालनाच्या माध्यमातून डोंगरावरील भागात प्रदर्शित केली आहे. प्रदर्शनाची माहिती देण्यासाठी सोबत 'गाईड'ची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. नक्षत्र उद्यानातील विविध वनस्पतींची माहिती घेत या दालनाची सफर घडते. शिल्पकलेच्या माध्यमातून कोकणी संस्कृतीचे हे अप्रतिम रूप पाहताना पर्यटक थक्क होतात. शिवाय पर्यटकांना कोकणातील वैशिष्ट्ये आठवणींच्या रूपाने घरी नेता यावी यासाठी वरच्या भागात खास विक्रीचे दालन आहे. डोंगराच्या अगदी वरच्या भागातील मचाणावरून दिसणारे गणपतीपुळ्याचे सौंदर्य विलोभनीय आहे. तासाभराच्या या सफरीत विविधरंगी पक्ष्यांचे दर्शनही घडते.

गणपतीपुळ्याला जाताना रत्नागिरीपासून १३ किलोमीटर अंतरावर आरे आणि वारे गावाच्या सीमेवर, डोंगरावरून समुद्राचे मोहक दृश्य पाहता येते. येणारे पर्यटक समुद्राचे सौंदर्य कॅमेऱ्यात बंदिस्त करण्यासाठी येथे आवर्जून थांबतात. सुरुच्या बनाने नटलेला सुंदर किनारा पर्यटकांना विश्रांतीसाठी आकर्षित करणारा असाच आहे. गणपतीपुळ्यापासून अवघ्या २ कि.मी. अंतरावर मालगुंड गावी आधुनिक मराठी कवितेचे जनक कवी केशवसुत यांचे स्मारक, कोकण मराठी साहित्य परिषदेच्यावतीने उभारण्यात आले आहे. स्मारकाचा परिसर अतिशय सुंदर आहे. हिवाळ्यात मालगुंड किनाऱ्यावर 'सीगल' पक्षी हजारोंच्या संख्येने येतात. हे विहंगम दृश्य कॅमेऱ्यात कैद करणे ही पर्यटकांसाठी मोठी पर्वणी असते.

**(लेखक हे रत्नागिरी जिल्हा माहिती कार्यालयात माहिती साहाय्यक आहेत.) संपर्क : ०९८६०३२४५८५**



### कसे जाल ?

मुंबई–गोवा महामार्गावर रत्नागिरीच्या अलीकडे निवळी फाट्यापासून हे स्थान ३५ किलोमीटर अंतरावर आहे. रत्नागिरी–गणपतीपुळे अंतर २५ किलोमीटर आहे. कोकण रेल्वेने मुंबईहून तर पुण्याहून येताना चिपळूण तसेच कराड–मलकापूरमार्गे बसेसची सुविधा आहे.

अंतर : गणपतीपुळे–मुंबई : ३३२ किमी, गणपतीपुळे –पुणे (चिपळूणमार्गे): ३२३ किमी, गणपतीपुळे –पुणे (मलकापूरमार्गे) ३२२ किमी, गणपतीपुळे –कोल्हापूर : १५४ किमी.

विमान : नजीकचे विमानतळ कोल्हापूर– १३५ किमी किंवा मुंबई ३५८ किमी.

रेल्वे : नजीकचे रेल्वे स्थानक– रत्नागिरी ३० किमी.

### निवास व्यवस्था

मंदिर परिसरात अनेक चांगली हॉटेल्स आणि एमटीडीसीच्या निवास–न्याहरी योजनेंतर्गत असलेली घरगुती निवास व्यवस्था मुबलक प्रमाणात आहे.

देवस्थानाचे भक्त निवास : ०२३५७–२३५२२३, २३५२२४

शासकीय विश्रामगृह बुकिंगसाठी दूरध्वनी : ०२३५२–२२३५०५.

एमटीडीसी पर्यटन केंद्र : ०२३५७–२३५२४८/२३५०६१/२३५०६२, फॅक्स – २३५३२८



आर्थर सीट पॉइंट



**उन्हाळयाच्या सुट्या आणि मनसोक्त भटकंती आजच्या जीवनमानाचा अविभाज्य भाग बनला आहे. खरे तर हा सुटीचा कालावधी, आपल्या प्रदेशाची ओळख करून घेण्याची नामी संधी असते. महाराष्ट्रासारख्या विस्तीर्ण पसरलेल्या प्रदेशात निसर्गाने मुक्तहस्ताने नैसर्गिक सौंदर्याची उधळण केली आहे. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या तीनही मोसमात भटकंती करण्यासाठी महाराष्ट्रात भरपूर पर्याय आहे. राज्यातील थंड हवेची ठिकाणे मे, जून महिन्यात पर्यटकांनी ओसंडून वाहतात. काही मोजक्या थंड हवेच्या ठिकाणांच्या माहितीचा हा आल्हाददायक प्रवास...**

# गारवा डोंगरातला...

## अद्‌भुत महाबळेश्वर

महाराष्ट्रातील सर्वात लोकप्रिय थंड हवेचे ठिकाण म्हणजे महाबळेश्वर होय. डोंगरदऱ्यांच्या नैसर्गिक सौंदर्याने नटलेल्या महाबळेश्वरला जुन्या मुंबई प्रांताची उन्हाळ्यातील राजधानी म्हणूनच संबोधले जात होते. महाबळेश्वर हे महाराष्ट्रातील थंड हवेचे प्रमुख ठिकाण आहे. तसेच महाबळेश्वर हे सह्याद्रीच्या पर्वतरांगांवर समुद्र सपाटीपासून सुमारे ४५०० फूट उंचीवर वसलेले आहे. येथील हिरवा निसर्ग, सुंदर बगिचे, उद्याने, अंगाला झोंबणारा वारा, श्वास रोखायला लावणारी डोंगराची दरी, मनाला मोहणारा 'इको' आणि प्राचीन मंदिरे यामुळे हे देशभरातील पर्यटकांसाठी एक प्रमुख आकर्षण आहे.

महाबळेश्वर परिसरात काही महत्त्वाचे बुरूज आहेत. या प्रेक्षणीय ठिकाणांना 'पॉईंट' म्हणतात. त्यांचे वैशिष्ट्य चिरकाल स्मरणात राहते. महाबळेश्वरवरून अर्ध्या तासाच्या अंतरावर प्रतापगड किल्ला आहे. तर २० मिनिटाच्या अंतरावर पाचगणी हे आणखी एका थंड हवेचे ठिकाण येथून



जवळच आहे. स्ट्रॉबेरीच्या येथील बागादेखील पर्यटकांचे प्रमुख आकर्षण आहे. आर्थर सीट पॉईंट हा महाबळेश्वरातील सर्वात प्रसिद्ध पॉईंट म्हणून ओळखला जातो. या पॉईंटच्या डावीकडे खोल दरीतून कोकणात जाणारी सावित्री नदी आहे तर उजवीकडे घनदाट जंगले आहे. याच मार्गावर 'टायगर स्प्रिंग', 'इको पॉईंट', 'एलफिस्टन पॉईंट' आहेत. 'एलफिस्टन पॉईंट' या ठिकाणच्या दरीचा तळ शोधणे हा अनुभव थरारक असतो. ईको पॉईंट हा आर्थर पॉईंटच्या मार्गावरच आहे. दिवसभराच्या भ्रमंतीत हा प्रियजनांचा नावाचा इको ऐकणे वेगळी अनुभूती ठरते. वेण्णा लेक परिसरही पर्यटकांचा विरंगुळा ठरले आहे. लिंगमळा वॉटर फॉल हे सहलीसाठी उत्तम ठिकाण आहे. बॉम्बे पॉईंट हा महाबळेश्वरमधील सर्वात प्रसिद्ध पॉईंट आहे.सर्व पर्यटक इथे मावळत्या सूर्याचे दर्शन घेण्याकरिता येत असतात. यालाच 'सनसेट' पॉईंट असेही म्हणतात. जुन्या महाबळेश्वर मध्ये महादेवाचे प्राचीन मंदीर आहे, यालाच क्षेत्र महाबळेश्वर असेही म्हणतात. महाबळेश्वर पासून ५ किमी अंतरावर क्षेत्र महाबळेश्वर आहे.या ठिकाणी अनेक धार्मिक स्थळे आहेत,तसेच १३ व्या शतकातील सर्वात जुने कृष्णाबाई मंदिर आहे.

## चिखलदरा

जैवविविधतेने संपन्न असलेल्या मेळघाटचा पूर्व वनप्रदेश म्हणजे चिखलदरा. समुद्रसपाटीपासून हे ठिकाण ३६६४ फूट उंचीवर आहे. विदर्भाचे नंदनवन आणि थंड हवेचे ठिकाण म्हणून ते अख्ख्या महाराष्ट्रात सुपरिचित आहे. गर्द वनराईतील चिखलदऱ्यात भटकताना येथील निसर्गसृष्टीचे अवलोकन करता करता सातपुड्यातील एका उंच अशा पंचबोल पॉईंटच्या दऱ्याखोऱ्यांतून कधी कधी वाघाची डरकाळी ऐकू येते. मात्र या सर्वांवर मात करते ते येथील आल्हाददायक वातावरण. त्यामुळेच येणाऱ्या पर्यटकांची पावले येथून माघारी फिरताना जड होतात.

अमरावतीवरून पन्नास किलोमीटरवरचे परतवाडा सोडले की, दूरवर सातपुडा पर्वताच्या विस्तीर्ण रांगा दृष्टीस पडतात. पुढे मग विदर्भाचे



नंदनवन असलेल्या थंड हवेच्या चिखलदऱ्याचे मनोहारी दर्शन होऊ लागते. मोरपिसाऱ्यासारखी सिल्व्हर ओकची झाडे मोहात पाडतात. वसंत ऋतूत आम्रवृक्षांच्या दुधाळ मोहराचा सुगंध दरवळत राहातो. ऐतिहासिक संदर्भ असलेल्या भीमकुंड, आवाजाचे पाच प्रतिध्वनी ऐकू येणारा पंचबोल, देवी पॉईंट, मोझरी पाईंट आणि जवळपास आठ नऊशे वर्षाचा इतिहास असलेला अबोल असा उपेक्षित गाविलगड किल्ला आपल्याला साद घालतो. येथील सृष्टीचे मनोहारी रूप वेड लावते. कधी कधी चिखलदऱ्याच्या रस्त्यावर वाघ,अस्वलाचेही दर्शन होते. हे ठिकाण ब्रिटिशांच्या राजवटीमध्ये उदयास आले. १८०३ मध्ये इंग्रजांनी गाविलगड किल्ला जिंकल्यावर तेथील लोक किल्ल्याच्या बाहेरील पहाडावर येऊन राहू लागले. चिखलदऱ्यातील जे पॉईंट आपण पाहतो, त्या सर्वांचे नामकरण ब्रिटिशांनी इंग्रज अधिकाऱ्यांच्या नावाने केले आहे. एका आवाजाचे पाच प्रतिध्वनी ऐकू येणारा पंचबोलचे नाव इको पॉईंट, मंकी पॉंईंट, बेलाव्हिस्टा पॉईंट,लॉंग पॉईंट, प्रॉस्पेट पॉईंट, बेलेन्टाईन पॉईंट, लेन पॉईंट, हरिकेन पॉईंट ही बहुतेक नावे ब्रिटिश अधिकाऱ्यांचीच आहेत. पावसाळ्यात 'भीमकुंड' पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी ओसंडून वाहत असते.

## अलौकिक माथेरान

महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या पर्वत रांगेमध्ये वसलेले एक अत्यंत सुंदर आणि निसर्गरम्य पर्यटनस्थळ म्हणजे माथेरान. समुद्र सपाटीपासून

| महाबळेश्वर | चिखलदरा | माथेरान | लोणावळा-खंडाळा |
|---|---|---|---|
| जवळचे विमानतळ :<br>पुणे २ तासांच्या अंतरावर<br>जवळचे रेल्वे स्टेशन :<br>वाठार तथापि पुणे अधिक सोयीचे.<br>बससेवा : मुंबई-महाबळेश्वर ४ तासांचे अंतर याशिवाय पुणे व नजीकच्या सर्व शहरांतून एसटी बसेसची सुविधा उपलब्ध.<br>राहण्याची सोय:<br>पंचतारांकितपासून स्थानिक रहिवाशांच्या घरी अल्प खर्चात व्यवस्था | जवळचे विमानतळ : नागपूरपासून ४ तासांच्या अंतरावर<br>जवळचे रेल्वे स्टेशन :<br>बडनेरा - अमरावती<br>बससेवा : अमरावती-चिखलदरा १०० कि.मी.अंतर आहे.<br>नागपूर-चिखलदरा २३० कि.मी., एसटी व खासगी बसेस उपलब्ध<br>राहण्याची सोय: एमटीडीसी रिसॉर्ट आहेत. याशिवाय मोठ्या प्रमाणात खासगी हॉटेल्स सर्व दरात उपलब्ध | जवळचे विमानतळ :<br>मुंबईपासून दीड तासांच्या अंतरावर<br>जवळचे रेल्वे स्टेशन : नेरळ-पुणे<br>बससेवा : मुंबई-नेरळ दीड तासाचा, नेरळ-माथेरान अर्ध्या तासाचा, पुणे-नेरळ २ तासांचा प्रवास. एसटी व खासगी वाहनांची उपलब्धता.<br>राहण्याची सोय:<br>पंचतारांकितपासून स्थानिक रहिवाशांच्या घरी अल्प खर्चात व्यवस्था व एमटीडीसी रिसॉर्ट | जवळचे विमानतळ :<br>पुण्यापासून १ तासाच्या अंतरावर<br>जवळचे रेल्वे स्टेशन :<br>लोणावळा मुंबईपासून २ तास तर पुण्यापासून १ तासाच्या अंतरावर<br>बससेवा : मुंबई-लोणावळा दीड तासाचे अंतर, पुणे-लोणावळा १ तासाचे अंतर.<br>राहण्याची सोय:<br>पंचतारांकितपासून अल्प दराची हॉटेल्स एमटीडीसी रिसॉर्ट |

जवळपास २६०० फूट उंचीवर डोंगराच्या कुशीत हे सुंदर पर्यटन स्थळ वसले आहे. माथेरान म्हणजे जणू निसर्गाने आपला सगळा खजिना येथे रिता केला असावा असा भास झाल्याशिवाय राहात नाही. निर्सगाचं हे अस्पर्शित रूप केवळ येथेच पाहायला मिळते. म्हणूनच देशातील कोणत्याही हिल स्टेशन (पर्यटनस्थळ) पेक्षा माथेरान निश्चितच वेगळे आहे.

१८५० साली ठाण्याचे तत्कालीन कलेक्टर ह्यूज मॅलेट यांनी उंच डोंगराच्या कुशीत वसलेल्या माथेरानची पर्यटन स्थळ म्हणून जगाला ओळख करून दिली. माथेरानची टॉय ट्रेन हे या पर्यटनस्थळाचे खास आकर्षण .सर आदमजी पीरभॉय यांनी १९०७ साली ही टॉय ट्रेन स्वखर्चातून सुरू केली.

नेरळ ते माथेरान या २२ किमीच्या रेल्वे मार्गात जुम्मापट्टी, वॉटर पाईप आणि अमन लॉज हे थांबे आहेत. नेरळवरून सुटलेल्या टॉय ट्रेनला माथेरानमध्ये पोहोचण्यासाठी दोन तास लागतात. पण हा दोन तासांचा प्रवास संपू नये असा एक वेगळा आनंद देऊन जातो. घनदाट जंगल आणि विविध वनस्पतींनी वेढलेल्या माथेरानमध्ये एकूण ३८ प्रेक्षणीय पॉईंट आहेत. येथे २७ जिवंत झरे आहेत. त्यापैकी मॅलेट स्प्रिंग, हॅरिसन स्प्रिंग वॉकर्स टँक हे झरे प्रसिद्ध आहेत. हे सगळे प्रेक्षणीय पॉईंट तुम्हाला पायी, घोड्यावरून किंवा हात रिक्षामधून फिरून पाहता येतील. तुम्हाला घोडेस्वारीचा छंद असेल तर माथेरान हे त्यासाठी अगदी योग्य ठिकाण आहे. माथेरानला जसे नैसर्गिक वैभव लाभलेय तसाच ऐतिहासिक वारसाही लाभला आहे.

टूर पेटीट,रेडी मनी, गुलिस्तान, क्रेगी बन, एल्फिस्टन, रॉबिन्सन, बार हाऊस, व्हरंडा इन द फॉरेस्ट या वास्तू व शंभर वर्ष जुने वाचनालय, पोस्ट ऑफिस, दूरध्वनी केंद्र आहे. या हेरिटेज वास्तू माथेरानच्या सौंदर्यात भर घालतात. पेमस्टर पार्क आणि एन. लॉर्ड गार्डन, छत्रपती शिवाजी उद्यान पर्यटकांचे नेहमीच आकर्षण राहिले आहे. येथील निसर्ग अजूनही प्रदूषणापासून कोसो दूर आहे. येथील जंगल, वृक्षवल्ली अगदी वेगळी असून दुर्मीळ वनस्पती, विविध पक्षी आणि प्राण्यांचे हे माहेरघर आहे. दुर्मीळ होत चाललेला शेकरू प्राणीही येथेच पाहायला मिळतो. तसेच बुलबुल पक्षीही याच परिसरात तुम्हाला पाहायला मिळेल.

## लोणावळा व खंडाळा

महाराष्ट्राच्या सौंदर्यात ज्या सह्याद्रीने भर घातली आहे त्यातील पाचू म्हणजे लोणावळा आणि खंडाळा. महाराष्ट्रात थंड हवेची जी काही मोजकी ठिकाणे आहेत. त्यात महाबळेश्वरनंतर लोणावळा आणि खंडाळ्याचा समावेश होतो. पुणे-मुंबई महामार्गावर समुद्र सपाटीपासून ६२५ मीटर उंचीवर असलेले लोणावळा, गेल्या अनेक दशकांपासून पर्यटकांना भुरळ घालत आहे. लोणावळा हा शब्द संस्कृत शब्द लोणावळी या शब्दांपासून तयार झाला आहे. याचा अर्थ होतो गुंफा.

कार्ला-भाजा येथील लेणी. लोहगड-विसापूर यांच्या वेढ्याने लोणावळ्याचे महत्त्व वाढले आहे. याशिवाय राजमाची किल्ला खंडाळ्यापासून २० मिनिटांच्या अंतरावर आहे. खूप खोल दऱ्या, हिरवाईने नटलेला डोंगर आणि वाऱ्याचा मंद प्रवाह यामुळे लोणावळ्यातून निसर्गप्रेमींचा पायच निघत नाही. लोणावळा आणि खंडाळा यांच्यात अंतर अगदीच पाच-सहा किलोमीटरचे आहे. लोणावळ्यापेक्षा खंडाळा थोडे आणखी शांत आहे. निसर्गाने जणू आपला खजिनाच इथे भरभरून रीता केल्याचा भास होतो. महाराष्ट्राच्या सह्याद्रीकडांना एक अलौकिक सौंदर्य बहाल झाले आहे. डोंगररांगातून जाणाऱ्या नागमोडी पायवाटा, त्या पायवाटांवर असलेली बोरी-जांभळीची झाडे विलक्षण अनुभव देऊन जातात. डोळ्यांसमोर साक्षात उभी निसर्गदेवता आणि जिभेवर रेंगाळणारी बोरांची आंबट पिठूर चव ही डोंगरमाथ्याकडे चालतानाची वैशिष्ट्य. लोणावळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे इथली चिक्की. लोणावळ्याच्या जवळच असलेल्या लोहगडाची सफर हा वेगळाच अनुभव आहे.

**संतोष पवार, ज्येष्ठ पत्रकार, महाबळेश्वर; प्र. सु. हिरूरकर, अमरावती आणि टीम लोकराज्य**





# शिवारातील फिरस्ती

**शहरी वातावरणात वाढणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना आपण खातो त्या भाज्या कशा निर्माण होतात, फळांची झाडे कशी असतात, दूध कोठून मिळते याचबरोबर शेतीविषयक विविध बाबींबाबत मोठे कुतूहल असते. शेती हा आपल्या संस्कृतीचा भाग आहे. अनेक सण, उत्सव, परंपरा या शेती व्यवसायाशी निगडित आहेत. ग्रामीण शेती, संस्कृती, लोकजीवन, उत्सव, खाद्यसंस्कृती इत्यादींची शहरवासीयांना निसर्गरम्य वातावरणात ओळख व्हावी यासाठी कृषी पर्यटन उत्तम पर्याय ठरतो. ग्रामीण भागात कृषी पर्यटनाची मोठी संधी निर्माण झाली आहे. राज्यात विविध ठिकाणी कृषी पर्यटन केंद्रे उभारली आहेत.**

**विनयकुमार आवटे**

शेती हा देशाच्या व राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कारण देशातील ७० टक्के तर राज्यातील ५५ टक्क्यांहून अधिक लोकसंख्या आपल्या चरितार्थासाठी थेट शेती व्यवसायावर अवलंबून आहे. महाराष्ट्र राज्यात असलेले जवळपास ८२ टक्के कोरडवाहू क्षेत्र, ५२ टक्के अवर्षणप्रवण क्षेत्र, ४० टक्के हलक्या जमिनीचे क्षेत्र, अनियमित पाऊस, अतिवृष्टी, अवर्षण, गारपीट, कृषी मालाच्या बाजार भावातील अनपेक्षित चढ-उतार, पायाभूत सुविधांची कमतरता यासारख्या विविध समस्या शेती व्यावसायिंकासमोर आहेत.

या पार्श्वभूमीवर शेती व्यवसायातून उत्पन्नात स्थिरता प्राप्त करण्याच्या दृष्टीने शेतकरी आतापर्यंत पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यशेती व विविध प्रकारचे कुटीरोद्योग करायचे. नव्या पिढीला मात्र शेतीविषयक विविध बाबींबाबत मोठे कुतूहल असते. शेती हा आपल्या संस्कृतीचा भाग आहे. अनेक सण, उत्सव, परंपरा या शेती व्यवसायाशी निगडित आहेत. अशा परिस्थितीत ग्रामीण शेती, संस्कृती, लोकजीवन, तेथील रूढी, परंपरा, उत्सव, जत्रा, खाद्यसंस्कृती, लोककला इत्यादी विविध बाबी पाहणे, त्यांची अनुभूती घेणे व आपल्या मुलांना त्याचा अनुभव देणे हे त्यांना आवडते. शहरी वातावरणात कंटाळलेले युवकयुवती देखील मनाला शांतता लाभावी, निसर्गरम्य वातावरणात जावे म्हणूनदेखील ग्रामीण भागातील असा अनुभव देणाऱ्या कृषी पर्यटन केंद्राच्या शोधात असतात.



या पार्श्वभूमीवर कृषी पदवी, अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन व इतर क्षेत्रातील अभ्यासक्रम पूर्ण केलेले अनेक युवक/युवतींनी शहरी भागातील ही गरज ओळखून राज्यात विविध ठिकाणी कृषी पर्यटन केंद्रे उभारली आहेत.

### कृषी पर्यटन केंद्रातील रेलचेल

बहुतांशी कृषी पर्यटन स्थळांमध्ये काही ग्रामीण वैशिष्ट्यांचा समावेश असतो. उदा. **ग्रामीण लोककलांमध्ये** भारूड, गोंधळ, जागरण, कीर्तन, वासुदेव, गारुड्याचा खेळ, डोंबाऱ्यांचा खेळ, लेझीम खेळणे इत्यादींचे प्रात्यक्षिक दाखवले जाते. **पिकांमध्ये** भात, बाजरी, गहू, मका, ज्वारी, तूर, मुग, उडीद, भुईमूग इत्यादी पिकांची लावणी, व्यवस्थापन, काढणी व वितरण बाबत माहिती, प्रत्यक्ष कार्यानुभव दिला जातो. याशिवाय हरितगृह, रोपवाटिका, आंबा, काजू, संत्रा, मोसंबी, द्राक्ष इत्यादी फळपिकांची लागवड, व्यवस्थापन, काढणी, प्रक्रिया व विपणनबाबत तसेच दुग्धव्यवसाय, पशूपालन, कुक्कुटपालन याबाबत माहिती व प्रत्यक्ष कार्यानुभव दिला जातो. नदी, ओढे, विहीर, शेततळे यामध्ये पोहणे इत्यादी



साहस अनुभवता येते. याशिवाय स्थानिक हस्तकला– सुतार, लोहार, कुंभार, कोष्टी इत्यादी. साहसी पर्यटन संधी, स्मारके भेट, पक्षी निरीक्षण, धरणे, जलशेत्र, धार्मिक श्रद्धास्थाने, ऐतिहासिक किल्ले, गुंफा भेटी, द्राक्ष महोत्सव, फळपीक महोत्सव, धान्य महोत्सव भेटी, आठवडे बाजार, वाईनरी, गुऱ्हाळ, मधुमक्षिका प्रकल्प भेट, ग्रामीण जेवणाचा स्वाद– चुलीवरील पिठलं, भाकरी, ठेचा, चपाती, चटणी, लोणची, दही, दूध, ताक, वांगे भरीत, हुरडा याची चव घेता येते. ग्रामीण यात्रा, महोत्सव, जत्रांमध्ये सहभाग नोंदवता येतो. ग्रामीण खेळांमध्ये सहभाग – बैलगाडी, ट्रॅक्टर मधून सफारी, घोड्यावरुन रपेट, विटी–दांडू, हुतुतू, आट्या–पाट्या, गोट्या, सूरपारंब्या इत्यादी खेळांची ओळख करून दिली जाते.

## काही वैशिष्ट्यपूर्ण कृषी पर्यटन केंद्रे

**१. पराशर कृषी पर्यटन केंद्र –** राजुरी, ता. जुन्नर, जि. पुणे येथे मनोज हाडवळे या फलोत्पादन शाखेतील पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या तरुणाने ऋषी पराशर या कृषिविषयक पहिला ग्रंथ लिहिणाऱ्या ऋषींच्या नावे हे पर्यटन केंद्र सुरू केले आहे. या ठिकाणी एका वेळेस ४० हून अधिक पर्यटकांची निवास सुविधा असून द्राक्ष, डाळिंब, वनपर्यटन, आठवडी बाजार, दुग्धव्यवसाय, डेअरी, लोककला व मासवडी–भाकरी सारखे पाटावर बसून घ्यावयाचे जेवण अशा विविध बाबी येथे उपलब्ध आहेत. मुंबईपासून साधारणतः १५० व पुणे–नाशिकपासून ११०–१२० किलोमीटर अंतरावर हे ठिकाण आहे. (संपर्क : www.hachikotour-ism.in)

**२. सगुणा बाग –** नेरळ (ता. कर्जत, जि. रायगड) येथे चंद्रशेखर



भडसावळे या कोकण कृषी विद्यापीठातून कृषीविषयक शिक्षण घेतलेल्या व अमेरिकेत जाऊन काही काळ काम केलेल्या कृषी पदवीधराने जवळपास १९९५–९६ मध्ये हे कृषी पर्यटन केंद्र सुरू केले आहे. या ठिकाणी शेततळ्यांमधील मत्स्यपालन, भातशेती, नारळ, आंबा, चिकूसारखी फळपिके आणि शेतीविषयक विविध भाजीपाला व इतर पिकांची लागवड आहे. या ठिकाणी ग्रामीण खेळांचा अनुभवदेखील आपण घेऊ शकतो. या



पर्यटन केंद्रावर तळ्यामध्ये असलेले घर ही वैशिष्ट्यपूर्ण बाब आहे. माथेरान हे थंड हवेचे ठिकाण येथून जेमतेम १५ ते २० किमीपर्यंत आहे. आपण नेरळपर्यंत मुंबईहून लोकल रेल्वेने जाऊ शकतो. तेथून जेमतेम ६ किमी अंतरावर असलेल्या सगुणा बागेत प्रवाशांची नेण्या–आणण्याची व्यवस्था आहे.
(संपर्क–www.sagunabaug.com)

**३. तापोळा कृषी पर्यटन शेतकरी व्यावसायिक कंपनी –** गणेश उत्तेकर व काही युवा प्रयोगशील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन तापोळा या कोयना बॅक वॉटर असलेल्या महाबळेश्वर नजीकच्या ठिकाणी कृषी पर्यटन व्यावसायिक शेतकऱ्यांची कंपनी स्थापन केली आहे. या ठिकाणी कंपनीतील सभासद शेतकरी हे पर्यटकांचे राहणे, भोजन व स्थानिक कृषी पर्यटनाची सोय करतात. (संपर्क: www.tapolatourism.com)

**४. आनंद कृषी पर्यटन केंद्र –** बोरगाव, (ता.जि. सातारा) येथे आनंद शिंदे या प्रयोगशील शेतकऱ्याने हे केंद्र उभारले असून या ठिकाणी मुलांसाठी रेनडान्स, लॉनवरील खेळ, साहसी क्रीडाप्रकार इत्यादी अनेक सुविधा आहेत. या ठिकाणी पाचगणी येथील शाळेतील विद्यार्थ्यांच्या सहली ग्रामीण कार्यानुभवासाठी मोठ्या प्रमाणावर भेटी देतात.
(संपर्क: www.anandagrituri‌sm.com)

**५. पळशी कृषी पर्यटन केंद्र –** पांडुरंग तावरे यांनी राज्यातील विविध कृषी पर्यटन व्यावसायिकांना कृषी पर्यटन विकास संस्थेच्या माध्यमातून एकत्र आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. कृषी पर्यटनात केलेल्या कामाबद्दल त्यांना राष्ट्रीय पर्यटन पुरस्कारासह अनेक देशांचे विविध पुरस्कार मिळाले आहेत. त्यांनी उभारलेले पळशीवाडी (ता. बारामती, जि. पुणे) येथील पर्यटन केंद्र शहरी पर्यटकांची नाळ ग्रामीण भागाशी जोडण्याचे काम करत आहे. (संपर्क: www.agritourism.in)

## एक अलौकिक अनुभव

कृषी पर्यटनातून मोठ्या प्रमाणात व्यावसायिक संधी निर्माण झाल्या असून राज्यात आजमितीस जवळपास २१० हून अधिक कृषी पर्यटन केंद्रात दरवर्षी जवळपास ८ लाखाहून अधिक पर्यटक भेटी देत असतात.

**(लेखक हे कृषी भवन, पुणे विभाग येथे अधिक्षक कृषी अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०९४०४९६३८७०**


रायगड


राजगड


शिवनेरी


प्रतापगड


विजयदुर्ग

# दुर्ग पर्यटन

**दुर्ग पर्यटन हा एक अत्यंत वेगळा विषय आहे. नेहमीप्रमाणे जसे पर्यटक पर्यटन स्थळांना भेटी देत असतात, तेवढे दुर्ग पर्यटन सोपे नाही. यामध्ये थोड्या फार प्रमाणात शारीरिक क्षमता उत्तम असणे गरजेचे असते. अशा स्वरूपाचे पर्यटन अनेक निसर्गप्रेमी, गडप्रेमी गेली अनेक वर्षे करीत आहेत. कोणी ते ऐतिहासिक स्थळ म्हणून पाहायला जातो तर कोणी त्या गडावरील पक्षी आणि प्राणी यांचा अभ्यास करायला जातो. पण किल्ला आणि तेथील उभ्या असलेल्या पुरातन वास्तू हे त्या ठिकाणाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. सह्याद्रीतील उंच डोंगरमाथ्यावर असलेली कारवी तसेच हिरडा, बेहडा, साग या झाडांची पाने गळायला सुरुवात होते. सगळीकडे डोंगरांवर पिवळेधम्म रंगांचे गवत दिसायला लागते. अशा वेळी जर गडकिल्ल्यांवर भटकंती करायची असे ठरवले तर आपल्याकडे महाराष्ट्रात अनेक गडकिल्ल्यांचे पर्याय उपलब्ध आहेत.**

**डॉ. सचिन जोशी**

वासोटा, हरिश्चंद्रगड, भैरवगड, प्रचीतगड यांसारख्या सह्याद्रीच्या घाट माथ्यावर असलेल्या किल्ल्यांवर पावसाळ्यात जाता येणे शक्य होत नाही. वासोटा,

भैरवगड यांसारख्या किल्ल्यांवर पावसाळ्यात जळवा असतात. जळवा माणसाच्या पायांना चिकटतात आणि रक्त शोषून घेतात. त्यामुळे अशा ठिकाणी असलेल्या किल्ल्यांवर हिवाळ्यात किंवा उन्हाळ्यातच भ्रमंती करावी लागते. जीवधन, हर्षगड किंवा हरिहरगड, रतनगड यासारख्या किल्ल्यांवर पोहोचण्याच्या वाटा सोप्या नाहीत. काही ठिकाणी अवघड अशी शिडी आहे, तर काही ठिकाणच्या पायऱ्या वाटेत तुटल्या आहेत, काही ठिकाणी तर दोर लावूनच किल्ल्यावर चढावे लागते. अशा ठिकाणी जर मोठ्या प्रमाणत पाऊस असेल तर किल्ल्यावर पोहोचता येत नाही. उन्हाळ्यात किल्ल्यांवरील अनेक अवशेष पूर्णपणे उघडे पडतात. पावसाळ्यात आणि हिवाळ्यात गडांवरील वास्तूंवर आणि बांधकामांच्या जोत्यांवर खूप गवत वाढलेले असल्यामुळे त्या झाकल्या जातात. गड किल्ल्यांवर खापरे, मणी, बांगड्या यांसारख्या अनेक पुरातन अवशेष उन्हाळ्यामध्ये सहज दिसू शकतात. उन्हाळ्यामध्ये किल्ल्यांवर भटकंती करताना आंबा, फणस, करवंद, जांभूळ असा नैसर्गिक रानमेवा खाण्याची मजा लुटता येते.

घनदाट जंगल असलेले किल्ले सह्याद्रीच्या मुख्य रांगेत साधारणतः दक्षिण महाराष्ट्रात जास्त प्रमाणात पाहायला मिळतात. महाबळेश्वरजवळील प्रतापगड हा किल्ला कोकण आणि देश यांच्या सीमारेषेवर वसलेला आहे. जावळीच्या दाट जंगलात शिवाजी महाराजांनी हा किल्ला बांधला. अफझलखान जेव्हा स्वराज्यावर चालून आला तेव्हा महाराजांनी त्याला वाईमधून प्रतापगडाजवळ भेटायला बोलावले. असे करण्यामागचे मुख्य कारण म्हणजे या परिसरात असलेले जंगल. याच परिसराचा आधार घेऊन महाराजांनी अफझलखानाचा वध केला आणि त्याच्या सैन्याचादेखील पराभव केला. प्रतापगड या वनदुर्गावर जाण्यासाठी महाबळेश्वर येथील मुंबई पॉइंट या ठिकाणापासून चालत एका तासात पार या गावापर्यंत पोहोचता येते आणि तेथून अर्ध्या तासात गडावर पोहचू शकतो. घनदाट जंगलाने वेढलेल्या या किल्ल्यावर गाडीमार्गानेदेखील अनेक पर्यटक जात असतात. विशेषतः उन्हाळ्यात या किल्ल्यावर थंड वातावरण असते. प्रतापगडाशेजारीच मधु-मकरंदगड नावाचा अजून एक वनदुर्ग झोलाई खिंडीच्या समोर वसलेला आहे. या किल्ल्याशेजारूनच हातलोट घाट कोकणात उतरतो. घनदाट जंगलातील पायवाटेने तीन चार तासांची पायपीट करून रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यात पोहोचता येते. रात्रीच्या वेळी मधु-मकरंदगडावर मुक्काम करण्यासाठी शंकराचे मंदिर आहे. भर उन्हाळ्यातदेखील रात्री गडावर प्रचंड थंडी जाणवते. गडाच्या माचीवर घोणसपूर नावाचे गाव वसलेले आहे. मधु-मकरंदगडाचा परिसर म्हणजे कोयना धरणाच्या फुगवट्याचे शेवटचे टोक.



वासोटा हा देखील एक वनदुर्ग असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात तो बांधला गेला आणि त्यानंतर शाहू महाराजांच्या काळात या किल्ल्याचा वापर तुरुंग म्हणून केला गेला. याचे मुख्य कारण म्हणजे या परिसरात असलेल जंगल आणि तेथील जंगली श्वापदांची भीती. आज किल्ल्याच्या पायथ्यापर्यंत पोहोचण्यासाठी कोयना धरणाचा फुगवटा बोटीने पार करून जावे लागते. मेट इंदवली नावाचे गाव हे पूर्वी किल्ल्याच्या पायथ्याला होते. वन विभागाने ते गाव काही वर्षांपूर्वी उठविले. आता उन्हाळ्यात धरणाचे पाणी कमी होते तेव्हा त्या गावातील घरांचे अवशेष दृष्टीस पडतात. वासोटा किल्ल्यावर जाताना मात्र एकट्याने भ्रमंती करू नये.

महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर आणि खाड्यांच्या मुखावर १०० पेक्षा जास्त सागरीदुर्ग मध्ययुगीन कालखंडात बांधले गेले. किनारी दुर्गांबरोबरच नऊ जलदुर्ग किनाऱ्याजवळील बेटांवर बांधले गेले. अशा जलदुर्गांवर हिवाळा किंवा उन्हाळा या दोनच ऋतूमध्ये जाणे सोयीस्कर असते. पावसाळ्यात कोकणात प्रचंड पाउस पडत असल्याने स्थानिक लोकांनादेखील घराबाहेर पडणे अशक्य होते. मुरुडजवळील जंजिरा किल्ला, विजयदुर्ग, रेडी, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग या किल्ल्यांवर उन्हाळ्यात पर्यटनासाठी जाता येऊ शकते. उन्हाळ्यातदेखील या किल्ल्यांच्या परिसरात छान वारा असतो आणि दमटपणादेखील म्हणावा तसा त्रास होत नाही. किनारी आणि जलदुर्गामध्ये सकाळी १० वाजेपर्यंत आणि संध्याकाळी चारनंतर आल्हाददायक वातावरण असते. सुवर्णदुर्ग, फत्तेदुर्ग, कनकदुर्ग, गोवा, असे चार महत्त्वाचे किल्ले हर्णे बंदराजवळ आदिलशाही आणि मराठा साम्राज्याच्या कालखंडात बांधले गेले. सुवर्णदुर्ग हा यामधील सर्वात महत्त्वाचा किल्ला असून तेथे जाण्यासाठी बोटीने समुद्रातून साधारणतः अर्ध्या तासाचा प्रवास करावा लागतो. हा चार किल्ल्यांचा समूह, प्राचीन बंदरे आणि अनेक पेशवेकालीन मंदिरे दापोली परिसरात पाहायला मिळतात. मालवण जवळील सिंधुदुर्ग हा जलदुर्ग छत्रपती शिवाजी महाराजांनी कुरटे या बेटावर बांधला. महाराष्ट्रातील पर्यटकांचे मुख्य आकर्षण असलेल्या या किल्ल्याला भेट देण्यासाठी हजारो पर्यटक येत असतात. याच सिंधुदुर्ग किल्ल्यापासून उत्तरेला २० किमी अंतरावर भरतगड आणि भगवंतगड नावाचे दोन किल्ले गड नदीच्या काठावर आहेत. या किल्ल्यांवर खूप काही बांधकामे केलेली दिसत नाहीत तरीदेखील या किल्ल्याचा परिसर म्हणजे कोकणातील अप्रतिम निसर्ग सौंदर्याचा खजिनाच आहे असे म्हणावे लागेल. गड नदीच्या उत्तर काठावर भगवंतगड आणि दक्षिण काठावर भरतगड मध्ययुगीन काळात बांधलेला होता. दोन्ही किल्ल्यांच्या मधून वाहणाऱ्या गड नदीचा उगम सह्याद्रीच्या मुख्य रांगेतील भैरवगड या किल्ल्याजवळ होतो. मालवणच्या उत्तरेला असलेल्या सर्जेकोट किल्ल्याजवळ गड नदी अरबी समुद्राला येऊन मिळते. भरतगड, भगवंतगड सारखेच वेंगुर्ला, निवती हे किल्ले जरी आकाराने छोटे असले तरी या परिसरातील निसर्गसौंदर्य निश्चितच पाहण्यासारखे आहे. रेडी हा महाराष्ट्राच्या समुद्र किनाऱ्यावरील दक्षिण दिशेचा शेवटचा किल्ला म्हणता येईल. हा किल्ला आदिलशाही, मुघल, मराठा, इंग्रज, पोर्तुगीज, सावंतवाडीकर भोसले अशा अनेक राजसत्तांकडे होता. त्यांनी वेगवेगळ्या काळात या किल्ल्यांवर त्यांच्या सोयीप्रमाणे बांधकामे केली. किल्ल्यावर आजही सहा दरवाजे, तीन मजली इमारती, खंदक इतक्या गोष्टी पाहायला मिळतात.

**(लेखक पुणे येथील डेक्कन महाविद्यालयात पुरातत्त्व विभागात संशोधक आहेत.)**
**संपर्क : ०९८२२१०९३६२**



**राज्याच्या पर्यटन क्षेत्रातील पायाभूत सुविधांचा विकास करण्याबरोबरच पर्यटनातील गुंतवणूक रुपये ३० हजार कोटींपर्यंत वाढविणे आणि त्या माध्यमातून १० लाख नवीन रोजगारनिर्मिती करणे, यासाठी पर्यटन धोरण - २०१६ तयार करण्यात आले आहे.**

# पर्यटन आणि रोजगार

पर्यटन धोरणांतर्गत विशेष पर्यटन विकास अभ्यासक्रमासाठी प्रतिव्यक्ती १२,५०० रुपये कमाल मर्यादेपर्यंत आणि गाईड प्रशिक्षण कालावधीसाठी ५००० रुपये अनुदान देण्यात येणार आहे. दहा पर्यटनस्थळी पोलिस तैनात करणे, त्यांना उजळणी प्रशिक्षण आणि पर्यटनाशी संबंधित माहिती देण्यात येईल. त्याच बरोबर विशेष पर्यटन क्षेत्र, विशेष पर्यटन जिल्हे वेळोवेळी आणि आवश्यकतेनुसार शासनामार्फत अधिसूचित करण्यात येतील.

दोन राष्ट्रीय महामार्गावर 'वे साईड' सुविधांचे प्रायोगिक तत्त्वावर काम करण्यात येणार असून एक खिडकी योजना तसेच इव्हेंटसाठी पूर्व मंजूर स्थळे घोषित करण्यात येतील. संकल्पनेवर आधारित पर्यटन प्रकल्पांची कार्यपद्धती अमलात आणणार असून त्यासाठी डाटा बेस व मार्गदर्शक सूचना तयार करण्यात येणार आहे. त्यामध्ये धार्मिक, वैद्यकीय, निसर्ग आणि कृषी पर्यटनाला चालना देण्यात येणार आहे. कृषी पर्यटन केंद्रांवर शैक्षणिक सहल नेणे शाळांना बंधनकारक करण्यात येणार आहे. महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळाच्या सहकार्याने व्याघ्र प्रकल्पांना चालना देण्यासाठी दिशा निश्चित करण्यात येईल. पर्यटकांसाठी आकर्षक ठरतील, अशी कलाग्राम केंद्रे निर्माण करण्याची संकल्पना तयार करण्यात आली आहे. पर्यटकांच्या माहिती व सुरक्षिततेसाठी मोबाइल ॲपस् विकसित करण्यात येणार आहे.

१९९९ मधील शासन निर्णयानुसार पर्यटनाला उद्योगाचा दर्जा देण्यात आला असून उद्योगाच्या सवलती मात्र देण्यात आलेल्या नव्हत्या. या नवीन धोरणात पर्यटनाला उद्योगाच्या सवलती देण्यात आल्या आहेत. राज्याची पाच क्षेत्रांमध्ये विभागणी करण्यात आली असून त्यामध्ये मेगा, अल्ट्रामेगा, लार्ज, मिडीयम, स्मॉल आणि मायक्रो असे गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती विचारात घेऊन वर्गीकरण करण्यात येणार आहे. या वर्गीकरणानुसार कालावधी व सवलतीच्या टक्केवारीनुसार नेट व्हॅटचा परतावा, ऐषोराम करात सूट, करमणूक करात सूट, विद्युत शुल्क कर, स्टॅम्प ड्युटीमध्ये सूट देण्याचे समाविष्ट आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या मालकीच्या जागेसाठी अकृषक करात सूट देण्यात येणार आहे. दुकाने आणि आस्थापना कायद्यांतर्गत सर्व परवान्यांचे नूतनीकरण दर पाच वर्षांनी केले जाईल. तारांकित हॉटेलवर चटई क्षेत्र निर्देशांक देय आहे. तेथे तो नगरविकास विभागाच्या धोरणानुसार प्रिमियम आकारून देण्यात येईल. महिला उद्योजकांचे पर्यटन प्रकल्प, अपंगाचे पर्यटन प्रकल्प, माहिती प्रदर्शन केंद्रांचे पर्यटन प्रकल्प, शाश्वत पर्यटन प्रकल्प यासाठी अतिरिक्त प्रोत्साहने प्रस्तावित करण्यात आली आहेत.

### पर्यटन संचालनालय

राज्य मंत्रिमंडळाने पर्यटन संचालनालयाच्या निर्मिती प्रस्तावाला मान्यता दिली आहे. या संचालनालयाच्या माध्यमातून पर्यटन धोरणाची परिणामकारक आखणी आणि अंमलबजावणी केली जाईल. पर्यटन क्षेत्रात नवीन गुंतवणुकीची वाढ करून तसेच रोजगाराच्या संधी निर्माण करणाऱ्या प्रशिक्षण योजना राबवण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. संचालक पर्यटन हे या संचालनालयाचे प्रमुख राहणार असून त्या अंतर्गत नागपूर, औरंगाबाद, अमरावती, सिंधुदुर्ग व पुणे ही पाच प्रादेशिक कार्यालये समाविष्ट असतील. उपसंचालक पर्यटन हे या कार्यालयांचे प्रमुख असतील.

### कोकणसाठी नवे पर्यटन धोरण

कोकणाच्या विकासाकरिता नवीन पर्यटन धोरण तयार करण्यात आले असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत



**पर्यटनातून मिळणारे उत्पन्न पाच वर्षांत दुप्पट करून मनुष्यबळ विकास, उत्पादन विकास, पर्यटनात वाढ आणि गुंतवणूक या बाबींवर लक्ष केंद्रित करण्यासाठी धोरण तयार करण्यात आले आहे. मनुष्यबळ विकासामध्ये कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित करण्यात आले असून गाईड ट्रेनिंग, टॅक्सी चालकाला शिष्टाचाराबद्दलचे प्रशिक्षण, लहान आणि मध्यम पर्यटन घटकांवर भर देणे, मोठ्या पर्यटन घटकांना अतिरिक्त प्रोत्साहन देणे, या बाबी धोरणात अंतर्भूत करण्यात आल्या आहेत.**

**- मुख्यमंत्री, देवेंद्र फडणवीस**

दिली. विशेषत: सागरी पर्यटन आणि नौकामय पर्यटन विकास यावर भर देण्यात आला आहे. अनेक इन्सेंटिव्ह देण्यात आलेले आहेत. यासंदर्भात अधिकाधिक गुंतवणूक वाढीचा विचार करण्यात आला आहे. या धोरणांतर्गत रत्नागिरीमध्ये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे प्रादेशिक कार्यालय कार्यरत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ हे संपूर्ण महाराष्ट्राचा विचार करते. पण कोकणच्या दृष्टीने स्वतंत्र टुरिझम विकास महामंडळ राज्य शासन तयार करीत आहे. यासोबतच महाराष्ट्र मेरीटाइम बोर्ड व टुरिझम विकास महामंडळ या दोघांना घेऊन स्वतंत्र विकास महामंडळ तयार करण्यात येऊन ते सागरी पर्यटनाबरोबरच इतर पर्यटनाविषयी उत्तम कार्य करेल.

सिंधुदूर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग, देवगड, मीठबाव, सागरेश्वर आदी ठिकाणी पर्यटन निवास, बीच सेफ्टी आदीबाबतचा आराखडा तयार करण्यात येऊन त्यास मान्यता देण्यात आली आहे. सिंधुदुर्ग जिल्हा, पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला आहे.

रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटनस्थळांचा विकास करण्याकरिता ३ हजार ५५ कोटी रुपयांचा आराखडा तयार केला आहे. एशियन डेव्हलपमेंट बँकेला तो सादर करण्यात येऊन त्यांच्या मदतीने तो कार्यान्वित करण्यात येणार आहे. मेक इन इंडियाच्या माध्यमातून पर्यटन क्षेत्रामध्ये आठ सामंजस्य करार करण्यात आले आहेत. यातील सात सामंजस्य करार कोकणच्या विकासासंदर्भात असून या माध्यमातून गुंतवणूक आणि रोजगार निर्माण होणार आहे. निवास व न्याहारी या योजनेस चांगला प्रतिसाद मिळत आहे. या योजनेंतर्गत २०१५ अखेरपर्यंत ७२० योजनाधारकांची नोंद झाली आहे. ती आता ८२० पर्यंत पोहोचली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सी वर्ल्डकरिता १३९० एकर ऐवजी साडेतीनशे एकर जमीन अधिग्रहण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

एलिफंटा महोत्सव, कासव महोत्सव, सिंधुदुर्ग महोत्सव, रायगड महोत्सव आदी महोत्सवाच्या माध्यमातून या वर्षी विदेशी पर्यटकांच्या संख्येत वाढ झाली आहे. एलिफंटाचा पर्यटनदृष्ट्या विचार करता एकात्मिक विकास करण्याची योजना तयार करण्यात आली आहे.

### पर्यटन सेवा अधिनियम

राज्यात पर्यटन सेवा अधिनियम तयार करण्यात येऊन त्याचा पाया 'ईज ऑफ डुईंग बिझनेस' असेल. याकरिता नवीन संचालनालय निर्माण करण्यात येणार आहे. या संचालनालयाला पर्यटनाशी संबंधित नोडल एजन्सीचा दर्जा मिळेल, अशा प्रकारचा कायदा तयार करण्यात येणार आहे. २०१७ हे वर्ष व्हिझिट महाराष्ट्र वर्ष म्हणून घोषित करण्यात आले आहे. या दृष्टीने बृहत आराखडा तयार करण्यात आला आहे. चांदा ते बांदा योजनेंतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. यामध्ये कृषी सलग्न कार्यक्रम राबवण्यात येऊन विशेषत: फळबाग लागवडीचा मोठा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, शेळी-बकरी पालन व मत्स्यव्यवसायाला चालना देण्यासाठी विविध उपाययोजनांचा समावेश करण्यात आला आहे. बंदर कनेक्टिव्हिटीच्या माध्यमातून येणारे रस्ते पूर्ण करण्यात येणार आहेत. 'मेक इन इंडिया'अंतर्गत उद्योगाच्या क्षेत्रात रायगड, पनवेल या भागात सामंजस्य कराराच्या माध्यमातून इन्फ्रास्ट्रक्चर आणि माहिती तंत्रज्ञान या क्षेत्रासाठी रुपये ३.४५ लाख कोटी एवढी गुंतवणूक प्राप्त झाली आहे.

हस्तकला कारागिरांकरिता महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजनेंतर्गत सामूहिक सुविधा केंद्राची उभारणी करण्यात येणार आहे. याअंतर्गत लाकडी खेळण्यांकरिता सावंतवाडी तर वारलीकरिता डहाणू येथे क्लस्टर तयार करण्यात येणार आहे. केंद्र शासनाने कोकणामध्ये ग्रीन रिफायनरी तयार करण्याचा निर्णय घेतला असून, याअंतर्गत १ लाख रोजगार निर्मिती होणार आहे.

**टीम लोकराज्य**









# खेळ उन्हाळ्यातील...

कीर्ती पांडे

व्हॉटस्पवर मेसेज किणकिणला. बघितला तर तिखट लावलेली कैरीची फोड माझ्या भावाने पाठवली होती आणि सवयीप्रमाणे खाली प्रश्न होता, 'ताई ! आंबा घुयी कोण?' मग सुरू झाला मजेशीर प्रश्नोत्तरांचा खेळ. या प्रश्नोत्तरांनी मला पार लहानपणच्या उन्हाळ्याच्या सुट्टीत नेऊन ठेवले.

उन्हाळा आणि ती दोन महिन्याची सुट्टी. कधी आपल्या गावात घालवलेली तर कधी मामा, काका, आत्या, मावशीकडे जाऊन साजरी केलेली अजूनही आठवते. आठवड्यातून एकदा फक्त रविवारी संध्याकाळी एकच सिनेमा दाखवणारा टीव्ही तेव्हा चैन होती आणि कॉम्प्युटर हे तर फक्त स्वप्नच होते. पण तरीही कच्चीबच्ची अखंडपणे बिझी असायची. उन्हाळ्याच्या सुट्टीत खेळले जाणारे आणि आता विस्मरणात गेलेल्या खेळांची मी सहज यादी केली तर या खेळांची यादी चक्क ५०च्याही पुढे गेली. मी माझ्या सहकाऱ्यांशी उन्हाळ्यातल्या खेळांबद्दल बोलले तर लक्षात आले थोड्याफार फरकाने हे खेळ महाराष्ट्रापुरते तरी सर्वव्यापी आहेत. यात फरक आहे तो नावांचा पण तोही बोली भाषेतून आला आहे. दिवसभर मुलांना गुंतवून ठेवण्याची ताकद असणारे आणि आता या सुट्टीत मुलांना कसे गुंतवायचे या प्रश्नापासून पालकांची सुटका करणारे हे खेळ बघा. तुम्हालाही वाटेल चला काचापाणी खेळू या किंवा पत्ते पिसू या!

या खेळांमध्ये बैठे खेळ आणि मैदानावर खेळण्याचे ज्याला आपण हल्ली ईन डोअर आणि आउट डोअर म्हणतो हे प्रकार होतेच पण याशिवाय फक्त मुली, फक्त मुले आणि मुले-मुली मिळून खेळण्याचे खेळ होते. कोणालाही कोणाच्या हद्दीत येण्याची सहज परवानगी नसायची.

उन्हाळा रणरणला की, सकाळी नऊ वाजल्यानंतर बाहेर पडण्याची परवानगी नसायची त्यामुळे अख्खी दुपार उन उतरणीला लागेपर्यंत

॥ संस्कृती ॥

## पाठशिवणी

**पाठशिवणी किंवा शिवाशिवी हा खेळ मला वाटते हा फक्त भारतातच नाही तर देशाचा खेळ आहे. फक्त त्याची राज्याप्रमाणे नावे बदलत जातात एवढेच. या खेळाचे प्रकार तरी किती आहेत बघा. आपण पारंपरिक पद्धतीने खेळतो तो एक प्रकार. याशिवाय साखळी शिवाशिवी, लंगडी शिवाशिवी, आंधळी कोशिंबीर याशिवाय थोडा एक मवाळ प्रकार म्हणजे विषामृत, विष आणि अमृत या शब्दांचा उपयोग करत स्वत:वर राज्य येणार नाही, याची काळजी घेत खेळली जाणारी ही पाठशिवणी.**

याच्या–त्याच्या पडवीत. दुपारभर सापशिडी, व्यापार, ल्युडो, पत्ते यांचे डाव रंगायचे. पत्त्यांच्या खेळातही दोन तीन कॅट एकत्र करून १५–२० जणांना खेळता येतील असे खेळ खेळले जायचे. गुलाम चोर, सत्ती लावणी, लॅडीस, झब्बू वगैरे. याशिवाय कमीत कमी साधनांमध्ये खेळला



जाणारा आणि सर्व वयोगटांना भावणारा खेळ म्हणजे चौसर, चौपट किंवा अष्टाचंगा. चिंचोक्यांचा सोंगटी म्हणून वापर करीत तासन्तास एकमेकांशी भांडत चौसर खेळणे यासारखा दुसरा आनंद नाही. या खेळांव्यतिरिक्त मुलींपाशी खेळण्याचे आणखी बरेच पर्याय होते. खेळ–खेळ किंवा खेळभांडी मांडून तासन्तास कल्पनेतल्या संसारात रमायच्या तर थोड्या मोठ्या मुली सागरगोटी सात खडी किंवा पाच खडी खेळायच्या. खडी म्हणजे खडे किंवा गोटे सागरगोट्यांना कल्पकपणे झेलायच्या दुसऱ्या गोट्यांना धक्की न लावता दोन तीन सागर गोटे एकदम उचलायचे. आमच्याकडे सागर गोट्यांऐवजी बिट्ट्यांनी हा खेळ खेळला जायचा. बिट्टी म्हणजे बदामाच्या आकाराचे फळे असते. घंटेच्या आकाराची पिवळी फुले येणारी झाडे विदर्भात सगळीकडे बघायला मिळतात. या झाडांनाच बिट्ट्या लागतात. या झाडाला महाराष्ट्रातल्या काही भागात कर्णटोप म्हणतात. दुपारी मुले मोठ्यांचा डोळा चुकवून अंगणात पडणाऱ्या घरांच्या सावल्यांच्या अंधारात गोट्या किंवा कंचे खेळायचे तर मुलींची लंगडीची घरे किंवा ठिक्कर बिल्ला रंगायचा.

कधी एकदाची संध्याकाळ होते आणि आपण बाहेर पडतो असे होऊन जायचे. संध्याकाळी सुरू होणारे खेळ पार अंगणात अंथरुणे पडेपर्यंत चालूच राहायचे. लंगडी, छपाछपी, शिवाशिवी, वांगे फोडणी आणि सदा सर्वकाळ सर्वांचा आवडता खेळ म्हणजे विटी दांडू असे कितीतरी घराच्या पडवीचे खांब पकडून खांबखांबोळी हा खेळ खेळला जायचा. या खेळाची मला आणखी एक गंमत वाटली. विदर्भात हा खेळ खेळताना राज्य देणाऱ्या व्यक्तीने म्हणायचे आई, ‘मला पुरी’ तर ज्याच्याजवळ ती गेली असे तिथे म्हणायचे ‘जा त्या घरी’. तर हाच खेळ खेळताना धुळ्याकडे म्हणायचे ‘चिलम तंबाखू’, ‘जा उस घरको’ भाषेचा काय तो फरक, खेळ तोच. याशिवाय पाचवीचा उन्हाळा हा सायकल





शिकण्यासाठी राखीव असायचा. तेव्हा झोपेतसुद्धा सायकल चालवण्याची स्वप्न पडायची. याशिवाय मुलींच्या, मुलांच्या, गावांच्या नावाच्या भेंड्या लावल्या जायच्या आणि त्या दिवसभर सगळी काम करताना चालूच राहायच्या, अगदी जेवताना किंवा अंघोळीला गेल्यावरही नाव, गाव, वस्तू, प्राणी हा असाच एक खेळ. या खेळाला ठरावीक काही नाव नसले तरी संपूर्ण महाराष्ट्रातल्या मुलांमध्ये लोकप्रिय होता. दुपारी मुलांचा गलका खूपच वाढला की कोणीतरी मोठी माणसं मध्ये पडून सगळ्यांना गोल करून बसवायची आणि कानगोष्टीसारखा खेळ खेळला जायचा; म्हणजे एका मुलाने एखादा शब्द शेजारच्या मुलाच्या कानात सांगायचा, त्याने तो दुसऱ्याला पास करायचा वर्तुळातल्या शेवटच्या मुलाने तो शब्द मोठ्याने म्हणायचा. मुलांच्या या गोंधळात त्या शब्दाचा पार बोजवारा उडालेला असायाचा. आता हा खेळ संवाद प्रक्रियेला गोंधळ समजून घेण्यासाठी सांगण्यासाठी खेळला जातो. सकाळी गावातल्या मोठ्या विहिरींचा ताबा मुलांकडेच असायचा. उंच काठावरून भराभर पाण्यात उडी मारतांना प्रत्येकाला आपण शूरवीर आहोत असे वाटायचे. कधी कधी शनिवारी दर्शन देणारा स्पायडरमॅन सोडला तर दुसरा सुपर हिरो तेव्हा माहिती नव्हता, माहिती होते ते फक्त शिवाजी महाराज आणि त्यांच्या लढाया, किल्ले यांच्या कथा. सगळे खेळून झाले की, अंगणात अंथरलेल्या गाद्या वाऱ्याने गार झाल्या की, त्यावर कुणीतरी मोठी माणसे रागे भरेपर्यंत मस्ती चालायची. या दिवसभराच्या बिझी दिनक्रमातच एक दिवस बाहुला बाहुलीचे लग्न ठरायचे आणि



या लग्नाच्या तयारीला जोरात सुरुवात व्हायची. बाहुला बाहुलचे दागिने, कपडे, मुंडावळी यांची जमवाजमव, जेवणाचा मेन्यु ठरवणे मग सगळ्यांनी मिळून तो तयार करणे, या सगळ्यांमध्ये दिवस कसे भुर्रकन उडून जायचे.

**(लेखिका मा. मुख्यमंत्र्यांच्या जनसंपर्क अधिकारी असून संस्कृती विषयाच्या अभ्यासक आहेत.)**

**संपर्क : ०९५९४९४४८००**

# असा टाळा उष्माघात







वातावरणातील तापमान अथवा प्रदीर्घ आजाराने शरीरातील तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त वाढल्यानंतर शरीरातील महत्त्वाच्या अवयवांवर परिणाम होऊन त्यांच्या कार्यामध्ये बिघाड होतो त्यास उष्माघात असे म्हणतात. आपल्या शरीराचे तापमान सरासरी ३७.६ अंश सेल्सिअस असते. यापेक्षा शरीरातील तापमान जास्त झाल्यास उच्चतापाची लक्षणे जाणवतात तसेच ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त झाल्यास उष्माघाताची लक्षणे जाणवतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या पाहणीनुसार दरवर्षी जगात सरासरी २५००० रुग्ण उष्माघाताने मृत्यू पावतात. तर भारतामध्ये सरासरी १५०० ते २००० पर्यंत रुग्ण दगावतात आणि महाराष्ट्रामध्ये सरासरी १५० ते २०० रुग्णांचा मृत्यू होतो. यामध्ये विदर्भातील नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, अकोला, अमरावती या जिल्ह्यामध्ये सरासरी ४३ ते ५० अंश सेल्सिअस तापमान असते.

उष्णतेच्या लाटा संपूर्ण जगभर पसरत असल्याने सर्व जगात उष्माघाताच्या रुग्णांची वाढ झाली आहे, याचे मुख्य कारण पृथ्वीवरील पर्यावरणाच्या असमतोल प्रमाणामुळे तापमानात वाढ होत आहे.

डॉ. लक्ष्मण कोडलकर

### पृथ्वीचे तापमान वाढण्याची कारणे

■ गेल्या शतकापासून पृथ्वीचे तापमान वाढत असल्याचे निदर्शनास आले होते. गेल्या तीन दशकांमध्ये पृथ्वीच्या तापमान वाढीचा दर खूपच वाढल्याने (३ अंश सेल्सिअस) मानवाच्या व अन्य सजिवांच्या आरोग्यावर याचा परिणाम जाणवत आहे. ■ ग्रीन हाऊसमध्ये होणाऱ्या वायू उत्सर्जनामुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. ■ प्रचंड प्रमाणात वृक्षतोड होऊन जंगलाचे प्रमाण कमी झाल्यामुळे तापमानात वाढ होत आहे. ■ जागतिक औद्योगिकीकरण वाढल्याने हवेतील प्रदूषणामध्ये वाढ होऊन पृथ्वीचे तापमान वाढत आहे. ■ पावसाचे प्रमाण कमी झाल्याने व कोरडा दुष्काळ वाढल्याने वातावरणातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्याने पृथ्वीचे तापमान वाढत आहे. ■ वातावरणातील कार्बनडाय ऑक्साईड वायू प्रमाणापेक्षा जास्त असल्याने वातावरणाचे संतुलन बिघडल्याने पृथ्वीचे तापमान वाढत आहे. ■ याव्यतिरिक्त अनेक किरकोळ कारणाने पृथ्वीचे तापमान वाढत आहे.

### उष्माघात (हिट स्ट्रोक) कसा होतो.

वातावरणातील तापमान किंवा शरीरातील अंतर्गत तापमान काही कारणाने वाढल्यास संपूर्ण शरीराचे तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त झाल्यास शरीरातील प्रथिनांमध्ये उष्णतेने बदल होतो. फॉस्पोलिपीड व लायपोप्रोटीन यामध्ये अस्थिरता निर्माण होते व शरातील मेद वितळतात याचा परिणाम मज्जासंस्था व रक्ताभिसरण संस्थेवर प्रत्यक्षरीत्या आघात होतो व त्यांच्या कार्यात अडथळा आल्याने शरीरातील इतर महत्त्वाच्या अवयवांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात

बदल होतो आणि त्यांचे कार्य थांबू शकते. वेळेत प्रथमोपचार व वैद्यकीय उपचार न मिळाल्यास रुग्णांचा मृत्यूही होऊ शकतो.

### उष्माघात (हिट स्ट्रोक) कोणाला होऊ शकतो

शरीरातील तापमान वाढण्यासाठी खालीलप्रमाणे धोक्याचे घटक असू शकतात.

१. निवासस्थाने गरम असणे. २. भरपूर पाणी न पिणे. ३. शेतात उन्हाचेवेळी उघड्या अंगाने काम करणे. ४. जलशुष्कता (डिहायड्रेशन) असणे. ५. मद्यपान व कॅफीनचे व्यसन असणे. ६. प्रदीर्घ आजार (हृदयरोग, फुफुसाचे आजार, यकृताचे आजार, मूत्रपिंडाचे आजार) असणे ७. मधुमेह, मनोरुग्ण व रक्तदाबाचे रुग्ण औषधोपचाराखाली असणे. ८. वजन कमी किंवा जास्त असणे. ९. अर्भके, बालके, वयोवृद्धामध्ये उष्णता अचानक वाढणे. १०. अंगमेहनतीचे व्यायाम करणारे खेळाडू. ११.उन्हामध्ये पार्किंग केलेल्या पूर्णपणे बंद असलेल्या वाहनामध्ये अडकलेली बालके किंवा प्राळीव प्राणी. १२.उष्ण कटिबंधात असणारी लोकसंख्या.

### उष्माघाताचे (हिट स्ट्रोक) निदान

- उष्माघाताचे निदान हे त्याच्या लक्षणावरून करता येते.
- वैद्यकीय उपचारादरम्यान रक्त/लघवी तपासणी केल्यानंतर त्यामध्ये अनियमितता दिसून येते.
- उष्माघाताच्या निदानासाठी विशिष्ट अशी कोणतीही चाचणी नाही.
- उष्माघाताचे (हिट स्ट्रोक) उपचार

उष्माघाताच्या रुग्णावर वेळेत प्रथम उपचार केल्यास तो बरा होऊ शकतो. त्यासाठी त्याला प्रथमोपचार व वैद्यकीय उपचार वेळेत मिळणे आवश्यक आहे. तसेच प्रथमोपचाराबाबत जनतेमध्ये आरोग्य जागृती असणे गरजेचे आहे.

उष्माघाताची लक्षणे जाणवू लागल्यास रुग्णास ताबडतोब आडवे करावे. पाय उचलून धरावेत. सावलीमध्ये घेऊन जावे, हवेशीर वातावरण तयार करावे. थंड पाण्याने शरीर पुसून घ्यावे. शरीरावर ठिकठिकाणी थंड पाण्याच्या पिशव्या ठेवाव्यात. त्यास थंड पाणी अथवा पेये (मद्य व कॅफेन वगळून) द्यावीत.

शरीराचे तापमान कमी येते का ते पाहावे. त्याचबरोबर १०८ (राष्ट्रीय ॲम्बुलन्स सेवा) या टोल फ्री नंबरवर फोन करून ॲम्बुलन्स बोलावून घ्यावी व रुग्णास रुग्णालयामध्ये दाखल करावे.

### उष्माघाताची (हिट स्ट्रोक) लक्षणे

**ताप येणे, थकवा येणे, डोके दुखणे, तहान लागणे, त्वचा लालसर, गरम व कोरडी पडणे, आजारी असल्यासारखे वाटणे, उलट्या होणे, घाम न येणे, चक्कर येणे, धाप लागणे, मानसिक गोंधळ उडणे, आभास होणे, नाडीचे ठोके वाढणे, रक्तदाब कमी होणे, पायाला गोळे येणे (क्रॅम्प येणे, आकडी येणे, बेशुद्ध पडणे, मृत्यू येणे.**

निरामय

### उष्माघाताचे (हिट स्ट्रोक) प्रतिबंधात्मक उपाय

कोणत्याही रोगावर उपचार करण्यापेक्षा प्रतिबंधात्मक उपाय करणे महत्त्वाचे असते. उष्माघातामध्ये खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक उपाय करावे.

१. घराची दारे-खिडक्या बंद ठेवाव्यात, पडदे बंद करावे जेणेकरून आतील वातावरण थंड राहील.
२. पंखे व कूलरचा वापर करावा.









३. घराच्या परिसरामध्ये झाडे लावावीत. घरामध्ये ठिकठिकाणी वाट्यांमध्ये पाणी ठेवावे.
४. सैल, कमी वजनाचे व फिक्कट रंगाचे कॉटनचे कपडे वापरावेत.
५. बाहेर जाताना गॉगल, स्कार्प बांधणे, टोपी व समरकोटचा वापर करावा.
६. उन्हात काम करू नये. दुपारी १२ ते ४ या वेळात काम बंद ठेवावे.
७. मद्य अथवा कॅफेन घेऊ नये.
८. फलाहार, फळांचा रस, पालेभाज्या, सॅलेड, ऊसाचा रस यांचा आहारात उपयोग करावा.
९. वाहन पार्किंग करताना वाहनामध्ये बालक अथवा पाळीव प्राणी नसल्याची खात्री करावी.
१०.थंड वातावरणातून लगेच उष्ण वातावरणामध्ये प्रवेश करू नये.
११.प्रदीर्घ आजाराच्या रुग्णांनी वैद्यकीय सल्ला घ्यावा.
१२.रुग्णालयातील प्रसूतीकक्ष व अर्भक कक्ष हे तळमजल्यावर ठेवावेत.
१३.उन्हात घराबाहेर पडताना खिशात कांदा ठेवावा.

उष्माघाताबद्दल जनतेमध्ये आरोग्यविषयक जनजागृती केल्यास या आजारापासून संरक्षण होऊ शकते.

**(लेखक हे आरोग्य अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०७८७५७८१६१०**




@Dev_Fadnavis

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या विकासाच्या अनुषंगाने अनेक महत्त्वाचे निर्णय घेत असतात. या निर्णयांची माहिती ते तत्काळ ट्विटरद्वारे प्रसृत करतात. गतिमान आणि पारदर्शक विकासासाठी त्यांची आत्यंतिक तळमळ या ट्विटसमधून दिसून येते. गेल्या महिनाभरातील त्यांच्या काही ट्विटसचा हा आढावा.**

नवी दिल्ली येथे सरन्यायाधीश व प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या परिषदेनंतर...

Great brain storming time at a conference with Hon CJI, Hon PM, all CMs CJs from all states today at New Delhi.

दुष्काळाविषयी व्यक्त होताना...

Recalled the terrible condition of state 17months ago how we have crossed milestones now, in our journey of devpt.

जागतिक आरोग्यदिनी शुभेच्छा देताना...

Wishing everyone aHealthyHappy Life! WorldHealthDay जागतिक आरोग्य दिनानिमित्त सर्वांना सुदृढ आरोग्यासाठी शुभेच्छा!

ओरॅकल क्लाउड वर्ल्ड कार्यक्रमात बोलताना...

Informed how initiatives like-apleSarkar,SmartCities, digital village,better price to farm products are bringing change because of technology

इस्त्रायलच्या कृषिमंत्र्यांसोबत चर्चा केल्यानंतर...

I am happy that they are ready to extend support expertise in newer technologies in the field of water treatment, poultry, dairy development

हापूस आंबा विक्री केंद्राचे उद्घाटन केल्यानंतर...

In this unique initiative, alphonso growing farmers would come directly sell their produce to the consumers.

मराठी नववर्षानिमित्त...

महाराष्ट्राच्या यशाची गुढी अधिकाधिक उंच व्हावी, यासाठी एकजूट होऊन झटण्याचा, चला सारे मिळून संकल्प करू या!

स्वदेशी बुलेट प्रूफ सुरक्षा नौकेचे लोकार्पण केल्यानंतर मेक इन इंडियाच्या यशस्वीतेविषयी समाधान व्यक्त करताना...

This amazing aluminium vessel is built at a boat yard in Alibaug, Raigad. Great example of Make in Maha Make in India !

नागपूर रेल्वे करार केल्यानंतर...

Glad to witness with Hon nitinsgadkari ji,the signing of project agreement between MetroRailNagpur KfW Germany.

मिरजहून लातूरला रेल्वेने पाणी नेताना...

Maharashtra Govt and RailMinIndia is working hard to bring relief to people in drought affected region of Maharashtra.

अरबी समुद्रातील शिवरायांच्या स्मारकासाठी प्रकल्प कार्यालयाचे उद्घाटन केल्यानंतर...

Inaugurated Project office Emergency Management Plan Cell for Chatrapati Shivaji Maharaj Memorial in Arabian sea.

पर्यटन विकासासाठी केलेल्या तरतुदींची माहिती देताना...

Govt has prepared a plan of 3055 cr for tourism devpt in Sindhudurg Ratnangi

## नवविवाहितांना शुभेच्छा...

**सामूहिक विवाह सोहळ्याविषयी...**

527 couples from all religions Hindu, Muslim,Christian Buddha, get married at a mass wedding ceremony at Jalna.




महाराष्ट्र शासन
माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे निर्मित
शासन आणि जनता यांच्यात संवाद दृढ करणारे...
सर्वत्र : सर्वोत्तम
लोकराज्य
४ लाख खप ४० लाख वाचक
ऑनलाईन वर्गणीदार होण्यासाठी :
http://dgipr.maharashtra.gov.in
रोखीने वर्गणीदार होण्यासाठी :
जिल्ह्यातील जिल्हा माहिती कार्यालयाशी संपर्क साधा
لوک راجیہ
उर्दु लोकराज्य
ऐकायलाच हवा
दिलखुलास
संवाद...
@२५७०
राज्यातील सर्व आकाशवाणी केंद्रांवरून सोमवार ते शनिवार, सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणारा कार्यक्रम
लाखो दर्शकांची थेट-भेट घडवून देणारे...
जय महाराष्ट्र
नाबाद...८५३ भाग
दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून
मंगळवार व शुक्रवार, रात्रौ ७.२५ ते ८.१० या वेळेत
प्रसारित होणारा कार्यक्रम
बातमी खात्रीची
माहिती प्रगतीची
वेध भविष्याचा
महान्यूज
@ १ कोटी ७६ लाख
www.mahanews.gov.in
MAHARASHTRA
Ahead
English Magazine
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
http://dgipr.maharashtra.gov.in
माध्यमे संवादाची : जनतेच्या विश्वासाची

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th May 2016
Date of Publication : 10th of every Month

# लोकमान्य : लोकराज्य



सर्वाधिक खपाचे मासिक

प्रति/ TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक चंद्रशेखर ओक, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : चंद्रशेखर ओक